नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

दर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी

र्ष २५ अंक ५ सप्टेंबर १९७०

आचार्य विनोबाजी भावे



आचार्यांच्या अमृत महोत्सवाच्या या मंगल समयी विदर्भ साहित्य संघ त्यांना विनम्र भावाने वंदन करीत आहे.

अनुक्रमणिका

कै. नारायण मुरलीधर गुप्ते



विदर्भ साहित्य संघात कविश्रेष्ठ कै. ना. मु. गुप्ते ऊर्फ Bee यांच्या छायाचित्राचे अनावरण ता. ३० ऑगस्ट रोजी कविवर्य श्री. अनिल यांच्या हस्ते झाले. हे त्यांचे छायाचित्रही प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांची वि. सा. संघाला देणगी आहे.

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २५] सप्टेंबर १९७० [अंक ५

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

या अंकाची किंमत : एक रुपया

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

आचार्य विनोबा भावे

——तारा शास्त्री

तच्चक्षुर्देवहितम् पुरस्ताच्छुक्रमुच्चरत् ।
पश्येम शरदः शतम् । जीवेम शरदः शतम् ।
रोहेम शरदः शतम् । भूयसीः शरदः शतात् ।

११–९–१९७० हा पूज्य विनोबांचा ७५वा वाढदिवस आहे. ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो ! ऋग्वेदकालीन ऋषींनी स्वत:करता ज्या तेजस्वी जीवनाची आस धरली तेच—एका निराळ्या अर्थाचे तेजस्वी जीवन, आचार्यांना लाभो, म्हणून वरील वेदवचनांचा आम्ही त्यांच्या वतीने पुनरुच्चार करणार आहोत. उदयाचली आपल्या सहस्र किरणांनी तळपणाऱ्या तेजोनिधीला साक्षी ठेवून, प्राचीन ऋषींनी शंभरच काय, पण त्याहूनही अधिक, जीवनरसाने सळसळणारे आयुष्य आपल्याला लाभावे म्हणून उद्‌घोष केला. त्याच भगवान सूर्यनारायणाला साक्षी ठेवून आचार्य अखंड कर्मयोगाची जोपासना करताना दिसत आहेत.

ऋग्वेदातला जीवनवाद २० व्या शतकाच्या नव्या पार्श्वभूमीवर, एका नव्या स्वरूपात, विनोबांच्या चिंतन, मनन आणि आचारविचारातून प्रकट झालेला दिसतो. त्या विचारांची पोच वैश्विक आहे, त्या चिंतनाचा ध्यास शास्त्रशुद्ध चिरंतन सत्याचा आहे आणि या मननाची बैठक अध्यात्माची आहे. अनुभवाधिष्ठित ज्ञानातून आणि अनुभूतिजन्य साक्षात्कारातून हा जीवनवाद साकार होतो आहे. जीवनवादाचं ते विलोभनीय रूप पहायला मिळावं, म्हणून शतवार आम्ही म्हणणार आहोत,—" जीवेत् शरदः शतम् ।"

विनोबा पदयात्रा करीत साऱ्या भारतवर्षाची परिक्रमा पुन:पुन: पुरी करीत आहेत; मानवतेच्या धाग्यांची गुंफण घालीत आहेत. गुंफलेल्या गोफांची टोकं एका अखंड वर्तुळात सांधण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. त्यांना शांती आणि समृद्धी हवी आहे. सत्य आणि अहिंसेच्या महामार्गावरून गेल्याशिवाय ती प्रस्थापित व्हायची नाही असं त्यांचं म्हणणं आहे. शास्त्र आणि अध्यात्म ह्यांशिवाय विसाव्या युगातल्या मानवतेचा तारणकर्ता दुसरा कुणी नाही असं पुन:पुन: ते आवर्जून सांगत आहेत.

शांतता, समृद्धी, सत्य, अहिंसा, शास्त्र, अध्यात्म ह्यांचं अद्वैत, विनोबांनी मोठ्या लोभस स्वरूपात निर्माण केलं आहे. शांती, सत्य आणि शास्त्र हे सारे एकाच सत्य तत्त्वाचे आविष्कार आहेत ह्या निर्णयाप्रत सरळ आणि सहजसुलभपणाने येऊन पोहोचावं, इतकी अनिवार्यता, विनोबांच्या आचार–विचारात परिपूर्णपणे भरून उरली आहे. समृद्धी, अहिंसा आणि आध्यात्म ह्यांचंही एक अजोड अभेद्य नातं याच अनुषंगाने, तशाच अनिवार्यपणे मनावर ठसत आहे. शब्दांच्या ह्या जोडगोळीतला कार्यकारणभाव सुद्धा पाहाता पाहाता नाहीसा होऊन दोन्ही एकमेकांत विलीन झाल्यासारखे भासताहेत. भक्तानं ईश्वरमय व्हावं तसंच कारण कार्यात समर्पित झाल्याची ग्वाही मिळते. उदाहरणार्थ शांततेनं अस्तित्वाचं रक्षण करावं, आणि अस्तित्वाचं अस्तित्वरूप शास्त्राद्वारे प्रकट व्हावं ! अहिंसेने प्रेमभावना आणि बंधुता जागृत व्हावी, सर्वानुभूती एकात्म्याची ओळख झाल्यावर,— " ॐ सहनाऽववतु सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै ······" अशा पद्धतीने वैभवाचं एकात्मक जीवन विकसित व्हावं,– ही स्थिर प्रज्ञावंताची जीवनधारणा आहे.

तुमच्याआमच्यासारखी, स्वत:ला चांगले म्हणून घेणारी माणसं, फार तर व्यापक राष्ट्रवादाची कल्पना करू शकतील, सहजीवनाची भाषा बोलू शकतील, आचार–विचारावर विवेकाचं नियंत्रण हवं असं प्रतिपादन करू शकतील. परंतु आचार्यांची दिव्यदृष्टी ज्या दिव्य जीवनाचं दर्शन घडवायला उत्सुक

आहे, ते जीवन वरील साऱ्या जीवनाची बंधनं तोडून विश्वाच्या परिघावर उभं राहावं म्हणतं आहे.

'जगा' आणि 'जगू द्या' ह्या बुद्धिवादी अधिकाराचा दावा मांडून, आम्ही आपापल्या स्थानावर अढळपद प्राप्त करण्याचा मान पटकावू कदाचित् ! किंवा समांतर रेषेत समान अंतरावरून चालतही राहू, पण रासक्रीडेचा उमाळा त्या जीवनात नाही, मुरलीने निर्माण केलेली नादलुब्धता नाही—, आणि हाती हात धरून राधा-माधवाभोवती फेर धरणाऱ्या गोप-गोपींनी अनेक राधा-माधवांच्या रूपाने प्रकट व्हावं, अशी धुंद तादात्म्यताही नाही. जीवनाचं हे सुसंवादी सौंदर्य, अधिकार कर्तव्याच्या कठोर भाषेने कधी जोखताच येणार नाही.

म्हणूनच माणसाच्या देवत्व आणि दिव्यत्वावर आचार्यांनी आपल्या साऱ्या रसरशीत जीवनवादाची उभारणी केली आहे. जीवात्म्याने अंतःकरणात वसत असणाऱ्या परम तत्त्वाला ओळखावं आणि तीच ओळख साऱ्या भूतमात्रात प्रकट व्हावी,—ह्या वेदांती भूमिकेचं ज्याला ज्ञान झालं, ती भूमिका ज्याला समजली, उमजली, जगता आली,—त्याला अतिथिधर्म, शेजारधर्म, राष्ट्रधर्म आणि यांनाही व्यापून उरणारा स्वधर्म कळला. खऱ्या अर्थाने कळला. विनोबांचं आवाहन ह्या स्वधर्माला आहे. जीवात्म्याची शिवात्म्याशी सांगड घालून देणाऱ्या परमतत्त्वाला आहे.

म्हणूनच जीवनाची बैठक तयार करण्याकरता, सदसद्विवेक बुद्धीला आव्हान देण्यापेक्षा, मूळ तत्त्वाला हात घालणं ते अधिक पसंत करतात. माणसा-माणसातला आत्मिक उमाळा प्रकट झाला म्हणजे तमोगुण आपली पळवाट शोधतील, दुःखदैन्याला जन्म देणारे षड्रिपू हतप्रभ ठरतील आणि माणसं सहज स्फूर्तीने आणि अंतःप्रेरणेने, हातात हात घालून सर्वोदयाचा मार्ग चोखाळतील अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे. माणसातला परमेश्वर एकदा जागा झाला म्हणजे श्रेयसाची जाणीव होणाऱ्या त्या शुभक्षणी "अवघाची संसार सुखाचा करीन" असा आनंद सहजस्फूर्तीने मुखावाटे उमटावा यात नवल नाही. कारण इमारतीचा पाया पक्का झाला म्हणजे अर्धं-अधिक काम पार पडतं.

आचार्यांचा अनेकदा संत म्हणून गौरव केला जातो. साऱ्या संत-परंपरेचं एक वैशिष्टय म्हणून असं सांगतात की जीवात्मा आणि परमात्मा यांचे परस्परसंबंध त्यांना अनुभूतीच्या मार्गाने ज्ञात झालेले होते--, त्यांच्या जाणिवेत उतरलेले होते आणि म्हणून आचार-विचारात प्रतिबिंबित झाले होते. आणि म्हणूनच, 'जे का रंजले गांजले त्यासि म्हणे जो आपुले,' अशा साधुपुरुषांत देव पाहाणारी अभंगवाणी तुकारामाच्या तोंडून बाहेर पडली. "विश्व स्वधर्म सूर्य पाहो, जो जे वांच्छील तो ते लाहो, प्राणीजात।" अशी ज्ञानेश्वरांनी मागणी केली. भुकेल्या अन्त्यजांना जेवण घालून आणि तृषित गाढवाला पाणी पाजून, एकनाथांनी भूतमात्राच्या सेवेत ईश्वराची सेवा पाहिली. पिकविलेल्या मळ्यात डोळ्याने विठ्ठल पाहाणाऱ्या सावत्या माळ्याची अनुभूती साऱ्या प्राणीमात्रातच नव्हे, तर वनस्पतींच्या दुनियेतही त्या 'चैतन्या'ला प्रत्यक्ष पाहात होती.

ह्या अनुभूतीचा अविष्कार आचार्यांच्याही जीवनात, शोधू गेल्यास, सापडणे कठीण नाही. ब्रह्मचर्याची शपथ घेणारे, कॉलेजच्या शिक्षणाला रामराम ठोकणारे विनोबा, आपल्या आश्रमीय जीवनाची कक्षा ओलांडून, आंध्रातील सर्वोदय संमेलनप्रसंगी भूदानाचा नवा महामंत्र सांगणारे विनोबा, गीताई-आईच्या अनंत मायेखाली निर्भयचित्त वावरणारे विनोबा, ह्या अनुभूतीचं बळ पाठीशी घेऊनच देशाची परिक्रमा करीत असावेत खचित् ! पण आचार्यांच्या बाबतीत ऋषि म्हणतात त्याप्रमाणे, आत्मसात केलेले ज्ञान प्रत्यक्ष जीवनात व्यक्त व्हावे असेही घडले आहे. आत्मज्ञान प्राप्त झालेल्याला कधीही न संपणाऱ्या परमसुखाची प्राप्ती होत असते. म्हणूनच निःस्पृह आणि विरक्त मनाने, स्वधर्मपालनार्थ आचार्य लोकगंगेच्या काठाने आपल्या परिक्रमेची वाट चालत आहेत आणि अशीच चालत राहाणार आहेत.

ह्या देशात वेळोवेळी संतांच्या एका लांबलचक परंपरेने मनुष्याच्या जीवनाची जडण-घडण तयार करण्याचे कार्य केले. आत्मज्ञानाने बुद्धी स्थिर होते. ते आत्मज्ञान कळत नकळत सामान्य माणसाच्या सहजगत्या गळी उतरावे, म्हणून चराचर सृष्टीला व्यापून उरणाऱ्या ईश्वराची प्रतिमा, आज शतकानुशतकाच्या परंपरेने, ह्या देशातल्या व्यक्तिमात्राच्या जीवनात आपला ठसा उमटवून गेली आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञ

प्लेटो ह्याला सुद्धा, एक आदर्श, एकसंध नैतिक समाज निर्माण करावयाचा होता. अध्यात्माच्या भरभक्कम पायावर ह्या नव्या समाजाला उभं करावयाचं होतं. म्हणून त्याने बुद्धिवंताच्या स्वतंत्र प्रेरणेला आव्हान द्यायचं ठरविलं. आणि बुद्धिवंताची बुद्धी स्थिर राहावी म्हणून बुद्धीला भ्रष्ट करणाऱ्या सुखोपभोगापासून कटाक्षाने दूर ठेवावं असा निर्णय घेतला. विवाहसंस्था आणि संपत्तीची खाजगी मालकी ह्यांचेच मुळात उच्चाटन करावे असा त्याचा आग्रह होता. पण परिणाम असा झाला की एकीकडे राज्य म्हणजेच एक बृहद्-कुटुंब अशी दोहोंतील समानधर्मीयता दाखवीत असतानाच, दुसरीकडे त्याने राज्याची अखंडता कायम टिकविण्याकरता कुटुंबसंस्था नष्ट करणाऱ्या विसंगत विचाराचे प्रतिपादन केले. ह्या विसंगतीच्या पार्श्वभूमीवर स्वधर्माला स्वकर्तव्याला जागायला शिकविणारी व्यक्तिगत अंतःप्रेरणा नष्ट झाली. उरली फक्त बुद्धीची हुडेलहप्पी !

उलटपक्षी समाजाला एकत्रित ठेवणारे जे रेशमी बंधन, कुटुंबसंस्थेच्या रूपाने शतकानुशतके अखंडित राहिले, त्याच बंधनाची जोपासना नव्या समाजाला तारक ठरेल असा निर्वाळा, आचार्य प्रत्यही आजच्या समाजाला देत आहेत. प्रेम आणि कृतज्ञताबुद्धी ही माणसामाणसांना परस्परांशी निगडित करणारी दोन महत्त्वाची बंधने आहेत. या दोन बंधनांनी कुटुंबधर्म आणि गृहस्थधर्म किती व्यापक केला आहे पहा. सामान्य माणसाच्या दृष्टिकोणातून पती, पत्नी आणि मुले यांचाच फक्त कुटुंबात समावेश होतो. पण कृतज्ञताबुद्धी मनुष्यप्राण्याच्या या चिमुकल्या जगाचा वनस्पतींच्या आणि प्राणिमात्रांच्या दुनियेशी समन्वय घडवून आणीत असते. गाईला गोमाता म्हणण्याचं हेच आहे. तिचे मलमूत्रसुद्धा उपयोगी आहे. कुटुंबाच्या गरजा मरेपर्यंत नव्हे, तर मेल्यानंतरही पुरविणाऱ्या या बहुगुणी गाईला ती भाकड झाली तरी कसायाकडे न देता मातेवत् मानावं, हा माणसाच्या कृतज्ञताबुद्धीने घालून दिलेला आचार आहे. त्याचप्रमाणे आपल्या केवळ पर्णसंभाराचाच नव्हे तर मूळ-काष्ठांचाही उपयोग माणसाच्या औषधोपचारार्थ शरीर झिजवून करून देणारी तुळस परसदारी तुळशीवृंदावनात प्रतिष्ठित व्हावी हाही माणसाच्या कृतज्ञताबुद्धीचा— ईश्वराशी आणि साऱ्या चराचर सृष्टीशी समन्वय साधणाऱ्या माणसाच्या उदात्त संस्कृतीचा गौरव नाही काय ?

विनोबांना साम्यवाद हवा आहे, तो असा आहे. समाजवाद हवा आहे तो असा आहे. ते स्वतः त्याला सर्वोदय म्हणताहेत. हा सर्वोदय जिथे कुटुंबाच्या लहानशा कक्षेतूनसुद्धा गृहस्थाला विश्वधर्माची ओळख करून देतो आहे, तिथे तो ग्राम प्रांत आणि देश ह्यांच्या परिसीमांतच फक्त बंदिस्त होऊन रहायचा नाही, हे काय सांगावयास हवे ?

सर्वोदयाला ज्या व्यापक आध्यात्मिक बैठकीचा आधार दिलेला आहे तो लक्षात घेता, विनोबांचा जीवनवाद म्हणून सर्वोदयाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे उल्लेख करणं योग्य होईल का असा एक प्रश्न निर्माण होतो. जीवनवाद हा भौतिकवादाशीच अधिक संलग्न आहे अशी एक रूढ कल्पना आहे, अध्यात्मिक कसोटया व्यवहारवादाच्या परिक्षेत उतरू शकत नाहीत, हे त्याचं कारण मानलं जातं. पण श्रेय् आणि शांतीच्या अंतिम ध्येयाकडे नजर टाकल्यास, अध्यात्मिक बैठकीवर आधारलेला जीवनवादच अधिक सत्य आणि चिरंतन असल्याचं लक्षात येईल. भौतिक शरीराची अध्यात्माने उपेक्षा केली आहे असंहीं मानण्याचं कारण नाही. चैतन्य आणि चैतन्याचा ज्या जड आणि भौतिक शरीराशी संबंध साधलेला आहे ते जड आणि भौतिक शरीर, ईश्वरनिर्मित सृष्टीचाच एक भाग म्हणून आपण मानतो. 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' ह्याचा अर्थ असा की पंचमहाभूतांनी बनलेल्या ह्या शरीराला ब्रह्मांडाच्या प्रातिनिधिक स्वरूपात समजावून घ्यावं. आत्म्याचं निवानस्थान म्हणून भौतिक शरीराचं महत्त्व आहे. म्हणूनच उपनिषदांतून आणि गीतेतून क्षेत्रज्ञा—बरोबर क्षेत्राचाही विचार फार सूक्ष्मपणे केलेला आढळून येतो.

'या देवी सर्वभूतेषु क्षुधारूपेन संस्थिता।' असं मानणारा हा जीवनवाद आहे. क्षुधातृप्तीच्या कार्याचं महत्त्व विशद करणारा आहे. विनोबांनी श्रमाच्या प्रतिष्ठेवर भर दिला त्याचं महत्त्व, मर्म सांगणारा आहे. शांतिबरोबर समृद्धी विनोबांना अभिप्रेत आहे. ऋग्वेदात पर्जन्य हाच धर्म आहे असे म्हटले आहे. गीतेत 'यज्ञात् भवति पर्जन्यः।' असा उल्लेख

(पुढील मजकूर २६५ वर)

आम्हाला कळलेले तात्यासाहेब कोल्हटकर

निवेदक : मीमांसाभूषण श्री. पुरुषोत्तम बाळकृष्ण साठे
सौ. ताराबाई साठे, अकोला

मला पहिल्याने कै. तात्यासाहेबांची ओळख करून दिली त्यांच्या 'मूकनायक' या नाटकाने. माझ्या लहानपणी मी जळंब या गावी रहात असताना आम्ही खामगाव येथे गेलो होतो. आम्ही ज्यांचे घरी उतरलो होतो, त्या चितळे घराण्यातल्या मंडळीच्या बरोबर आम्ही किर्लोस्करांचे 'मूकनायक' पाहायला गेलो. माझ्या मातोश्रींच्या बरोबर मी बायकांत गॅलरीत बसलो होतो. थिएटर भरले होते.

पडदा उघडला. एका महालाचा देखावा होता तो. एका झोपाळयावर बालगंधर्व, मास्तर कृष्णराव व रानडे हे तीन सर्वच दृष्टीने मोठे नट स्त्रीवेशात दाटीवाटीने बसले होते. एक छोटासा मुलगाही होता त्यांचेबरोबर. "हे प्रभो विभो ही अगाध किति तव करणी" हे पद म्हटले जात होते. भव्य महालाचा देखावा व अर्थपूर्ण पद गोड आवाजात म्हटले जात होते. वाद्यांची साथ सुंदर होती. त्या मधुर नादाने मी भारावून गेलो. थिएटरमध्ये पदाचा आवाज घुमतो आहे असे मला वाटले. पदाचा अर्थ समजण्याइतके माझे वय नव्हते. पण, पद कानाला गोड लागत होते व मनावर परिणाम करीत होते. किती गोड स्तुती होती 'प्रभो'ची! त्या वेळी माझ्या लहानग्या मनाला वाटले ही पद करणारी व्यक्ती खास साधु असली पाहिजे. सर्व नाटक होईपर्यंत माझा जीव भारून गेला होता. त्या वेळी नाटकात कै. जोगळेकर विक्रांताचे काम करीत.

नाटक पाहून मी घरी आलो तो भारावूनच वरील गाण्याचे सूर माझ्या कानात घुमत होते व तो झोपाळयाचा देखावा माझ्या डोळयांपुढे उभा राहात होता.

दुसरे दिवशी मी माझ्या मातोश्रींच्या बरोबर कै. तात्यासाहेबांच्या घरी गेलो. एखाद्या गर्भश्रीमंताच्या घरी जशी खानदानी पद्धती असावी तशी मला तेथे दिसली. माझ्या मातोश्री कै. मामींना (त्या वेळच्या सौ. रमाबाई, कै. तात्यासाहेबांचे कुटुंब) भेटल्या. मला पहावयाचे होते, "हे प्रभो विभो" या पदाचे कर्ते. पण मला ते कुठे दिसलेच नाहीत. आमचे आदरातिथ्य झाले. आमच्या मातोश्रींच्या व मामींच्या गोष्टी झाल्या. मला पाहिजे ते मिळालेच नाही. मी निराश होऊन परत आलो.

कै. तात्यासाहेबांनी हिंदूंच्या जुन्या चालीरीतींची कठोरपणाने चेष्टा केली आहे. कै. तात्यासाहेब त्या वेळचे सुधारक होते. पण मला त्या वेळी व पुढे कधीही ते नास्तिक वाटले नाहीत. 'नभाच्या चांदण्यात' 'रविचंद्रांची' भूषणे लटकाविणाऱ्या व धरणीवर प्रेम करणाऱ्या 'प्रभो विभोची' अगाध करणी पाहून विस्मित होणारा कवी नास्तिक असू शकत नाही, असे मला वाटते. उत्तर वयात कै. तात्यासाहेबांचे मधून मधून ओठ हालताना दिसत. त्यांच्या काही मित्रांच्या म्हणण्याप्रमाणे ते जपही करीत असावेत. काहीही असले, तरी 'हे प्रभो विभो' हे पद करणारा कवी मनोमय श्रद्धावान व आस्तिक असला पाहिजे, असे मला वाटते. या पदातील तत्त्वज्ञान मला समजू लागल्यानंतर कै. तात्यासाहेबांच्या विषयी माझा आदर फार वाढला. कै. तात्यासाहेबांचा कटाक्ष मूर्खपणाच्या रूढींवर होता. श्रद्धेवर नव्हता.

* * *

कै. तात्यासाहेबांचे वडील बंधु कै. दादासाहेब अकोल्याला प्रख्यात डॉक्टर होते. हे माझ्या वडिलांचे

मित्र होते; व कै. दादासाहेब व त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीकाकू मला मुलासारखा मानीत. कै. लक्ष्मीकाकूंच्या खटपटीनेच माझा विवाह कै. तात्यासाहेबांच्या बहिणीच्या मुलीशी झाला. अशा तऱ्हेने मी कोल्हटकर घराण्याच्या विशाल परिवारात सामील झालो.

* * *

हा काल १९२१ ते २५ पर्यंतचा असावा. त्या वेळी वऱ्हाडातील बहुतेक सुखवस्तु लोक उन्हाळयात पुण्याला थंड हवेकरता जात. पुण्याच्या जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक कै. बाबासाहेब गोंधळेकर हे आतिथ्याबद्दल प्रसिद्ध. त्यांच्या पत्नी वऱ्हाडातील दारव्ह्याच्या थत्ते घराण्यातील. तेहि घराणें तात्यासाहेबांच्या नात्यातले. त्यामुळे वऱ्हाडातील मित्र व नातेवाईक उन्हाळयात पुण्याला शनिवार पेठेतील गोंधळेकरांच्या प्रशस्त वाडयात आपुलकीने यावयाचे व महिना महिना राहावयाचे. गोंधळेकरांची सून ही कै. तात्यासाहेबांची भाची. त्यामुळे कै. तात्यासाहेबही मधून मधून तेथे येत. कै. बाबासाहेबांचे चिरंजीव कै. नानासाहेब माझे साडू. म्हणून आम्हीही तेथे बहुतेक दर वर्षी जात होतो. या भेटीगाठीमुळे तेथील वास्तव्यात माझा व कै. तात्यासाहेबांचा जास्त संबंध आला.

कै. तात्यासाहेबांना भेटायला खूप मंडळी येत. भाऊसाहेब माडखोलकरांची व आमची पहिली भेट तेथे झाली. कै. तात्यासाहेब बहुधा सकाळी बाहेर जात. त्यांना घरी भेटायला येणारी मंडळी म्हणजे २५-३० वयापर्यंतचे तरुण व तशाच तरुणी. तात्यासाहेब फार साधे. बोलण्याच्या भरात सरकत सरकत बोलणारा तरुणाशी व्हायचा व कै. तात्यासाहेब समोर व्हायचे. आम्हाला हे आवडत नसे.

अशा या बैठकी खूप रंगत. तात्यासाहेब बोलायचे हळूहळू. ओठावर स्मित असावयाचे. गोष्टी नाटकांच्या, काव्यांच्या व पदांच्या. मला त्यात काही समजत नसे. पण कै. तात्यासाहेबांच्या भाचीला त्या गप्पांत फार गोडी. मधूनच एखादी सुरेल तान घेतली जायची. मध्येच खसखस पिकायची. सर्व मंडळी नाटयानंदात व काव्यशास्त्रविनोदात मग्न व्हायची.

अशा बैठकीत कै. तात्यासाहेबांच्या भोवतालची तरुण मंडळी मोकळेपणाने बोलत हसत खेळत. पण त्यांची कै. तात्यासाहेबांच्या विषयींची आदराची भावना नेहमी जागृत असे, ही गोष्ट प्रकर्षाने माझ्या ध्यानात येई. अशीच एक बैठक बसली होती. गोष्टी रंगल्या होत्या. तात्यासाहेबांच्या भोवती तरुणतरुणी होत्या. सर्वच तरुणांनी मिशा काढलेल्या होत्या. तरुणी तर चन्द्रवदनाच होत्या. मध्येच तात्यासाहेब म्हणाले, "आज मला माझ्या मिशांची लाज वाटत आहे." सर्व मंडळी हसायला लागली. तात्यासाहेबांनी नुसते स्मित केले.

अशीच एक बैठक रंगली होती. कै. तात्यासाहेब काही तरी सांगत होते व सर्व मंडळी सावधानपूर्वक ऐकत होती. तात्यासाहेबांची भाची (माझी पत्नी) त्यांचेकडे लक्ष लावून पाहात होती.

"मने, (माझ्या पत्नीचे माहेरचे नाव) अशी टक लावून काय माझेकडे पाहाते आहेस ? माझी नक्कल करणार आहेस की काय ? मला तुझी भीती वाटते या बाबतीत," तात्यासाहेब म्हणाले.

एकदम खूप हशा पिकला. मुलींत फिसफिस सुरू झाली. तात्यासाहेबांच्या गाण्याचा व नाटयाचा वारसा त्यांच्या भाच्यांत आलेला आहे, अशी चर्चाही सुरू झाली.

असा काल मजेतीत होत होता. अशीच आणखी एक मैफल बसली होती. त्या दिवशी बहुधा गोंधळेकरांच्या घरचेच श्रोते जास्त असावेत. तात्यासाहेब खुषीत होते. गाणी म्हटली जात होती. तात्यासाहेब मिटलेल्या डोळयांनी गाणी ऐकत होते. मग तात्यासाहेबांना गाण्याचा आग्रह झाला आणि महाराष्ट्र साहित्य सम्मेलनाचा अध्यक्ष असलेला श्रेष्ठ पुरुष मुलींच्या आग्रहाने स्वतः गाऊ लागला--

"आज काल होति न वश पति असे सये
(मधले दोन तीन शब्द मला आता आठवत नाहीत)
... ... ढंग नव नवे"

तरुण मुलींनी 'इऽश्श' असा चीत्कार केला. प्रौढा थोडया लाजल्या व थोडया हसल्या. पुरुषांची हास्याची खसखस पिकली. तात्यासाहेब गात होते.

त्या ठिकाणी १५ वर्षांपासून ते अंदाजे साठ वर्षांपर्यंतची मंडळी होती. सर्वजण गाणे ऐकण्यात तल्लीन झाले होते. सुस्वर, सुरेल गाणे व आपुलकी

या दोन गोष्टींचा हृद्य आविष्कार तेथे दिसून येत होता. असा काव्यानंद आम्ही मंडळी उपभोगीत होतो.

*　　*　　*

१९२५च्या मे महिन्यात कै. तात्यासाहेबांच्या एकुलत्या एका कन्येचे म्हणजे कमलताईंचे लग्न नाशिक येथील प्रो. भा. ल. पाटणकर यांचेशी झाले. त्याच वेळी तात्यासाहेबांचे धाकटे बंधु कै. अण्णासाहेब यांची मुलगी विमल हिचे लग्न श्री. पुरुषोत्तम यशवंत ऊर्फ बाबासाहेब देशपांडे यांचेशी झाले. या दोन्ही लग्नाकरिता म्हणून कोल्हटकरांचे अनेक नातेवाईक व परिवार जमला होता. त्यात खूप श्रीमंत होते. सामान्य लोक होते. सर्वच बरोबरीने व आनंदाने राहिले.

या सोहळचात एक गोष्ट जाणवली व ती म्हणजे सर्व मंडळी सावित्री आजींचा खूप मान ठेवीत ही. प्रत्येक गोष्ट त्यांच्या तंत्राने व्हावयाची. त्या कै. तात्यासाहेबांच्या सावत्र मातुश्री. तात्यासाहेबांची सख्खी बहीण अनूताई जोशी (आमच्या सासूबाई). सावित्रीबाईंच्या चार मुली. पण येथे सर्वच एक. सख्खे व सावत्र यांमधील रेषा पुसूनच टाकली होती. तात्यासाहेब व कै. अण्णासाहेब आपल्या मातुश्रींना खूप मानीत; व त्यांच्या पत्नीही त्यांना यथायोग्य मान देत. सख्खी व सावत्र असा जर कोणी भेद केला, तर आमच्या सासूबाई फार रागावत. हा कोल्हटकर मेळावा, हे धर्मार्जुनासारखे दोन भाऊ तात्यासाहेब व अण्णासाहेब निरनिराळचा विचारांचे. पण, एकमेकावर प्रेम करणारी त्यांची मुले, मुली व वहिणी हा सर्व सुखी परिवार पाहून मनाला प्रसन्न वाटे; व प्रेमाच्या अगाध करणीचे कौतुक वाटे.

*　　*　　*

मुलीचे लग्न झाल्यावर कै. तात्यासाहेब नाशिकला आपल्या जावयाकडे उन्हाळचाचे सुटीत पुष्कळ वेळा जात असत. जावई श्री. बाबूराव पाटणकर हे तेथील कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक होते. कै. तात्यासाहेब पाटणकरांकडे असताना आम्हीही एक दोन वेळ तेथे होतो. महाराष्ट्र साहित्यसम्मेलनाचे अध्यक्षीय भाषण कै. तात्यासाहेबांनी आपल्या जावयाचे घरी लिहिल्याचे मला स्मरते.

प्रो. पाटणकर हे विद्वान व अभ्यासू गृहस्थ. इंग्रजी साहित्याशी त्यांचा गाढ परिचय. तेव्हा सासऱ्या–जावयांची वाङ्मयीन जुगलबंदी नेहमी व्हावी यात नवल ते कसले! कै. तात्यासाहेब आपले जावयांचेजवळ घरच्या व्यवहारासंबंधी बोलत. सौ. कमलाताईंना पित्याच्या विनोदवृत्तीचा वारसा आलेला. त्या बोलायच्या थोडचा, पण मधूनमधून अशा काही विनोदाच्या फेकी फेकायच्या की आम्ही ऐकतच रहावे. सासरे, जावई व मुलगी यांचे काव्यशास्त्र व विनोदमिश्रित संवाद ऐकताना माझ्यासारखा वादीप्रतिवादींच्या झगडचात घोटाळणारा नोकरीपेशाचा मनुष्य आदराने व आश्चर्याने स्तिमित होऊन जाई. कै. तात्यासाहेबांचे नाशिकच्या टिळक घराण्याशीही मैत्रीचे संबंध होते. कुटुंबवत्सल तात्यासाहेबांचे हे दर्शन किती हृद्य होते!

*　　*　　*

या कोल्हटकर संप्रदायात मधून मधून राहिल्यामुळे मलाही लेखनाची हौस वाटू लागली; व मी इ. स. १९२४ साली माझे पहिले पुस्तक "१९२४ चा महाराष्ट्र" हे लिहिले. त्या वेळी त्या वेळच्या 'शारदा' मासिकाचे संपादक काशीकर व आजचे प्रसिद्ध लेखक नारायण हरी आपटे उमरावतीला माझे घरी पुस्तक लिहून घेण्याकरिता येऊन राहिले होते.

यापूर्वी मी थोडे बहुत स्फुट लेखन केले होते व विदर्भ साहित्य संघाच्या कामात भाग घेऊन साहित्यक्षेत्रात थोडीबहुत लुडबुड करावयाला लागलो होतो. हरि, कवि असे शब्द शिकल्यावर 'द्विपसममदे' भरायला सुरवात झाली होती.

आपल्या पहिल्या पुस्तकाला कै. तात्यासाहेबांनी प्रस्तावना लिहावी. असे आम्हाला वाटले. तात्यासाहेबांच्या प्रस्तावनेने आपल्या पुस्तकाला साहित्यिक जगात किंमत व महत्त्व येईल हा विचार मनात होताच. तात्यासाहेबांशी बरीचशी जवळीकही झाली होती. शिवाय मी त्यांचा जावईही होतो व त्यांच्या लाडक्या भाचीची मला शिफारस होती.

एका सुमुहूर्तावर मी तात्यासाहेबांना माझ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याकरता विनंतीदाखल पत्र पाठविले.

सुमारे ८ दिवसांत कै. तात्यासाहेबांकडून नकारार्थी उत्तर आले. "तुमचे व माझे नात्याचे जवळचे संबंध असल्यामुळे तुमच्या पुस्तकाला मी

प्रस्तावना लिहिणे योग्य होणार नाही," असा त्यांच्या पत्राचा मथितार्थ.

आम्ही स्तिमित झालो. आपल्या विद्वान श्वशुरांनी आपली एवढी लहानशी विनंती मानली नाही याचे दुःख झाले. मनाला ही गोष्ट त्या वेळी लागली. पुढे कै. बाबासाहेब खापर्डे यांनी, माझी ही मनःस्थिती ओळखून, माझ्या त्याच पुस्तकाला सुंदर प्रस्तावना लिहून देऊन, त्याला वाङ्मयीन जगात महत्त्व आणून दिले, ही गोष्ट वेगळी.

पण, पुढे काही दिवसांनी मला वाटू लागले की, तात्यासाहेबांनी माझ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली नाही, हे एका अर्थी बरेच झाले. पुस्तक तयार होऊन माझ्या हातात आले. त्यातील छपाईच्या चुका पाहून मी घाबरूनच गेलो. तात्यासाहेब शुद्धलेखनाच्या बाबतीत फार चोखंदळ आहेत, हे मला कळले होते. त्यांनी हे पुस्तक जर वाचले असते, तर कदाचित् त्यांना आढळलेल्या पुस्तकातील छपाईच्या चुकांची यादी हीच त्यांच्या प्रस्तावनेपेक्षा मोठी झाली असती. असो ! जे काही होते ते बऱ्याच करता होते नाही का ? या पुस्तकाला पुढे डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी व इंदूरचे ग्रंथोत्तेजक मंडळी या दोन संस्थांकडून पुरस्कार मिळाला, हे मला त्यातल्या त्यात समाधान.

या गोष्टीचा पुढे मी विचार केला; व तात्यासाहेबांच्या लिहिण्यात बरेचसे तथ्य होते, ही गोष्ट मी माझ्या मनाशी कबूल केली.

तरीपण मला तात्यासाहेब साहित्यिक समजत नव्हते, अशी माझी समजूत झाली. माझ्या 'आंधळे प्रेम' या गोष्टीचा इंग्रजी अनुवाद Love is Blind या नावाने केला; व ती इंग्रजी गोष्ट मद्रासच्या 'त्रिवेणी' मासिकात प्रसिद्ध झाली. त्या कात्रणाची एक प्रत मी तात्यासाहेबांकडे पाठवली. त्यावर त्यांचा एक गोलमाल अभिप्राय आला. मी तात्यासाहेबांच्या मते साहित्यक्षेत्रात कुठे जागा आहे हे ओळखून घेतले व आपली कुवत ओळखूनच त्या क्षेत्रात वाटचाल करू लागलो.

* * *

इ. स. १९३२–३३ मध्ये तात्यासाहेबांच्या स्फुट लेखांची जुळणी करून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची कल्पना निघाली. त्या वेळी या ग्रंथाच्या प्रसिद्धीच्या निमित्ताने माझा त्यांचे शिष्य भाऊसाहेब माडखोलकर यांचेशी जास्त संबंध आला. तात्यासाहेबांच्या लेखांचे काही अभ्यासू लोकही भेटले. त्यांच्या बोलण्यावरून व तात्यासाहेबांच्या काही लेखांवरून त्यांचे स्थान मराठी साहित्यिकात किती वरच्या दर्जाचे आहे, याची आम्हाला कल्पना आली.

* * *

१९३३ च्या दिवाळीच्या सुमारास माझी जळगाव (जामोद) येथे सबजज्ज म्हणून बदली झाली. तेथे मी थोडे महिने राहाणार होतो. तेथील कोर्टातच तात्यासाहेब वकिली करीत होते; व काही महिन्यांपूर्वीच ते आपल्या वकिलीच्या कामातून पूर्णपणे निवृत्त झाले होते. त्यांची प्रकृतीही चांगली नव्हती; व ते हवा पालटायला पुण्याला त्यांचे बंधु अण्णासाहेब यांचेकडे जाणार आहेत, अशी बोलवा होती.

न्यायाधीश या नात्याने मला जुन्या मुकदम्यांचे कागदपत्र एखाद्या समोर असलेल्या मुकदम्यात सहाय्यभूत व उपयोगी म्हणून पहाण्याचा प्रसंग येई. काही मुकदम्यात तात्यासाहेबांनी दाखल केलेले दावे व काहींत प्रतिवादीचे वकील या नात्याने त्यांचेकडून दिलेले जबाब पाहायला मिळत. तात्यासाहेब आपले म्हणणे थोडक्यात लिहीत. सोप्या भाषेत व स्पष्टपणाने द्व्यर्थी शब्द न वापरता लिहीत. त्यात लपवाछपवी नसे. कोणत्याही न्यायाधीशाला त्यांचे म्हणणे पटावे असे त्यांचे जबाब असत. यावरून तात्यासाहेब हे एक वरच्या दर्जाचे वकील आहेत असे मला वाटले. जळगावहून बदलून गेलेल्या कित्येक न्यायाधीशांनी तात्यासाहेबांच्या कामाची व त्यांनी दिलेल्या सहकार्याची माझ्याजवळ स्तुती केली. इतर न्यायधिशांनी सुद्धा त्यांची केलेली ही स्तुती ऐकून मला तात्यासाहेबांच्या संबंधाने जास्तच आदर वाटू लागला.

* * *

तात्यासाहेबांना आम्ही जळगाव (जामोद) येथे बोलावणे केले व त्यांनीही आमचेकडे येऊन चार दिवस राहाण्याचे कबूल केले. आम्हाला फार आनंद झाला. आजपर्यंत तात्यासाहेब आम्हाला थोडा वेळ भेटत. आता ते आमचेकडे येऊन रहाणार होते. आमचा पाहुणचार घेणार होते. आम्ही त्यांच्या स्वागताची तयारी करू लागलो. त्यांच्या भाचीला झालेला आनंद

वेगळाच होता. तात्यासाहेवांच्या करता कोणते खायचे पदार्थ करावयाचे अशा सारख्या महत्त्वाच्या गोष्टींचा आमच्या घरी खल होऊ लागला.

तात्यासाहेव जळगावला वकिली करीत होते; व ते एक यशस्वी व सरळ वकीलही होते. तेव्हा अशा यशस्वी वकिलाची तसवीर याच वेळी वकिलांचे कोठीत लावावी अशी एक सूचना आली; व ती वकील वर्गाला मान्य झाली. रीतीप्रमाणे अकोल्याच्या जिल्हान्याया-धीशांना या बाबतीत परवानगी मागितली गेली; व त्यांनी ती आनंदाने दिली. जळगाव शहरातही काही कार्यक्रम आखले गेले.

ता. २३ मार्च १९३४ रोजी तात्यासाहेव जळ-गावला आले. त्या वेळी आम्ही एका वोहरी गृहस्थाच्या वगिचातील बंगल्यात भाड्याने राहत होतो. तात्या-साहेव आमचेकडे उतरले.

ता. २४ ला दुपारी वकिलांच्या कोठीत तात्या-साहेवांच्या तसविरीचा अनावरण समारंभ होता. हा कार्यक्रम घाईने ठरविला गेला असल्यामुळे नवीन तसवीर करून घ्यावयाला वेळच मिळाला नाही. म्हणून प्रसंग साजरा करण्याकरता एका खाजगी ठिकाणाहूनच ती तसवीर आणली; व नवीन तयार झाल्यावर जुनी परत पाठवायचे ठरले.

समारंभ दुपारी ३ वाजल्यानंतर झाला. वकील-वर्ग व न्यायदानाशी संबंध असणारे सरकारी अधिकारी इतक्यांनाच बोलावणी केली गेली होती. भाषणे झाली. तात्यासाहेवांचे गुणवर्णन झाले. ते किती सरळ वकील होते हे सांगितले गेले; व टाळयांच्या कडकडा-टात तात्यासाहेवांचा फोटो वकीलांचे कोठीत समारंभ-पूर्वक लावला गेला. मला त्या वेळी अतीव समाधान वाटले.

त्या रात्री तात्यासाहेवांची भाची भलतीच खूष होती. आपल्या मामांविषयी आदर व प्रेम तिच्या वागण्यात व बोलण्यात पदोपदी दिसून येत होते. तात्यासाहेव कौतुकाने आपल्या भाचीकडे पाहात होते. कदाचित् माझेकडेही पहात असावेत. त्या रात्री आम्ही खूप आपुलकीने बोललो. आम्ही खूपच जवळ आलो होतो.

बोलताना सहज गोष्टी निघाल्या. संसारातील अडचणी तात्यासाहेव आम्हाला सांगत होते. बोलताना मध्येच गंभीर झाले व म्हणाले, "बाबूराव, थोडेबहुत पैसे वाचवा. म्हातारपणी आपल्याजवळ थोडाबहुत पैसा असला, तरच लोक तुम्हाला विचारतील. पैसा सांभाळून खर्च करा."

एक कर्मयोगी एका जिज्ञासूला व्यवहार सांगत होता. मी तात्यासाहेवांचेकडे पाहिले. त्यांचे डोळे भरून आले होते. त्यांनी शब्दांनी जितके सांगितले, त्याच्यापेक्षा कितीयेक जास्त गोष्टी मला त्यांच्या मौनाने कळल्या.

* * *

त्या वेळी माझ्या थ्राकटचा मुलाच्या डोळ्यांत खुपऱ्या झाल्या होत्या. सकाळी डोळे धुताना त्याचे डोळ्यातून रक्त येई व तो खूप रडे. त्या वेळी तात्या-साहेवांनाही दुःखावेग आवरत नसे. मला हे दुःख पाहावत नाही, असे तात्यासाहेव म्हणत.

या विशालहृदयी पुरुषाच्या प्रेमळ अंतःकरणाचा हा हृद्य आविष्कार आम्ही पाहिला.

* * *

ता. २४ मार्च रोजी तात्यासाहेवांच्या हातून नवीन ग्रंथालयाचे उद्घाटन झाले. त्या दिवशी शहरा-तील सामान्य जनता तात्यासाहेवावर किती खूष होती हे दिसून आले. ता. २५ रोजी तेथील मित्र-समाजाने त्यांना एक मोठी पार्टी दिली. ता. २६ व २७ रोजी त्यांच्या वकीलमित्रांकडे त्यांना जेवणे झाली.

लहानसे जळगाव, नाना रीतीने, आपले तात्या-साहेवांच्या वरचे प्रेम व्यक्त करीत होते. त्या आनंदात आम्हीही बुडून गेलो होतो.

* * *

तात्यासाहेव आमचेकडेच असल्यामुळे त्यांच्या भाचीला तात्यासाहेव रात्री मोकळे मिळत.

तात्यासाहेवांच्या आवडीचे विविध पदार्थ बनत व तात्यासाहेव नको नको म्हणत ते खात. तात्या-साहेवांची खाण्यावरील आसक्ती हा त्यांच्या घरातील मंडळीत मोठा थट्टेचा व बराचसा कौतुकाचा विषय होता.

"तात्यामामा ! तुम्ही पुरुषमंडळी, पाहुणे-मंडळी आणता. बडेजाव करता व मग खर्च जास्त

झाला की बायकांना का हो रागावता व मग बायकांना का दोष देता ?" त्यांची भाची त्यांना एकदा म्हणाली.

त्यांची भाची असे का म्हणाली, हे माझ्या ध्यानात आले व मी हसलो. तात्यासाहेब कौतुकाने उद्गारले, 'मनं !' आम्ही सर्व हसलो. आम्हा सगळ्यांना काय ते समजले. घरोघरी मातीच्या चुली.

*　*　*

मामा-भाचीची संगीतासंबंधी बोलणी होत. गाण्याची एखादी लकेर छेडली जाई. गुरुशिष्येचे नाते होई. तात्यासाहेब सांगत, शिष्या ऐके.

एकदा त्यांच्या 'महाराष्ट्र गीता'वरून गोष्टी निघाल्या. त्या वेळेपर्यंत 'महाराष्ट्र गीत' ज्या चालीत गाइले जाई, त्या चाली तात्यासाहेबांना पसंत नसाव्यात. "मने" तात्यासाहेब एकदा आपल्या भाचीला म्हणाले, "माझ्या मनात मी लावलेल्या चालीवर तुझ्याकडून ते गीत बसवून घ्यावयाचे आहे व त्या गाण्याची रेकार्ड करवून घ्यायची आहे." त्यांची भाची आनंदाने अश्रुपात करू लागली. मी हा देखावा पाहून गहिंवरलो.

नियतीला हे घडून यावे, असे वाटत नव्हते.

*　*　*

जळगाव येथील भरगच्च कार्यक्रम आटोपून आम्ही तात्यासाहेबांना ता. २७ मार्च रोजी खामगावला पोचवून दिले.

*　*　*

तात्यासाहेबांचे शिष्य भाऊसाहेब माडखोलकर यांनी आम्हाला तात्यासाहेबांच्या आठवणी लिहायला सांगितल्या. सगळा जुना इतिहास डोळ्यांपुढे उभा राहिला. किती तरी आठवणी ! काही आठवणी लिहायच्या असतात, काही बोलायच्या असतात व काही सांगायच्या असतात. येथे काही आठवणी लिहिल्या आहेत. आता लेखाचा शेवटही जवळ आला आहे.

*　*　*

खामगावहून तात्यासाहेब आपले धाकटे बंधु अण्णासाहेब यांचेकडे प्रकृतिस्वास्थ्याकरता गेले. उन्हाळ्याच्या सुटीत आम्हीही जळगाव सोडले. ता. २८ मे रोजी आम्ही पुण्याला पोहोचलो. आम्ही नेहमीप्रमाणे आमचे साडू गोंधळेकर यांचेकडे उतरलो होतो. ता २९ ला आम्ही तात्यासाहेबांना भेटायला अण्णासाहेब कोल्हटकर यांचेकडे गेलो. त्या वेळी अण्णासाहेब कर्वे रोडवर भाड्याचे बंगल्यात राहात होते. त्या दिवशी तात्यासाहेबांची प्रकृती चिंताजनकच दिसली. तात्यासाहेब स्वस्थ पडले होते.

"तात्यासाहेबांना कोणालाही भेटायची इच्छाच नाही,"—मला वाटते, आमचे वळवंतराव कोल्हटकर हे म्हणाले असावेत,—"त्यामुळे घरच्या कोणालाही तारा किंवा पत्रे पाठविली गेली नाहीत."

आम्ही काही थोडा वेळ थांबून परतलो. त्या दिवशी तात्यासाहेबांना भेटायला खामगावचे भिडे वकील व अण्णासाहेब कर्वे व त्यांच्या पत्नी आल्या होत्या.

ता. ३० ला संध्याकाळी आम्ही पुन्हा तात्यासाहेबांना भेटायला गेलो. अण्णासाहेबांचे घरी त्या वेळी त्यांच्या कन्या सौ. विमलाबाई देशपांडे व त्यांचे पती बाबासाहेब (पी. वाय.) देशपांडे व घरातील इतर मंडळी होती. त्या दिवशी तात्यासाहेबांची प्रकृती जास्तच वाईट दिसली.

तात्यासाहेबांची कोणचीही कौटुंबिक इच्छा उरली नव्हती. त्यांना कोणालाही भेटायचे नव्हते. आयुष्यातील चढउतारांनी, यशापयशाच्या आघातांनी थकलेला पण लढाई न हरलेला हा वीर परलोकाला जाण्याची तयारी करीत आहे की काय असे आम्हाला वाटले. कोणत्याही प्रसंगी विचलित न होणाऱ्या, सर्व जन्म अविचलततेने व न्यायनिष्ठुरतेने न्यायाधीशाचे काम केलेल्या अण्णासाहेबांच्या चेहेऱ्यावर काळजीची दाट छटा दिसली. त्यांचे डोळे भरून आलेले होते. ते पाझरलेही असतील.

*　*　*

ता. १ जूनला सकाळी श्री. अण्णासाहेबांचे चिरंजीव श्री. बाळासाहेब कोल्हटकर आमचेकडे आले; व त्यांनी आम्हाला तात्यासाहेब गेल्याची वार्ता सांगितली.

आम्ही अण्णासाहेबांच्या बंगल्यावर गेलो. मंडळी जमू लागली होती. पुण्याचे पुष्कळसे साहित्यिक मला तेथे दिसले. मी व अण्णासाहेबांचे जावई श्री. बाबासाहेब देशपांडे यांनी तात्यासाहेबांच्या कलेवराला प्रथम खांदा दिला.

त्या दिवशी 'ज्ञानप्रकाश'ने निराळे बातमीपत्र काढून तात्यासाहेबांच्या निधनाची दुःखद वार्ता पुण्याला कळविली होती.

ओंकारेश्वरावर भाषणे झाली. सर्व संस्कार झाले. तात्यासाहेबांचा नश्वर देह अग्नीच्या स्वाधीन झाला.

व्यथित अंतःकरणाने आम्ही घरी परतलो.

तात्यासाहेब नाटककार होते, टीकाकार होते, विनोदी लेखक होते. ज्योतिषशास्त्राचा त्यांचा जाडा अभ्यास होता; ते उत्तम कायदेपंडित होते; ते गायक होते; व त्या शास्त्राचे दर्दी होते. ते उत्तम निबंधलेखक होते. ते आणखी कित्येक गोष्टी असतील. आम्हाला तात्यासाहेब कुटुंबवत्सल म्हणून आवडत.

तात्यासाहेब गेले पण एक श्रेष्ठ साहित्यिक अशी त्यांची कीर्ती महाराष्ट्रात नेहमी राहील. त्यांच्या विद्वत्तेविषयी आदर महाराष्ट्राला नेहमी राहील. गानलुब्धांना त्यांच्या संगीताची आठवण राहील आणि त्यांच्याशी संबंध असलेल्या आमच्यासारख्या नातेवाइकांना व इतर जनांना त्यांच्या प्रेमाने लवचीक होणाऱ्या मनाची व माणुसकीची नेहमी आठवण राहील.

*　*　*

जगात सगळेच ज्याला चांगला म्हणतात किंवा सगळेच ज्याला वाईट म्हणतात, असा मनुष्य जन्माला यायचा आहे, असे भगवान बुद्धांनी एके ठिकाणी म्हटले आहे. आम्हाला त्यांच्या स्वभावातली वत्सलता आवडली. तात्यासाहेब गेले. हा श्रेष्ठ तत्त्वज्ञानी नाटककार, हा अनेक कलांचा ज्ञाता व भोक्ता "प्रभो"ने केलेला मनुष्य चंद्र–सूर्यापलीकडे, नभापलीकडे असलेल्या ब्रह्मतत्त्वात विलीन झाला. आता जगाच्या समोर आहेत त्यांच्या कलाकृती. आमच्या सारख्यांच्या पुढे आहे त्यांचे वात्सल्य व साधेपणा.

कोल्हटकरविषयक पत्रे

'दामिनी' हे नाव कसे सुचले ?

प्रा. म. ल. वऱ्हाडपांडे यांचे पत्र

श्री. संपादक, 'युगवाणी' यांस,

स. न. वि. वि. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी हिराबाई पेडणेकरांना 'दामिनी' नाटक लिहिताना 'सूचनारूपाने बरीच मदत केल्याचे' सर्वविश्रुत आहे. पण नाटकाचे 'दामिनी' हे नाव देखील कोल्हटकरांनी सुचविले असल्याची शक्यता आहे. १९०० साली 'विविधज्ञानविस्तारा'त (पु. ३१, अंक ९–१०) 'दोन सामाजिक नाटके' नावाचा समीक्षणात्मक टीकालेख कोल्हटकरांनी लिहिला. 'संगीत रूढिविनाशन' व 'तरुबाला' या नाटकांवर त्यांनी या लेखात अभिप्राय दिला आहे. 'तरुबाला' हे अमृतलाल बोस या ख्यातनाम बंगाली साहित्यिकाच्या नाटकाचे मराठी भाषांतर. 'नाजुक अभिरुची'च्या बंगाली लोकांतील ललितरम्य नावांनी सौंदर्यासक्त कोल्हटकरांच्या संवेदनक्षम मनाला आकर्षून घेतल्याचे दिसून येते. ते लिहितात,––

"या पुस्तकाचे वाचन म्हणजे रम्य उद्यानातील स्वैर विहारच होय. पात्रांची नुसती नावेही परिमलाने पूर्ण. एकीचे नाव तरुबाला, तर दुसरीचे आमोदिनी व तिसरीचे दामिनी. नावे केवळ घ्राणेंद्रियासच आनंद देणारी नावे आहेत असे नसून, जिव्हेलाही पाझर फोडणारी आहेत. पारुल या वेश्येच्या एका मैत्रिणीचे नाव किसमिस! खरोखर पुरुषांची नावेही अशीच मोहक. नायकाचे नाव अखिलचंद्र व त्याच्या मानीव आजोबाचे मृत्युंजय. खरोखर आमोदिनीसारखी चतुर व सुंदर स्त्री ज्याची अर्धांगी तो मृत्युंजय का होणार नाही ?"

या परिच्छेदावरून 'दामिनी' या नावाचे आकर्षण कोल्हटकरांना १९०० साली वाटले होते, हे स्पष्ट दिसते. त्यांच्या अंतर्मनात आपल्या मोहकतेमुळे रुजून बसलेले हे नाव हिराबाईंना 'सूचनारूपाने मदत करताना,' त्यांच्या नाटकात संक्रमित झाले असण्याची शक्यता आहे.

श्री. राम कोलारकर यांनी संपादिलेल्या 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा' या ग्रंथाच्या कथासूचीत हिराबाईंच्या खालील कथा नमूद केल्या आहेत,––

उद्यान मासिक : साल १९१०–माझे आत्मचरित्र
शेवटी प्रयत्न निष्फल झाले.

चित्तविनोदमाला : साल १९१३–जुने पत्र. कमलकुमारी

यापैकी माझे 'आत्मचरित्र' ही कथा न म्हणता विनोदी लेख म्हणणे जास्त शोभेल. त्यावर श्री. कृ. कोल्हटकरांची सुस्पष्ट छाप आहे.

१९ ऑगस्ट १९७०
बी ८/४ अॅनेक्सी
पूर्वी मार्ग, नवी दिल्ली ५

आपला
म. ल. वऱ्हाडपांडे

अनुक्रमणिका

कोल्हटकरांवरील दोन पुस्तकें

श्री. आनंद साधले यांचे पत्र

श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांस,

सविनय नमस्कार, वि. वि. रहावले नाही म्हणून हे पत्र पाठवून तुम्हाला त्रास देत आहे आणि तुमचा वेळ घेत आहे, क्षमा असावी.

माझ्या पुस्तकाच्या मुद्रणातून परवा तीन तारखेला मोकळा झालो आणि त्यानंतर ज्यांची अनेक दिवस वाट पाहात होतो ती, तुमचे व प्रा. वराडपांडे यांचे अशी, कोल्हटकर व हिराबाई यांवरील दोन्ही पुस्तके आणून वाचली. ही पुस्तके वाचून अवर्णनीय आनंद झाला. मराठीचे साहित्य समृद्ध करणाऱ्या एका विलक्षण दालनाची पायाभरणी झाली, असे वाटले. त्यावरोबरच, जे तुम्हीच केले तर होईल अशा एका झालेच पाहिजे स्वरूपाच्या कामाची आठवण झाली. ते काम म्हणजे माधवराव पटवर्धन व शांताबाई कशाळकर यांच्यावरही एक असाच ग्रंथ लिहिला गेला पाहिजे. तुमच्या लिखाणात यासंबंधाने आलेला मजकूर मी वाचला आहे. तुम्हाला राग येऊ नये, अशी विनंती करून लिहितो की, तो वाचताना माधवरावांवर तुमचा राग असावा, असा भास मला झाला होता. ते लिखाण कमी अधिक व्यक्तिनिष्ठ भूमिकेतून झाले असल्याने तो राग समजण्याजोगा होता. परंतु या विषयाचा वस्तुनिष्ठ आलेख काढणारा संपूर्ण ग्रंथ मराठीला हवा आहे. श्री. गं. दे. खानोलकर, घाटे, गिरीश, रानडे, क्षीरसागर ही सारी माणसे सुदैवाने आहेत, तोवर हे काम होणे जरूर आहे. तुम्ही स्वतः या वयात हे कष्ट करावे, असे सुचविण्याचे धाडस मी करणार नाही. परंतु प्रा. वऱ्हाडपांडे यासारख्या आपल्या नजिकच्या कुणा तरी समर्थाकडून ते व्हावे अशी प्रेरणा तुम्हीच देऊ शकाल. अशा कामाला हात घालण्याची माझी स्वतःची बौद्धिक व भावनिक लायकी नाही. नाही तर हे काम तुमच्या पायांशी बसून करण्याची परवानगी मीच मागितली असती.

तुमची वरील दोन्ही पुस्तके वाचून झालेला आनंद द्विविध आहे.

एक तर, त्या पुस्तकांच्या स्वरूपाने असे एक दालन उघडले जात आहे की, जे निश्चयाने लोकांपर्यंत भरभराटीला येईल. या लेखनपद्धतीबद्दल कुठे तरी, (कुठे ते स्मरण करूनही आठवत नाही),--काही लोक गुरूच्या भानगडी उजेडात आणीत आहेत,—असे कुचाळीने लिहिलेले वाचले होते. अर्थात् ही गोष्ट जमेस धरूनच तुम्ही हे आनंददायक सत्कार्य केलेले आहे. मराठीचे, गुरूचे, गुरुभगिनीचे ऋण तर तुम्ही चिकाटीचे कष्ट करून फेडलेले आहेच; पण मराठीच्या वाचकालाही तुम्ही ऋणी करून ठेवलेले आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे व्यक्तिशः माझे तुम्ही पुष्कळच उन्नयन केले आहे. मी सहस्रशः पुस्तके वाचली आहेत. पण 'सुदाम्याचे पोहे' सोडून कोल्हटकरांचे काहीही आनंदाने वाचू शकलो नाही. माझ्या कल्पनेप्रमाणे १९४० च्या सुमारास केव्हा तरी त्यांचे बहुधा 'जन्मरहस्य' नाटक वाचायचा प्रयत्न केला आणि त्यात मुळीच रस न वाटल्याने त्याचा नाद सोडून दिला. त्यानंतर मला सतत प्रश्न पडलेला असे की, ज्यांचे साहित्य इतक्या लौकर लोकांच्या नजरेआड झाले, त्या लेखकाच्या मागे एवढ्या महान् शिष्योत्तमांची परंपरा उभी राहिली, ती कशामुळे ? मी एक सामान्य वाचक. माझे प्रश्न सुचत आणि विरत. पण अनेक अभ्यासकांनाही हा प्रश्न सुचलेला असेल. त्याचे समर्पक आणि पटणारे उत्तर तुम्ही समर्थपणे दिले आहे. हे अतिशय मोठे काम झाले आहे आणि ते इतक्या समर्थपणे झाले आहे की, मराठी टीकेला त्यामुळे निश्चयेकरून चोदना मिळणे अपरिहार्य झालेले आहे.

तुमच्या 'गुरूच्या सान्निध्यात' पान तीन, ओळ सतरा यात शेवटचा शब्द 'सुदैवाने' असा आहे. यातून काही वक्रोक्ती शोधणे आवश्यक आहे की तो शब्द 'दुर्दैवाने' असा वाचावा, हे कळत नाही.

प्रा. वऱ्हाडपांडे याच्या पुस्तकात काही ठळक मुद्रादोष आहेत. पान ११२ वर ६२ ऐवजी, मला वाटते, ७२ पडले आहे. तिसऱ्या परिच्छेदात १९१५ बद्दल १९५१ झाले आहे. पान १७० वर 'दामिनी' बद्दल 'यामिनी' झाले आहे. अर्थात हे दोष काही महत्त्वाचे नाहीत. परंतु प्रा. वऱ्हाडपांडे यांचे पुस्तक वाचून एक प्रश्न मला सुचला. बुद्धिजन्य आकर्षणातून घनिष्ट जवळिक आल्यानंतर त्या नात्यात कोल्हटकरांच्या इसबामुळे काही अ-सौंदर्याची जाण अथवा विरस हिराबाईंना जाणवला असणे संभवनीय आहे काय ? या प्रश्नाच्या सोडवणुकीला काही आधार नसणे संभवनीय आहे. परंतु शास्त्रीय पात्रतेच्या ठरू पाहाणाऱ्या लेखनाच्या बैठकीतून वऱ्हाडपांडे एक दोनदा ललित साहित्याच्या पातळीवर उतरले आहेत. धैर्यधराच्या यशानंतर जोगळेकरांचे स्वागत हिराबाईंनी कसे केले असेल हा प्रश्न सुचला, तेव्हा अशाच ललित कल्पनाशीलतेची कमाल सुंदरता प्रा. वऱ्हाडपांडे यांनी साधलेली आहे. मला वर सुचलेला प्रश्न या कल्पनाशीलतेच्या मर्यादेबाहेरच राहातो असे नाही. आणखीही एक गोष्ट आहे. श्री. मांद्रेकर यांच्या पत्रात व श्री. नेने यांच्या पत्रात, नेने यांच्या निवृत्तिवार्तेत जी विसंगती आहे, तिचा संपादक म्हणून परामर्श घेणे अथवा श्री. मांद्रेकर यांच्या पत्रांतील ती विधाने गाळणे उचित ठरते. श्री. नेने यांनी त्यांच्याकडून अपेक्षू नये असा सहकार दिलेला आहे. मग, जी विधाने त्यांना अन्याय करतात ती, हिराबाईंना त्यामुळे मोठेपणा येतो अशी संपादकांची खात्री नसल्यास, ठेवण्याचे प्रयोजन नव्हते. अन्यथा त्यावर संपादकांचा निर्णय हवा होता.

दोन्ही पुस्तके एकदम वाचल्यावर आणखी एक परिणाम जाणवला. कोल्हटकर व हिराबाई यांच्या बाबतीत तुमची स्वतःची वृत्ती ममत्वाने किंचित मृदु झाली असावी. असा भास झाला. वऱ्हाडपांडे अधिक त्रयस्थपणे पाहात आहेत असे वाटले. मोकळेपणाने लिहिले म्हणून राग नसावा. स्वतःच्या 'आत्मवृत्ता'त कोल्हटकर यांनी असामान्य धाडस दाखविले हे निर्विवाद आहे. पण अखेर हा त्रिकोण कोणीही सोडवू शकत नाही. नेने यांचाही संसार शेवटी फुटलाच. असा संसार फुटण्याचा प्रश्न कोल्हटकरांपुढे कशावरून आला नसेल आणि ते परिस्थितीपुढे अपुरे कशावरून पडले नसतील, असा प्रश्न कोणाला सुचला, तर त्याचे समाधान होणे कठीण आहे. त्यात काही मुलखावेगळे नाही. कोल्हटकरही अखेर माणूसच होते, असे म्हणून त्यांना अन्याय होत नाही. त्यांच्या पत्नीची या त्रिकोणातील बाजू, तिच्यावर अन्याय न करता, सोडविली गेली आहे. कुणाचीही चूक नसता एकाचे बलिदान होणे, हाच यात मार्ग असतो.

अच्युतरावांबद्दल श्री. कृ. जे म्हणाले, त्याचा अर्थ अच्युतरावांवर अन्याय घडला, असे अच्युतरावांचे भक्त मानतील. त्रयस्थ वाचक असे मानीत नाही चिंतामणरावांनी श्री. कृ. बद्दल जे लिहिले, ते याच मर्यादेत समजून घेणे त्रयस्थ वाचकाला शक्य होते. शैव वैष्णव ऐकमेकांविषयी काहीहा म्हणाले, तरी भागवत असतो तो त्यातील सार जाणताना अडखळत नाही.

असो. फार लिहिले तुम्ही फार फार मोठे काम पार पाडले आहे. कदाचित् स्वतःच्या साहित्यामुळेही कोल्हटकर सामान्य वाचकांना जितके ज्ञात राहाणार नाहीत, तेवढे तुमच्या या ग्रंथाने राहाणार आहेत. याहून अधिक उत्तम शिष्य हवासे वाटणे कुणाही गुरूला शक्य होणार नाही.

तुमच्या निवेदनाचा जो शेवट आहे, तो अस्वस्थ करणारा आहे. मराठी साहित्याचा समतोल राखणारी जी मूठभर जुनी माणसे आहेत, त्यात तुम्ही अग्रस्थानी आहात. आज तुम्ही एकटे जे करता, ते दुसरे शंभर लोकही करू शकणार नाहीत. विशेषतः संस्कृताच्या परंपरेतून पुढे आलेला क्रियाशील मुक्तात्मा आज तुमच्याशिवाय दुसरा कोणीही मराठीच्या रंगणात नाही. येवढ्यात जाण्याचा विचारही तुम्ही करता नये.

असो. पुस्तकाबाबत ज्या शंका प्रकट केल्या, ती अमर्यादाच आहे. तिची क्षमा असावी.

दिनांक ९/८/७०   विनीत

बी १७/४, पोस्टल कॉलनी,   आनंद साधले

सहार, मुंबई-२९

जळगाव-जामोद येथील आठवणी

प्रा. दि. वि. जोशी यांचा खुलासा

श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांस,

सा. न. वि. वि. आपले पत्र दि. ९।८चे मिळाले. पण तत्पूर्वी मी आपणांस एक पत्र पाठविले होते, ते आपणास मिळाले नाही, असे वाटते.

माझ्या मागील लेखासंबंधी मला काही सांगावयाचे आहे. जून ७० च्या 'युगवाणी'त कै. तात्यांच्या आठवणी प्रसिद्ध झाल्यात. त्यावर श्री. पु. बा. साठे यांनी आपली प्रतिक्रिया कळविली आहे. आपण पत्रात लिहिले की, त्यांना उत्तर देण्याची गरज नाही. म्हणून उत्तर देत नाही. पण वस्तुस्थिती आपणास कळविल्यास अनाठाई होणार नाहीं. कै. तात्यांच्या आठवणी जमा करताना मी खामगाव, आकोला, शेंदुर्णी, देवधावा इत्यादी ठिकाणी गेलो होतो; व तात्यांच्या संबंधात आलेल्या सर्व ज्येष्ठ व श्रेष्ठांची भेट घेतली. शिवाय कै. काकासाहेबांच्या टिपणांनीही मदत केली.

पण, वाररूममध्ये लावलेल्या फोटोसंबंधी कुणालाही माहिती नव्हती. मी त्याबद्दल विचारले होते. कदाचित् कै. काकांच्या डायरीत त्या गोष्टीचा उल्लेख असावा. पण, शेवटी शेवटी अंथरुणावर पडल्या पडल्या काकासाहेब आपल्या डायऱ्या चाळीत; व काही पाने फाडून जवळच्या शेगडीत जाळून टाकीत. असा त्यांचा ५-६ महिने क्रम होता, असे कळले. त्यांच्या डायरीतील काही पाने का नाहीत, याची सुसंगती अशी लागते. १९३३च्या दिवाळीपासून तो १९३४च्या मार्च अखेरपर्यंतची पाने जाळून टाकलेली आहेत. म्हणजे डायरीत नाहीत. श्री. साठे यांनी जी तारीख सांगितली आहे, ती याच कालावधीतील होय. म्हणून त्यांचा उल्लेख आला नाही. तसेच श्री. साठेसाहेबांच्या संदर्भात कुणीही व कोणतीही आठवण सांगितली नसल्यामुळे, त्यांचा उल्लेख आला नाही. त्यामुळे, अनुल्लेखाचा दोष मजवर येऊ नये, असे वाटते. या खुलाशावरून आपले समाधान होईल, असे वाटते.

दि. १७–८–७० आपला
जळगाव–जामोद दि. वि. जोशी
जि. बुलढाणा

बौद्धधर्माची वैदिक पार्श्वभूमी

बुद्धप्रणीत मोक्ष-मार्ग : एक बुद्धिनिष्ठ धर्म

धर्म-प्रणेत्यांचे युग (पूर्वार्ध १)

—डॉ. सर भवानीशंकर नियोगी

वेद आणि उपनिषदादी ग्रंथांचा मागोवा घेत-घेत आता आपण बुद्धप्रणीत तत्त्वप्रतिपादनाच्या आणि त्याने घालून दिलेल्या आचारसंहितेच्या दाराशी येऊन ठेपलो आहोत. या काळात, आपल्या पस्तीस वर्षांच्या आयुष्यात, सिद्धार्थ गौतम 'संबोधि'च्या – म्हणजे ज्ञानप्राप्तीमुळे जागृतावस्थेत येऊन दाखल झालेला होता. कोणत्या मार्गाने प्रवास करीत-करीत शेवटी आपण या मुक्कामाला येऊन पोहोचलो ते थोडक्यात आपण पाहू या. अगदी प्रारंभिक अवस्थेत आपण ऋषींचे युग पाहिले. या काळात ऋषींनी स्वर्गस्थ देव-देवतांशी मानवाचा संपर्क जुळविण्याचा प्रयत्न केला. हे देव-देवता म्हणजे निसर्गाच्या शक्ती. अत्यंत काव्यमय स्वरूपात दडविलेली ही स्तुति-स्तोत्रे या काळचे वैशिष्टय होते. त्यानंतर ब्राह्मण-पुरोहितांचा काळ आला. या काळात पुरोहितवर्गाने खाद्य-पेयादिकांची अग्निकुंडात आहुती देऊन त्या देवतांशी अधिक जवळचे नाते जुळविण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. पुत्रपौत्रादिकांच्या प्राप्तीसाठी, ऐहिक वैभव-संपत्तीसाठी, अरिष्टकारक शक्तींचा बीमोड करण्यासाठी किंवा व्याधींचे निर्मूलन करण्यासाठी मंत्रबलाच्या सहाय्याने या देव-देवतांना प्रसन्न करून घेणे आणि आपली इच्छा पूर्ण करून घेण्यासाठी त्यांना भाग पाडणे हा उद्देश या काळात प्रामुख्याने होता. यातूनच चातुर्वर्ण्याचा पाया घातला गेला. समाजधारणेसाठी अवश्य असणारी विशिष्ट कामे करणाऱ्या चार वर्गांवर या चातुर्वर्ण्याची मुळात उभारणी होती; पण पुढे-पुढे ही वर्ग-व्यवस्था जन्माप्रमाणे प्राप्त होणाऱ्या जाति-व्यवस्थेचे रूप धारण करू लागल्याचे आपल्याला दिसते.

यापुढील काळ अरण्यकांचा येतो. हा तत्त्व-चिंतकांचा काळ होता. या काळात केवळ अंधश्रद्धेचा विषय बनलेल्या सर्व गोष्टी तर्कशुद्ध बुद्धीच्या निकषावर घासून पारखल्या जाऊ लागल्या, इंद्रियगोचर अशा निसर्गक्रमाच्या मागे कोणते गहन गूढ लपलेले आहे त्याचा शोध घेण्यात येऊ लागला, आणि त्यावरोबरच, त्या परमगुह्य तत्त्वाशी मानवी-जीवाच्या कोणत्या स्वरूपाचा संबंध आहे त्याची छाननी केली जाऊ लागली. साक्षात्कारी अंतर्दृष्टीने त्यांना ब्रह्मतत्त्वाची ओळख पटली, त्यांना त्याची प्राप्ती झाली, आणि ते आदितत्त्व एकमेव व अद्वितीय आहे, आणि त्यावरोबरच ते आणि तो तत्त्वतः एकच आहेत असे त्यांच्या अनुभवास आले. त्यांना कळलेले हे महान् सत्य त्यांनी ज्या महावाक्यांद्वारा प्रकट केले ती महावाक्ये अशी :— (१) अहं ब्रह्मास्मि; (२) तत् त्वमसि; (३) अयमात्मा ब्रह्म; (४) प्रज्ञानं ब्रह्म. जीवात्म्याच्या अंतःकरणात प्रकाशमान होणारे तेज आणि स्वर्गाच्याही वर प्रकाशमान असणारे तेज, दोन्ही एकच आहेत या तत्त्वावर हे मत आधारलेले होते (छांदो. उप. III, १३. ७). सुरापानात आणि रक्तरंजित हत्याकांडात आनंद वाटणाऱ्या इंद्रालाही स्वतःच्या विशुद्ध रूपाचे दर्शन झाले हे या युगाचे वैशिष्टय लक्षात घेतले पाहिजे (बृह. देवता, VII, ५७).

उपनिषद्कालीन द्रष्टयांनी या गुह्य ज्ञानाची अत्यंत कसोशीने जोपासना केल्याचे आपल्याला या

अनुक्रमणिका

काळात दिसून येते. समाज–व्यवस्थेत विश्रृंखलता उत्पन्न होऊ नये म्हणून हे ज्ञान आपल्या ज्येष्ठ पुत्राला अथवा प्रिय अशा सच्छिष्याला सोडून अन्यत्र कोणाला मिळू नये अशी ते द्रष्टे ऋषी काळजी घेत असत.

अशा या संधिकाळात एका नवीन दैदीप्यमान ताऱ्याचा क्षितिजावर उदय झाला. उपनिषद्कालीन तत्त्वचिंतकाप्रमाणेच हा नवा महापुरुषही क्षत्रियवर्गातीलच होता; पण आपल्या अतींद्रिय स्वरूपाच्या आध्यात्मिक बळाने त्याने या दिव्य ज्ञानाच्या प्रसारावर असलेली बंधने आणि नियंत्रणे तोडून टाकली आणि त्याने ते ज्ञान सर्वसाधारण जनतेच्या बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी उपलब्ध करून दिले. हा महापुरुष म्हणजे सिद्धार्थ गौतम. याला 'बुद्ध' म्हणजे संसारनिद्रेतून जागृत झालेला असे म्हणतात. संपूर्ण सृष्टीचे आणि सृष्टीतील प्राण्यांचे जीवन नियंत्रित करणारी एकच शक्ती आहे. ती शक्ती म्हणजे धर्म, अर्थात् त्रिकालाबाधित असा नीतिनियम.

हा सिद्धार्थही तुमच्या–आमच्यासारखा रक्त–मांसाचा बनलेला, पृथ्वीवर जीवन जगणारा मनुष्यच होता. पण, पुढे जसा काळ लोटत गेला, तसे त्यांच्या जीवनाभोवती कल्पितांचे आणि दंतकथांचे एक दाट वलयच निर्माण होत गेले, — इतके दाट की त्याआड त्याने केलेला उपदेशही लुप्त होतो की काय, असे वाटू लागले. इ. स. १८७५ मध्ये सेनार्ट नामक एका फ्रेंच विचारवंताने बुद्धासंबंधी प्रचलित कल्पित कथांचा निष्कर्ष "सूर्यमंडलाची पुराणातली भाकड कथा" म्हणून केले. पण लगेच, इ. स. १८८२ साली ओल्डेनबर्ग या विद्वानाने पाली भाषेतील सूत्रांच्या अनुषंगाने सिद्धार्थाची जीवनगाथा नव्याने आकारास आणली आणि सेनार्टच्या मताचे खंडन केले. इ. स. १८९४ मध्ये डॉ. फ्यूऱ्हेर (Fuhrer) या पुरातत्त्वविशारदाचे लक्ष दोन हजार एकशे पंचाहत्तर वर्षांपूर्वी सम्राट अशोकाने उभारलेल्या एका स्तंभावरील कोरलेल्या लेखाकडे गेले. इ. स. १८९५ साली, ज्या ठिकाणी सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला ते लुम्बिनी वन वस्तुतः कुठे आहे ते निश्चित झाले. या ठिकाणी एका लहानशा टेकाडावर विटांनी बांधलेले एक देऊळ आहे. 'रुमिन देहि' (लुंबिनी देवी) म्हणून आसपासचे वनवासी लोक या जागेचे अजूनही पूजन करीत असतात. १९५२ साली मी माझे मित्र ॲडव्होकेट कुळकर्णी यांचे समवेत या स्थानाचे दर्शन घेऊन आलो. त्या स्तंभावर कोरलेले शब्द असे आहेत :— "बुद्ध शाक्यमुनी या ठिकाणी जन्मास आला." त्यानंतर, इ. स. १८९८ मध्ये डॉ. पीप्स (Dr. Peppes) यांना पिप्रवा येथे बुद्धाचे, नंतर मेजर कनिंग्हॅमला (Major Cunningham) सांचीस्तूपात सापडलेले सारीपुत्त आणि मोग्गालान या त्याच्या शिष्यांचे अवशेष ठेवलेले करंडक सापडले. त्यावरून तर सिद्धार्थ गौतम हा एक ऐतिहासिक पुरुष होता – पुराणकथांतील कल्पित व्यक्ती नव्हता – याबद्दल तिळमात्रही शंका उरत नाही. पुढे आलेल्या लेखी वाङ्मयीन पुराव्यावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते.

गौतम शाक्यमुनी हा वस्तुतः प्राचीन वैदिक यज्ञसंस्थेची सुधारणा घडवून आणणारा, त्या यज्ञसंस्थेशी निगडित असणाऱ्या समाज–व्यवस्थेत बदल घडवून आणणारा एक 'सुधारक' होता. परंतु ज्यांचा त्याने स्वतःच्या जीवनात प्रत्यक्षपणे अवलंब केला अशा अती उदात्त तत्त्वोपदेशामुळे तो एका विश्व–धर्माचा आद्य प्रवर्तक ठरला. जातकनिदान कथांमधील अद्भुतरम्य काल्पनिक भाग वगळला आणि त्यात स्पष्ट झालेला सिद्धार्थाचा जीवन–वृत्तांत लक्षात घेतला तर तो असा :— एका थोर सांख्य दर्शन–शास्त्राच्या प्रवर्तकाच्या नावाशी निगडित असलेल्या कपिलवस्तु नगरात तेथील अधिशासक असणाऱ्या महाराज शुद्धोदनाच्या पोटी सिद्धार्थाचा जन्म झाला. शुद्धोदनाची धर्मपत्नी महाराणी महामाया हिने ग्रीष्मऋतूच्या मध्यकाळात येणारे, सुरापानादिकापासून सर्वथैव अलिप्त असे पौर्णिमेचे व्रत घेतले होते. त्या पवित्र दिवसाचे व्रत आचरून पावन व्रत–संकल्पादी करून (उपोसथ–अंगानि) राणी आपल्या मंचकावर पहुडली होती. निद्रेच्या आधीन झाल्यानंतर तिला एक स्वप्न पडले. स्वप्नात तिने पाहिले, — चार दिशांच्या दिक्पालांनी मंचकासह तिला उचलले आणि हिमवन्त पर्वताच्या शिखरावर असलेल्या शालवृक्षाखालच्या एका चौरस सपाट भूमीवर तिला आणून ठेवले. तेथे मानवी देहाचे सारे संस्कार नाहीसे करण्यासाठी तिला स्नान घालण्यात आले, व (रजत पब्बतो) चांदीच्या पर्वतावरील एका सुवर्णप्रासादात तिला नेण्यात आले. मग एका पांढऱ्या शुभ्र वर्णाच्या गजेन्द्राने आपल्या सोंडेत श्वेतवर्ण कमल घेऊन त्याने तिच्या उजव्या कुशीला स्पर्श केला. गर्भावस्थेचा पूर्ण काळ संपल्या-

नंतर तिने लुंबिनी वनात साल वृक्षाखाली बोधिसत्वाला जन्म दिला. पाचव्या दिवशी बाळाचे 'सिद्धार्थ' असे नामकरण करण्यात आले. तिन्नम् वेदानां पारगो (तीन वेदांत पारंगत) असलेल्या एकशे आठ ब्राह्मणांना पाचारण करण्यात आले. त्यात कौंडण्य ऋषीही होते. सातव्या दिवशी महाराणी महामाया मरण पावली. बोधिसत्त्वाच्या वयाला सोळा वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्याचा यशोधरेशी विवाह झाला आणि ती त्याची पट्टराणी बनली (देवी अग्ग–महेशी). एके दिवशी बोधिसत्त्व श्वेतश्व रथात बसून आपल्या उद्यानाकडे जाण्यासाठी (उद्यानभूमिम्) निघाला असता वाटेत त्याने एका व्याधिग्रस्त मनुष्याला, एका प्रेताला आणि एका संसार–परित्याग केलेल्या (पब्बजितम्) संन्यासी मनुष्याला पाहिले. डॉ. जेनिग्ज व डॉ. थॉमस यांच्या मताप्रमाणे, बोधिसत्त्वाच्या अंतःकरणात घोळत असलेल्या विचारांचे निदर्शक असे हे रूपक आहे. 'बुद्ध वंशा'च्या II, १, २७ मधे प्रथमतः उल्लिखित झालेले हे सुमेधाचे विचार आहेत. जातकांच्या प्रस्तावनेत याची पुनरावृत्ती झालेली आहे. हा सुमेधच पुढे गौतम बुद्ध बनला. तो ब्राह्मण होता. विशाल संपत्तीचा तो धनी होता आणि तीनही वेदांतील मंत्रांचा (त्रैविद्या) तो पारंगत ज्ञाता होता. एकांतात बसला असताना त्याच्या मनात विचार आले,— "निसर्गक्रमाला अनुसरून या पृथ्वीवरील जीवनाचे निर्बंध (जनम) माझ्यावर लागू आहेत. वार्धक्याच्या (जरावम्म), व्याधींनी ग्रस्त होण्याचा (व्याधिधम्म) नियम मलाही लागू आहे. म्हणून मी वार्धक्य–हीन (अ–जराम्) आणि मृत्यु–हीन (अमराम्) अशा निर्वाणाचा (निब्बुतिम्) शोध घेईन." छांदोग्योपनिषदातील "न तस्य रोगो न जरा न मृत्युः" किंवा "आत्माअपहतः पाप्मा विजरो विमृत्युः विशोकी" मधे आलेली कल्पना आणि वरील कल्पना या एकच आहेत हे वाचकांच्या लक्षात येईल. आत्म्याच्या स्वरूपाविषयी हीच कल्पना याज्ञवल्क्याने दिली आहे. त्या वेळी आत्म्याचा अर्थ स्पष्टपणे निर्दिष्ट झालेला नव्हता हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. याज्ञवल्क्य आणि कहोल कौशितकेय या उभयतांमधील प्रसंग असा वर्णिला आहे. कहोल कौशितकेयाने आत्म्याची स्पष्ट व्याख्या करण्याची याज्ञवल्क्यांना विनंती केली. त्यावर जे उत्तर मिळाले ते असे :— आत्मा म्हणजे क्षुधा आणि तृषेच्या पलीकडे असलेला, तो दुःखाच्या, मोहाच्या, जरेच्या आणि मृत्यूच्यातही पलीकडे असलेला. अशा आत्म्याला जाणून घेण्याची इच्छा करणारे 'ब्राह्मण' पुत्रप्राप्तीच्या व इतर इच्छांचा त्याग करून आणि भिक्षावृत्ती स्वीकारून जीवनयापन करतात (भिक्षाचर्यम् चरन्ति). तेव्हा, ब्राह्मणाने आपल्याजवळील पांडित्याचे ओझे बाजूला ठेवावे आणि बालवृत्तीने राहण्याची सवय करावी..... व नंतर मुनीचे जीवन जगावे. मुनीप्रमाणे अनासक्त आणि आसक्त अशा उभयविध जीवनाचा त्याला तिटकारा वाटू लागला म्हणजे मग त्याला ब्रह्मतत्त्वाची जाणीव होते आणि तो दुःखशोकाच्या पलीकडे जातो (बृहद. उप. III, ५). वृद्धावस्था प्राप्त झाल्यानंतर लगेच सिद्धार्थाने स्वतःचे वर्णन 'ब्राह्मण' म्हणजे ब्रह्म जाणणारा असे केले, हे लक्षात घेण्याजोगे आहे. आतापिनो ज्झायते ब्राह्मणस्स (महा वाग्ग. I. I. I. ७).

आपल्याला पुत्र–प्राप्ती झाली ही वार्ता बोधिसत्वाने (गौतमाने) ऐकली त्यावेळी त्याच्या मुखावाटे "एक शृंखला निर्माण झाली आहे!" असे उद्गार बाहेर पडले. पुत्राचे नाव राहुल असे ठेवण्यात आले. सांसारिक जीवनातून बाहेर पडायचे असा त्याने त्याच क्षणी निश्चय केला, आणि महाभिनिष्क्रमणाची तयारी केली. त्याला आपल्या गोजिरवाण्या मुलाबद्दल किंवा लावण्यवती पत्नीबद्दल तिरस्कार वाटत होता म्हणून त्याने संसाराचा त्याग करण्याचे ठरविले असे नाही. त्या वेळच्या त्याच्या मनःस्थितीचे वर्णन सर एड्विन् आर्नोल्डच्या शब्दांत असे होते :—

Pleasant ye are to me, sweet friends
And dear to leave;
Yet, if I leave not, what else will come
to all of us
Save eld without assuage,
And death without avail ?
This would not I, though all my days
were godlike
While men moan
Under their darkness,
Therefore, farewell, friends !
While life is good to give,
I give and go to seek deliverence
And that unknown light.

(Light of Asia, Bk. IV)

त्यानंतर सिद्धार्थाच्या तपश्चर्येला सुरुवात झाली. सतत चाळीस दिवसांच्या उपोषणाने त्याचे शरीर दुर्बळ झाले. नुसते अस्थि-पंजर शिल्लक राहिले. अशा वेळी त्याच्या मनात एक विचार आला,—हे शरीरच नष्ट झाल्यानंतर मग ज्ञान उजळणार कुठे ? असा विचार मनात आल्यानंतर त्याने सुजातेच्या हातून मिळालेला दूध-भात ग्रहण केला. माराच्या सैन्याशी सबंध रात्रभर त्याचे तुमुल युद्ध होते. या युद्धात विजय मिळाल्यानंतर तो 'सर्वज्ञ' झाला. म्हणजे विश्वातील सर्व घडामोडी कार्यकारणभावाच्या नियमाला अनुसरून होत असतात, या ज्ञानाचा प्रादुर्भाव त्याच्या मनात झाला.

तो अरण्यात निघून गेला त्या वेळी त्याच्या पित्याने त्याच्याकडे दूतांकरवी निरोप पाठविला,— "परत ये आणि क्षत्रियधर्माचे प्रतिपालन कर. धर्मशास्त्रप्रणीत यज्ञयागादि क्षत्रियांची विहित कर्मे करून सुख-वैभवाची प्राप्ती करून घे." परंतु ही विनंती त्याने मान्य केली नाही. तो म्हणाला, "दुसऱ्या जीवधारी प्राण्यांना यातना देऊन जे सुख प्राप्त होते किंवा प्राप्त होईल अशी मनुष्य आशा बाळगून असतो, ते सुख मला कधीही हवेसे वाटणार नाही."

(बुद्धचरित; सर्ग II-६४)

बुद्धाला मिळालेल्या ज्ञानाचे किंवा त्याला झालेल्या जागृतीचे स्वरूप कशा प्रकारचे होते ? धम्मपदात (१५३-४) त्याचे वर्णन केले आहे ते असे :

जन्मजन्मीची संसृती अपार
धावता मी पावलो कष्ट अपार:
कोण कर्ता या देहमंदिराचा,
श्रांत झालो लाविता शोध याचा;
बोध कर्त्याचा आज मला झाला,
पुन: घरटे बांधिता नये त्याला,
सर्व त्यांची साधने झालि भिन्न,
देहगेहाचे कर तसे छिन्न;
टाकुनिया संस्कार चित्त माझे,
लोभ तृष्णेचे दूर करी ओझे;
मारसत्तेची नसे भीति आता,
ज्ञानलाभे होईन जगत्राता.

(धर्मानंद कोसंबी)

हा गृह-निर्माता कोण ? ऋग्वेदातील नासदीय सूक्तात "कामस्तदग्रे समवर्तताधि" म्हणून ज्याचा उल्लेख आला आहे, तोच हा गृह-निर्माता. बृहदारण्यकोपनिषदात ज्याचे "अशनायाहि मृत्यु:" असे वर्णन केले, तोच हा गृह-निर्माता. या कारणामुळे उपनिषदात मानवाचे वर्णन "काममय:", "क्रतुमय: पुरुष:" असे आले आहे.

हा "काम"च आत्म्याच्या रूपाने वावरतो आणि आपल्यासाठी आश्रय शोधीत असतो, पण जन्मानंतर जन्म घेऊनही त्याला नेहमी मृत्यूला वळी पडावेच लागते. तैत्तिरीय उपनिषदात, मैत्री उपनिषदात आणि मुंडकोपनिषदातही हे अगदी स्पष्टपणे सांगितले आहे.

सिद्धार्थाला हे ज्ञान झाले, पण ते दुसऱ्यांना द्यावे किंवा नाही, याबद्दल त्याच्या मनाचा निश्चय होईना. महापरिनिर्वाण सूत्रात म्हटल्याप्रमाणे "आचार्यमुष्ठि"च्या अंतर्गत असलेल्या रहस्याप्रमाणे ते ज्ञान केवळ आपल्याजवळच जपून ठेवावे म्हणून ते दुसऱ्यांना देण्याची त्याची इच्छा नव्हती, असे नव्हे. पण, त्याला वाटत होते,—मनुष्यमात्राच्या जन्मजात स्वभाववृत्तीशीच पूर्णपणे विरुद्ध असलेल्या या ज्ञानाचे मनुष्याला आकलन व्हावे कसे, आणि त्यापेक्षाही अधिक म्हणजे, मनुष्याकडून त्याप्रमाणे आचरण व्हावे कसे ? आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान मानवाला अनाकलनीय आणि अव्यवहार्य वाटेल अशा शंकेने तो व्याकुळ झाला, उदास बनला.

ही त्याची विषादस्थिती पराकोटीला पोचली असता ब्रह्मा सहम् पति (प्रजापती) त्याच्यापुढे प्रकट होऊन म्हणाला,——

"हे बुद्ध गुरो, तुझ्या अमृततुल्य धर्माचा लोकांना उपदेश कर. आजपर्यंत मगध देशात जे धर्म प्रचलित झाले ते परिशुद्ध नव्हते. म्हणून मलरहित अंत:करणाने जाणलेला हा तुझा धर्म लोकांना ऐकू दे. हे अमृताचे द्वार लोकांसाठी उघडे कर. हे शूरवीर, माराशी युद्ध करून तू विजय मिळविला आहेस. हे लोकनायक, तू सर्व ऋणांतून मुक्त झाला आहेस. आता लोकांमध्ये संचार करून तुझ्या धर्माचा

प्रचार कर. तुझा धर्म जाणणारे पुष्कळ लोक तुला भेटल्याशिवाय राहणार नाहीत.

(धर्मानंद कोसंबी)

ह्या ठिकाणी विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की, यज्ञात ज्या देवाला हविर्भाग अर्पण करण्यात येई तो ब्रह्मा सहंपतीच होता. गीतेत त्याचे वर्णन "सह यज्ञाः प्रजाः सृष्ट्वा···प्रजापतिः" असे केलेले आहे. त्याने स्वतःच बुद्धाला सांगितले,–"तू ऋण–मुक्त झालेला आहेत.–अनृणी – अनण." लोकांना सांगितलेले धर्मज्ञान ऐकण्यासाठी लोक तुझ्याकडे येतील, असेही त्याने बुद्धाला सांगितले. येथे "ऋण–मुक्त, अनृणी" ह्या शब्दाचे महत्त्व आपण लक्षात घेतले पाहिजे. यज्ञ–संस्थेला बुद्धाचा जो विरोध होता, त्याच्या संदर्भात आपण ह्या शब्दाचा अर्थ घेतला पाहिजे. त्या काळात रूढ असलेल्या समजुतीप्रमाणे, ब्राह्मण म्हणजे सर्वसाधारण मनुष्य–जन्मतःच तीन प्रकारच्या ऋणांचे ओझे घेऊन जन्माला येतो, असे मानले जात असे. ही तीन ऋणे म्हणजे (१) पितृ–ऋण, (२) ऋषि–ऋण, आणि (३) देव–ऋण. ही तीनही ऋणे प्रत्येक मनुष्याने पुत्राला जन्म देऊन, ब्रह्मचर्य पालन करून आणि यज्ञयागादि करून फेडायची असतात, असे मानले जाई. सिद्धार्थाने पहिली दोन ऋणे फेडली होती, पण तिसरे ऋण त्याने फेडले नव्हते. कारण तत्त्वतः त्याने त्याचा धिक्कार केलेला होता. त्याने विचार करून ठरविलेल्या धर्मव्यवस्थेला अनुसरूनच हा यज्ञ–क्रियेचा धिक्कार होता. आणि त्या धर्म–व्यवस्थेचे वर्णन ब्रम्ह्यानेच "अवापुरेतम् अमृतस्स द्वारम् सुणंतु धम्मम् विमले नानुवुद्धम्" असे केले.

तो काळच मुळी विचार–मंथनाचा काळ होता. केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभर बुद्धीच्या आणि विचाराच्या क्षेत्रात त्या काळात प्रचंड खळबळ माजलेली होती. ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात कितीतरी थोर विचारवंत जगात उदयास आले, त्याची साक्ष इतिहास देत आहे. बॅबिलॉनमधील ज्यू लोकांत आयझियाचा (Isaiah) जन्म झाला, एफिसस येथे हिरेक्लिटसचा जन्म झाला, पर्शिआमधे झीरॉस्तरचा उदय झाला, चीनमधे कन्फ्यूसिअस आणि लाओत्से उदयास आले, ते सर्व याच काळात–आणि त्याच काळात भारतात गौतम बुद्ध जन्मास आला. एच्. जी. वेल्स आपल्या "Short History of the World" नामक ग्रंथाच्या अठ्ठाविसाव्या प्रकरणात लिहितो :— "Goutam Buddha came near to revolutionising the religious thought and feeling of all Asia." प्रचलित धर्मज्ञानात बुद्धाने कोणत्या नव्या विचाराची भर घातली? ही भर म्हणजे, अत्यंत सखोल अशा चिंतनातून आणि विचारातून निर्माण झालेली धर्माकडे पाहण्याची आध्यात्मिक दृष्टी. ही दृष्टी अतींद्रिय आणि अनुभूतिजन्य ज्ञानाची दृष्टी होती तशीच ती अध्यात्मचिंतनाचीही दृष्टी होती. ती अनुभूतिजन्य अतींद्रिय ज्ञानाची दृष्टी होती, असे म्हणण्याचे कारण, ज्याला उपनिषदांनी 'ब्रह्म' असे नाव दिले आहे परंतु 'नेति, नेति' म्हणून ज्याचे अनामरूप वर्णनच त्यांना करता आले अशा त्या इंद्रियातील बिराट शक्तितत्त्वाचा साक्षात्कार त्याला झालेला होता. तैत्तिरीय उपनिषदात "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह" असे म्हणून शब्दांच्या आणि मनाच्याही पलीकडचे तत्त्व म्हटले, त्याचा त्याला साक्षात्कार झालेला होता. आणि त्या दृष्टीला अध्यात्मचिंतनपर दृष्टी म्हटले. कारण, आपल्या अनुभूतींची मनोमन चिकित्सा केल्यानंतर त्याला प्रतीतीतून समुत्पन्न झालेल्या कार्य–कारण–भावाच्या त्रिकालबाधित नियमाचे स्वरूप त्याला आकलन झालेले होते.

त्या काळात भारतात बुद्धिवादाची अगदी शब्दशः प्रचंड खळबळ माजलेली होती. धर्माधिष्ठित मूलतत्त्वांचे निरूपण करणाऱ्या त्रिपीटकातील प्रथम दीघ–निकायाचा ज्याने प्रारंभ होतो त्या ब्रह्मजालसुत्तात या खळबळीचे स्पष्ट दर्शन घडते. येथे निरनिराळ्या तर्कांचे आणि विचारांचे अरण्यच माजलेले डोळ्यापुढे उभे राहते. यांपैकी काही तर्क तर अगदी अप्रयोजकतेच्या पराकोटीला पोचलेले आढळतात. उदाहरणार्थ, हा उच्छेदवाद पहा. अत्थिपिनो, नात्थिपिनो, नोतिपिनो नोनोतिपिनो नाकारणारा विचारच पाहा. असे परस्परविरोधी आणि अगदी दुसऱ्या टोकाला गेलेले विचार असणे यात गैर असे काही नाही. एवढेच नव्हे तर, उलट, ते असणे हे एका अर्थाने स्वागतार्हच म्हटले पाहिजे. कारण याज्ञवल्क्याने आणि स्वतः बुद्धानेही पुरस्कारलेल्या स्वैर आणि स्वतंत्र मननाचा तो परिपाक आहे. बर्ट्रान्ड रसेलने म्हटल्याप्रमाणे ज्याला तत्त्व–

चिंतन करायचे असेल त्याने बुद्धीला न पटणाऱ्या, असंभवनीय वाटणाऱ्या गोष्टी पुढे आल्या तरी डगमगता उपयोगी नाही. अशा प्रकारचे 'पांडित्यपूर्ण अज्ञानच' मनुष्याच्या मनाला धर्माच्या दाराशी आणून उभे करीत असते. भारताला ज्या एका गोष्टीचा अभिमान वाटावा अशी गोष्ट म्हणजे, येथे विचारांचे आणि उच्चाराचे परिपूर्ण स्वातंत्र्य होते, ही. इतिहासात ज्याची गाथा वर्णन केलेली आहे अशा प्रकारच्या रूढ मताशी विसंगत विचार असणाऱ्यांचा छळ या देशात कधीही झाला नाही, ही खरी अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे यात संशय नाही.

बुद्धाच्या शिकवणीचे सार "धर्मचक्र प्रवर्तन सूत्र", "अनत्त लख्खन सुत्त" आणि कार्य-कारण-संबंधाच्या तत्त्वाच्या विशदीकरण करणाऱ्या "प्रतीत्य समुत्पाद" या नियमात सापडते.

‘बीं’चे वात्सल्य

—भवानीशंकर पंडित

भरतमुनींनी आपल्या नाट्यशास्त्रात ‘वत्सलरसा’ला स्वतंत्र स्थान दिलेले नाही. स्त्री आणि पुरुष यांच्या समागमानंतर ‘वत्स’चा संभव होतो. वत्साविषयीचे ममत्त्व त्याच्या संभवानंतर अनुभवास येते. म्हणून बहुधा त्यांनी त्याला ‘शृंगारा’चे एक ‘अंग’ मानले असावे. कारण कोणते स्वर आणि कोणते वर्ण कोणत्या प्रसंगी कसे उच्चारावे याचा पाठ देताना त्यांनी ‘वत्सल’ हा शब्द प्रयुक्त केला आहे.* वत्सलाला भरतांनी जरी स्वतंत्र रस मानलेले नसले, तरी वत्साविषयीच्या ममतेची उत्कटता मातापित्यांना जाणवल्याशिवाय राहत नाही. जीवमात्राच्या ठिकाणी आढळणाऱ्या प्रजोत्पत्तीच्या आणि तिचे रक्षण करण्याच्या प्रवृत्तीशी ममतेच्या त्या भावनेचा निकटचा संबंध आहे.

वात्सल्याची भावना आईबापांच्या ठिकाणी दृष्टीस पडते. त्यातल्या त्यात ती आईच्या ठिकाणी विशेष प्रमाणात असते. याचे कारण मूल चालू बोलू लागते तो त्याचे लालनपालन, संगोपन, निसर्गाने तिच्यावर सोपवले आहे. पिता एक वेळ अपत्याला विटेल, परंतु मातेला ते अपत्य वयस्कर झाले, तरी लहानच वाटते. समाजात बुद्धीचे प्रकर्षण व नीतीचे संवर्धन व्हावे यासाठी वात्सल्याच्या निकोप विकासाची आवश्यकता आहे. वात्सल्याचा उद्‌गम शिशुविषयक ममत्वाच्या भावनेत आहे. तेव्हा त्या रसाला सदासर्वदा सर्वत्र आवाहन असावे हे स्वाभाविक आहे.

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात ‘वत्सलरसा’ला स्वतंत्र स्थान नाही हे खरे. परंतु भोज, हरिपालदेव, रूपगोस्वामी आणि मधुसूदन सरस्वती यांनी त्याला गौण रस मानले आहे. यापैकी शेवटच्या दोघांनी त्याची भक्तिरसाचा गौण रस म्हणून गणना केली आहे. मात्र विश्वनाथाने आपल्या ‘काव्यदर्पणा’त त्याला सर्वस्वी स्वतं स्थान दिले असून विस्ताराने त्याची लक्षणे सांगितली आहेत.

‘फुलांची ओंजळ’, ‘वात्सल्य’ आणि ‘माझी कन्या’ या बींच्या तीन कवितांचा उद्‌गम ममतेच्या भावनेतून झाला आहे. यापैकी पहिली कविता वस्तुतः कवी आणि कविता या विषयावरील आहे. परंतु तिचा प्रारंभीचा भाग वात्सल्याच्या रसाने न्हाऊन निघाला आहे. सृष्टी आणि कवी यांचा परस्पराशी माता आणि अपत्य असा नात्याचा संबंध आहे अशी या कवितेत बींनी कल्पना केली आहे. वयाने सर्वात लहान असलेला तो तिचा लाडका लेक आहे. तो व्यवहारविमुख आहे. या जगातले छक्केपंजे त्याला ठाऊक नाहीत. तो त्यांच्यामुळे त्रासला आहे हे पाहून त्या मायाळ मातेला आपल्या मुलाची कीव येते. ती त्याला जगाच्या बाजारातून काढून आपल्या प्रेमळ पदराखाली घेते; आणि निरनिराळ्या उपायांनी त्याला खेळवण्याचा आणि खुलवण्याचा प्रयत्न करते. तिच्या या खेळण्या खुलवण्याचे चित्र अतिशय काव्यमय आहे —

> चंद्रसूर्य खेळणीं दिलीं खेळाया तेजागळी,
> कुरवाळी हळुवारपणी पण न फुले[illegible]क विमनकळी
> नक्षत्रांची-चटक फुलांची-माळ टपोरी नवी
> जरतारी तारांत गुंफुनी लेंकरास लेववी.
> आकाशाचें अंगण झाडुनि अवीट रग वरीं
> विचित्र रेखा-लिहो लिहो ती कळाचतुर सुवरी.
> प्रेमासम निज अमर्याद, अक्षय्य विनिर्मित करी
> शुद्ध बुधाची नवी; पाहती असुनी जन अंबरीं.

---

* ‘तत्र हास्य शृंगारयोः स्वरितोयात्तैः वीररौद्राद्‌भुतैः उदात्तकंपितैः, करुणवात्सल्यभयानकेपु अनुदात्तकंपितैः वर्णैः पाठ्यमुपपादयति—नाट्यशास्त्र, पृ. १८७’

या ठिकाणी बीच्या दिव्य आणि भव्य कल्पनाशक्तीचे प्रत्यंतर पटते. सृष्टी ही आई आणि कवी हा तिचा मुलगा ही कल्पना सर्वसामान्य आहे. परंतु त्याला खेळण्यासाठी आणि रिझवण्यासाठी त्या सृष्टिमातेने वस्तू दिल्या, त्यांच्या कल्पना मात्र बीसारख्या प्रतिभाशाली कवीलाच स्फुरतात. अशा अलंकारिक वर्णनात ज्या कल्पना व्यक्त होतात त्यांनाच इंग्रजीत Imagination असे नाव आहे. या अपूर्व शक्तीसाठी कवीच्या ठिकाणी भावनेची उत्कटता, तन्मयता आणि सूक्ष्म निरीक्षणक्षमता हे स्वभावसिद्ध गुण आवश्यक आहेत. कवीने काव्यविषयाच्या चिंतनापासून अनुभवलेला आनंद अतिशयित व असाधारण असतो. तो अनुभवताना कवीला दुसरे कशाचे भान नसते. तो त्या घटकेला 'विगलित वेद्यान्तर' असा असतो. बींना ज्या वेळी ही कविता स्फुरली, त्या वेळी त्यांची अवस्था तशीच झाली असावी. त्याशिवाय त्यांच्या वाणीत उद्गारांची सहजता, कल्पकतेची अलौकिकता आणि धारणेची एकरूपता हे गुण एकत्रित झालेले नाहीत.

या कवितेत बींनी 'शुद्ध दुधाच्या नदी'ची जी कल्पना व्यक्त केली आहे, त्या धर्तीची एक कल्पना इंग्रजीत आहे; पण ती Milky way ची आहे. आगरकरांनी इंग्रजी शब्दासाठी 'क्षीरपथ' हा मराठी पर्याय निर्माण केला आहे.* सृष्टीचे कवीवरले निःसीम प्रेम व्यक्त करताना बींनी शेवटी एक 'अर्थांतरन्यास' योजिला आहे; —

शिशुमन रमवायास करी आयास माय ती असे
अगाध माया मोठ्यांनाही नाचविते भलतसें !

यापुढे बींनी 'कवी आणि कविता व त्याचे कार्य' याविषयी आपले विचार मांडले आहेत. त्यांचा विचार पुढे एखाद्या लेखात करावा लागेल. मात्र या प्रारंभीच्या भागाचा शेवट करताना त्यांनी अध्यात्म या आपल्या आवडत्या विषयातले 'अगाध', 'माया' इ० शब्द योजून कवितेला लौकिकातून अलौकिकात नेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. ही 'माय' साधे दूध पाजणारी 'आई' नाही. हिच्या 'शुद्ध दुधाची नदी' आजतागायत आकाशातून वाहत आहे !

---

* *Milky Way*— Luminous band of countless stars encircling the heavens.

'वात्सल्य' या कवितेच्या नावावरूनच ती कविता ममत्वाच्या भावनेवर आधारलेली आहे हे उघड आहे. या कवितेचे बींनी दोन भाग केले आहेत. परंतु अर्थ आकलन होण्याच्या दृष्टीने तीन भाग अधिक सोयीस्कर झाले असते. त्याप्रमाणे पहिला भाग सुरवातीच्या सहा ओळींचा आहे. त्यात 'पूर्वदिशा' आणि 'शशि' म्हणजे 'चंद्र' यांच्या प्रतिमा 'पत्नी' आणि 'पती' यांच्यासाठी योजल्या असून, त्यांचा समागम झाल्यावर चंद्राचा अस्त होतो; आणि त्यानंतर 'पूर्वे'च्या उदरातील 'सूर्यबिंब' उदयाला येते असे सूचित केले आहे. 'चंद्र' अस्तंगत झाल्यावर 'सूर्या'चा उदय होतो. याला पाहून 'पूर्वे'च्या डोळ्यांत अश्रू येतात. दंवाच्या थेंबांवर बींनी अश्रूंची कल्पना केली आहे; आणि मग पुढच्या भागात एका हतभागिनी विधवा मातेचे व तिच्या बालकाचे करुण चित्र चितारले असून अखेरच्या भागात आकाशातील दृश्य आणि धरेवरील दृश्य यांच्यातले साम्य काव्यमय केले आहे.

या हतभागिनी मातेचे भाळ विशाळ आणि तेजाळ आहे. मुद्रा निष्कलंक आहे. शरीर गोरेपान आहे. मात्र डोळे आर्द्र असून, त्यांना 'करुणे'ने आपले निवासस्थान बनविले आहे. या दुर्दैवी मातेच्या जन्माचा व प्रेमाचा सहकारी अंतरला आहे. तिने आपले वाळ दोन्ही हातांच्या झुल्यावर घेतले आहे; आणि त्याच्या मुखाकडे टक लावून ती डोळे भरून त्याला पाहत आहे.

मुलाला पाहताना तिला दिवंगत पतीची आठवण येत होती. ती विजेच्या धक्क्याप्रमाणे दारुण होती. तिच्या खोल हृदयात दुःखामुळे सर्वत्र निराशा होती. ती तिच्या मुखावर उघड दिसत होती. यापुढे बींनी माता आणि शिशू यांच्या ऐकत्वासंबंधी एक सुंदर काव्यमय कल्पना मांडली आहे. एखाद्या कमळाच्या पानावर पाण्याचे दोन थेंब असावेत. वाऱ्याने ते पान हालावे आणि ते दोन बिंदू एक व्हावेत, त्याचप्रमाणे जगदंबेच्या संजीवक वातामुळे या विश्वात माता आणि शिशू यांचे दोन जीव एक होत असतात. शिशू म्हणजे पत्नी आणि पती या दोघांच्या प्रेमाचे प्रतीक आहे.

कवितेच्या तिसऱ्या भागात आकाशामधील आणि संसारातील दृश्यात साम्य दाखविण्यात आले आहे. आकाशात तिकडे आरक्त सूर्य हास्य करीत आहे, तर

इकडे भूमीवर लहान मूल आपल्या हास्याचे पराग उधळीत आहे. आकाशावर बालसूर्याच्या पायांचा नाच चालू आहे, तर जमिनीवर इकडे लहान मूल चिमुकले पाय आईच्या उरावर उडवीत आहे. प्रभातकाळच्या शुभसमयी आकाशात व भूमीवर त्या बालक्रीडा पाहून त्या हतभागिनी विधवेला येणारी तिच्या पतीची स्मृती नाहीशी झाली. तिचे शरीर रोमांचित झाले आणि तिच्या डोळ्यांतून एकसारखे वत्सलतेचे आसू वाहू लागले.

या ठिकाणी वात्सल्यासंबंधी वींचे उदात्त आणि पवित्र विचार व्यक्त झाले आहेत. विश्वाच्या विकसनात वेगवेगळ्या रूपांनी प्रत्ययास येणाऱ्या वात्सल्यास ते विश्वात्म्याच्या अविनाशी आणि विमल हास्याची उपमा देतात. जगाची राहाटी अविरत चालू राहावी, यासाठी मातृत्व सतत त्याग करीत असते. जगासाठी केलेला हा स्वार्थाचा त्याग सर्व त्यागात श्रेष्ठ आहे. या त्यागामुळे पृथ्वीवर प्रत्यक्ष स्वर्ग उतरून येतो.

वींच्या या कवितेत तात्विकतेवर विशेष भर आहे. त्या मानाने तिच्यात कवित्वाचा अंश कमी आहे. कवितेचा विषयच मुळात 'वात्सल्य' हा आहे. त्याचे मानुषीकरण करण्याचा प्रयत्न झाला आहे. पण तो क्षीण आहे. त्यामुळे कवितेतला ममत्वाचा भाव पुष्ट झाला नाही; आणि कवितेला 'प्रवचना'चे स्वरूप आले आहे. बींच्या या कवितेत पुत्रजन्माने आनंदित झालेली परंतु पतिनिधनाने दुःखित झालेली दुर्दैवी विधवा आहे; तर गोविंदाग्रजांच्या 'राजहंस माझा निजला' या कवितेत पतिनिधनानंतर एकुलत्या एका पुत्राच्या निधनाने व्यथित झालेली हतभागिनी विधवा आहे. परंतु त्या कवितेत ममत्वाचा स्थायी भाव जसा पुष्ट होऊन करुण रसाचा परिपोष झाला आहे, तसा तो वींच्या या कवितेत झालेला नाही. परंतु या कवितेच्या अगदी उलट बींची 'माझी कन्या' ही तिसरी कविता आहे.

या कवितेची 'प्रस्तावना' करताना बी स्वतः सांगतात, "शाळेतील एका मुलीला कोणी भिकारीण म्हटल्यावरून घरी येऊन ती स्फुंदून स्फुंदून रडत आहे; आणि बाप तिची समजूत करीत आहे, असा प्रसंग कल्पिला आहे. विषादाचे तळावर बापाचा विनोद मुख्यतः वर्णन करण्याचा या कवितेत यत्न केला आहे."

बींची ही कविता पौरस्त्य आणि पाश्चात्य साहित्यशास्त्रांतील कसोट्यांवर घासून पुसून पाहण्यास योग्य अशी आहे. कवितेत करुण रसाचा परमावधी झाला आहे. बी सांगतात त्याप्रमाणे तिच्यात 'विषादा'चे तळावर बापाचा 'विनोद' मुख्यतः आहे. पण हा 'विनोद' पाश्चात्यांच्या सरणीप्रमाणे 'उपहासात्मक' (Satirical) आहे. तो बापाच्या 'विषादा'तून उत्पन्न झाला आहे. त्यात निव्वळ 'हास' व 'परिहास' नाहीत. त्यांच्या जोडीला मुलीचा केलेला 'उपहास' आहे; आणि तो देखील पाश्चात्यांच्या पद्धतीप्रमाणे 'बोचक पण खुमीदार' आहे. त्याच्यातील 'खाचाखोचा' ज्यांची मातृभाषा मराठी आहे त्यांनाच समजू शकतील.

'हास्य' आणि 'करुण' हे विरोधी रस वस्तुतः परस्परांना मारक आहेत. पण बींनी गोविंद बल्लाळ देवलांच्या 'शारदे'प्रमाणेच ते दोन्ही रस एकत्र नांदवण्याची अद्भुत किमया साधून अपूर्व यश संपादन केले आहे. बींच्या प्रस्तावनेत 'वात्सल्या'चा निर्देश नाही. पण खरोखर 'माझी कन्या'च्या तळाशी 'ममतेची स्थायी भावना' आदिपासून अंतापर्यंत असल्यामुळेच तिच्यात 'वात्सल्या'बरोबर 'करुण' 'हास्य' यांचे उद्भावन, परिपोषण आणि उत्कर्षण झाले आहे. 'करुण' आणि 'हास्य' यांच्या अद्भुत आणि अननुभूत सम्मीलनाने ही कविता ऐकताना डोळ्यांत आसू आणि ओठात हासू असा चमत्कार अनुभवास येत असतो.

संस्कृत साहित्यातले निकष लावून या कवितेची समीक्षा करता येईल. ही कविता वत्सलरसात आहे. तिची काव्यगत रससामग्री अशी—"तिच्यात 'कन्या' हा पित्याचा आलंबन विभाव; तिने गाल फुगवून रडणे आणि दागिन्यांसाठी हट्ट करणे या बालिकासुलभ क्रिया हा पित्याच्या अंतःकरणाचा उद्दीपन विभाव; पित्याच्या ठायी वसणारी ममता हा स्थायी भाव; कन्येची चेष्टा करून तिला चिडवणे आणि कौतुकाने तिची समजूत करीत असताना आल्हाद होणे हे व्यभिचारी भाव; आणि तिच्या बदलत्या वृत्तीमुळे गालातल्या गालात हसू येणे आणि नेत्राचा विकास होणे हे अनुभाव होत." आणि याच कवितेची रसिकागत रससामग्री अशी—"आपल्या 'कन्ये'च्या बालसुलभ हट्टाकडे कौतुकाने पाहणारा पिता, हा रसिकाचा

आलंबन विभाव; 'कन्येचे हसणे रडणे पाहून पित्याला होणारा आनंद हा उद्दीपन विभाव; ममता हा स्थायीभाव; आणि त्यांच्यामुळे येणारे हसे आणि नेत्रांचे संकोच पावणे हे अनुभाव होत." संस्कृत साहित्यशास्त्रात एकट्या विश्वनाथाने आपल्या 'साहित्यदर्पणा'त 'वत्सलरसा'ला स्वतंत्र रस म्हणून मान्यता दिली आहे. 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' ही काव्याची केलेली सुप्रसिद्ध सर्वश्रुत व्याख्या त्याचीच आहे. 'वत्सल' हा 'रस' मातापित्यांच्या ठायी असतो. ममत्व हा स्थायिभाव उद्दीपित झाल्यानंतर प्रसंगानुसार वत्साच्या रुसव्याने, हट्टाने, कौतुकाने, वियोगाने आनंद, अभिमान, दुःख इत्यादी व्यभिचारी भावांचे दर्शन होते. त्याचा विचार करूनच बहुधा विश्वनाथाने 'साहित्यदर्पणा'त त्याचे वेगळे विवेचन केले असावे.*

'माझी कन्ये'तला प्रसंग नित्याच्या अवलोकनातला आहे. कविकन्यका शाळेत गेली असताना तिला निरलंकृत पाहून कुणा तरी मैत्रिणीने "अहाहा ! ही पहा भिकारीण आली" असे उद्गार काढले. ते कन्यकेला आवडले नाहीत. ते ऐकून तिला वाईट वाटले. ती हिरमुसली झाली; आणि घरी येऊन वडिलांजवळ दागदागिन्यांचा आणि शानदार कपड्यालत्त्यांचा हट्ट घेऊन बसली.

कवितेचा आरंभ मुलीच्या रुदनाने झाला आहे. बाप तिला गोंजारून–गोंजारून तिची समजाविशी करीत आहे. कवितेच्या पहिल्या सात दिंड्या मुलीच्या कौतुकाने आणि बापाने केलेल्या समजाविशीच्या प्रयत्नाने व्यापल्या आहेत. गाई पाण्यावर आल्या म्हणजे मुलीचे डोळे आसवांनी डबडबले आहेत. ती रुसलीफुगली आहे. हळुहळू तिच्या डोळ्यांतून गंगायमुना यांचे दोन प्रवाह ओघळत येऊन ते तोंडापाशी एकमेकात मिसळत आहेत. ती गौरवर्णाची देखणी मुलगी आपल्या आईबापांची लाडकी आहे. आपल्या लीलांनी तिने त्या उभयतांची मने हिरावून नेली आहेत.

दुसऱ्या व तिसऱ्या दिंडीवर स्वतः बींनी स्पष्टीकरणार्थ टीप दिली आहे. ते लिहितात, "नासिकेवर हे गावाचे रूपक आहे. नाकातून निघणाऱ्या उष्ण श्वासांच्या प्रभावाच्या 'अत्युक्ती'ची फोड करण्याची काही जरूर दिसत नाही. या व पुढील दिंडीत हात, पाय, तोंड, डोळे इत्यादी अवयव सूचित आहेत." वस्तुतः बींनी 'नासिका' शब्दावर श्लेष साधला आहे. 'नाक' व 'नासिक शहर' असे त्याचे दोन अर्थ आहेत. 'नासिक' हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. पण मुलीच्या आकांतामुळे आता त्यातून श्वासांचे ऊन वारे वाहत आहेत. त्यांच्या उष्णतेमुळे मुलीचे गाल अधिकच लाल झाले आहेत. समीक्षेची नवीन भाषा वापरावयाची झाल्यास गालांसाठी काश्मीरातील टपोऱ्या गुलाबांची प्रतिमा योजण्यात आली आहे. जुन्या आलंकारिकांच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास येथे 'व्यतिरेक' साधला असून, गालांना काश्मिरी गुलाबांपेक्षा अधिक किंवा गुलाबांना गालांपेक्षा कमी लेखले आहे असे म्हणता येईल. 'नंदना'चे 'मूल' आणि 'इंद्राचे वन' असे दोन अर्थ असल्यामुळे त्यावर श्लेष आहे. मुलगी हट्ट करताना रागारागाने हातपाय आपटून थयथयाट करीत आहे. तिच्या नाजूक हातपायांसाठी 'नंदन वनातील वल्लरी'ची प्रतिमा योजिली आहे. पुढे डोळ्यासाठी नक्षत्रांची, चेहेऱ्याकरिता चंद्राची आणि अश्रूंसाठी लहान मण्यांच्या पेंड्याची किंवा दुडीची प्रतिमा योजण्यात आली आहे. मुलगी संतापाच्या भरात जमिनीवर गडबडा लोळू लागते. त्यामुळे तिचे अश्रू जमिनीवर सांडू लागतात. त्या प्रसंगावर बींना 'उत्पाता'ची कल्पना सुचली आहे.

पुढच्या दिंडीत 'विभा आपटे' आणि 'विमला प्रधान' ही मुलीच्या मैत्रिणींची दोन नावे आली असून, त्या दोघींना एक यथार्थ 'उपमा' देण्यात आली आहे; —

> **गौर चैत्रिची तशा सजुनी येती**
> **रेशमाची पोलकीं छिटें लेती**

मुलीच्या मैत्रिणींना चैत्री हळदीकुंकवातील वसंतगौरीची दिलेली 'उपमा' अतिशय अनुरूप आहे.

---

* 'स्फुटं चमत्कारितया वत्सलं च रसं विदुः
स्थायी वत्सलता स्नेहः पुत्राद्यालंबनं मतम्
उद्दीपनानि तच्चेष्टा विद्याशौर्यादयादयः
आलिंगनाङ्ग संस्पर्श शिरश्चुंबनमीक्षणम्
पुलकानंद बाष्पाद्या अनुभावाः प्रकीर्तिता
संचारिणोऽनिष्ट शंका हर्षगर्वादयोमताः ॥
—साहित्यदर्पण

मैत्रिणींची नावे काल्पनिक आहेत किंवा नावाच्या या मुली खरोखर अस्तित्वात होत्या ही चर्चा व्यर्थ आहे. या कवितेला बींनी 'माझी कन्या' असा मथळा दिला असला, तरी ही कविता त्यांच्या कोणत्याही कन्येला अनुलक्षून नाही असे सांगण्यात आले आहे. ते खरेही असेल. परंतु कवितेतील कवीची 'तन्मयता' लक्षात घेतली आणि एकजात सर्व सहृदयांच्या हृदयाला हात घालण्याची शक्ती पाहिली म्हणजे ही कविता कवीच्या अनुभवातून बाहेर पडली आहे असे वाटल्यावाचून राहात नाही.

यानंतरच्या दिंडीत बापाने तर्काने मुलीच्या रुसण्याफुगण्याचे कारण ताडले आहे. तो तिला प्रेमाने विचारतो, "तुला लंकेच्या पार्वतीप्रमाणे पाहून तुझी एखादी मैत्रीण साभिमान झाली; आणि ती तुला 'ही पहा भिकारीण आली।' असे म्हणाली की काय?" इथे कवीची प्रेमळ आणि शांत वृत्ती व्यक्त होते. ज्या मुलीने आपल्या मुलीचा अवमान केला, तिला तो शिव्याशाप देत नाही. उलट आपली मुलगी 'लंकेच्या पार्वती'सारखी दिसली म्हणून ती साभिमान झाली व बोलली असे त्या बोलणाऱ्या मुलीचे सौम्यपणाने समर्थन करतो.

'लंकेची पार्वती' ही लोकोक्ती आहे. तिच्या संबंधी दोन पुराणकथा प्रचलित आहेत. पहिली कथा अशी;— 'रावणाने उग्र तपाने शंकराला प्रसन्न केले, आणि त्यांच्या साध्याभोळ्या स्वभावाचा फायदा घेऊन त्याच्यासकट सर्व देवदेवतांना आपल्या बंदीखान्यात बंद केले. शंकरपार्वतींना तर त्याने कैलासासकट उचलून नेले. रावणाची लंका ही समृद्ध असल्यामुळे सोन्याची आहे, अशी एक जुनी समजूत आहे. पुढे देवदेवतांची 'सुटका झाल्यावर पार्वती शंकरासह लंकेहून परतली. पुष्कळ काळ तिचे लंकेत वास्तव्य होते. पण त्या सोन्याच्या प्रदेशातून ती जी परत आली, ती शंकरांप्रमाणेच भणंग भिकारी म्हणून.' यासाठी ज्या स्त्रीच्या अंगावर एखादाही फुटका मणी नसेल तिला 'लंकेची पार्वती' म्हणतात. दुसरी पुराण कथा अशी;—'पार्वतीला जेव्हा रावणाने बंदीत टाकले, तेव्हा तिच्या सर्वांगावर दागिने होते. परंतु लंकेतील राक्षसांनी ते वुचडून तिला 'दीन' करून टाकली. म्हणून दरिद्री स्त्रीला 'लंकेची पार्वती' म्हणतात.' पुढे मैत्रिणींना नाममात्र नावे ठेवून मुलीची समजूत घालण्याचा केवळ प्रयत्न आहे.

यापुढला भाग दोन दिंड्यांचा आहे. त्यात बींनी आपल्या प्रतिभेने काव्यमय युक्तिवाद केला आहे. बाप म्हणतो, "अग ! मी गरीब असेन. पण मी गरीब आहे म्हणून तू कशी गरीब ठरतेस ?" हे आपले विधान स्पष्ट करण्यासाठी त्यांनी काव्यदृष्ट्या सोने आणि माती, कमळ आणि चिखल व फुलांचा हार सूत यांचा चमत्कृतिजनक जन्यजनक–संबंध जुळवून दाखविला आहे. येथे सर्वत्र त्यांनी 'दृष्टांत' अलंकाराचा उपयोग केला आहे. सोने खाणीच्या मातीत उत्पन्न होत असले, तरी त्याचे अलंकार सम्राट् आपल्या शिरावर धारण करीत असतो; कमळ चिखलात उपजले, तरी वासंतिका त्याला खुलवून फुलवून त्याचा सत्कार करीत असते; आणि फुलांची माळा जरी सुताशी संबद्ध असली, तरी ती परमेश्वराच्या गळ्यात पडत असते. तुझा जन्म जरी दरिद्री जनकाच्या घरी झाला असला, तरी तुझे भवितव्य दिव्य आणि भव्य आहे असे कवी येथे सूचक सूनोवाच करतो.

या पुढल्या दोन दिंड्या सिद्धांतांच्या स्वरूपाच्या आहेत. निसर्गात लहान नदी, प्रतिपदेची चंद्रकोर आणि चिमुकली कोमल वेली यांचा यथावकाश विकास दृष्टीस पडतो. त्याचप्रमाणे आपल्या लेकीचा शारीरिक व बौद्धिक विकास होणार आहे याची बापाला खात्री आहे. तो मुलीला म्हणतो की, "तू मोठी भाग्याची होणार आहेस याविषयी मला शंका नाही." आणि मग एक सिद्धांत मांडतो की, आजच्या या उमलत्या पिढीतूनच उद्याच्या तेजस्वी स्त्रिया आणि शूर पुरुष उदयाला येणार आहेत. आपली कन्या आज रडणारी रुसणारी लहान मुलगी असली, तरी उद्या ती नावाजलेली स्त्रीरत्न म्हणून चमकणार आहे अशी त्याची दृढ श्रद्धा आहे.* तो पुढे युक्तिवाद करतो,— "जिथे गंगा आणि यमुना यांचा सुखद संगम आहे,

---

* अशीच कल्पना वर्डस्वर्थच्या कवितेत आढळते. मात्र तिची भाषा कूटाच्या स्वरूपाची आहे. आजची मुले उद्याची मोठी माणसे आहेत असेच त्याला सुचवायचे आहे.

'The child is father of the man'
—Wordsworth. 'My heart leps up'.

त्या प्रयागला तिसरी ' सरस्वती ' नदीची धारा गुप्त आहे. त्या तीन्ही धारांना ' त्रिवेणी ' असे नाव आहे." या ठिकाणी बींनी टीप दिली आहे,—" त्रिवेणी संगमात सरस्वती नदी दिसत नाही, ती गुप्त आहे, अशी लोकप्रसिद्धी आहे " इथे ' सरस्वती ' हा शब्द श्लिष्ट आहे. ' सरस्वती ' म्हणजे त्या नावाची ' नदी ' आणि ' विद्येची अधिष्ठात्री देवी. ' मुलगी हट्टी असली, तरी विद्यावती आहे असे या ठिकाणी त्यांना सूचित करावयाचे आहे. त्या मुलीला ' रूप ' आहे, ती ' सद्गुणी ' आहे. तेव्हा या दोघांच्या जोडीला तिसरे तिचे ' भाग्य ' असलेच पाहिजे असे ते सांगतात.

यापुढच्या चार दिंडयांत त्या मुलीच्या ' निरागस रूपा 'चे अभिराम चित्र आहे. बी म्हणतात,— " मुली ! तुझ्या तेजस्वी डोळ्यांतून बालकिरणे फाकतात; आणि ती तुझ्या मुखावर तेजाचा नाच करतात. तुझे डोळे असे पाणीदार आहेत की पाच; माणिक, हिरा आणि मोती यांच्याशी त्यांची किंचित्‌ही तुलना करता येत नाही." मुलीच्या डोळ्यांत चैतन्य आहे. पण ही रत्ने अचेतन आहेत असे येथे कवींनी ध्वनित केले आहे. यापुढील वर्णन मुळातच पाहावे इतके ' सुंदर ' आहे,—

लाट उसळोनी जळीं खळें व्हावें;
त्यांत चंद्राचें चांदणें पडावें;
तसें गालीं हासतां तुझ्या व्हावें
उचंबळुनी लावण्य वर वहावें !

बींनी या ठिकाणी ' अतिशयोक्ती व ' उपमा ' यांचे अद्वैत साधले आहे; आणि ' लावण्य ' हा खुबीदार शब्द योजण्यात रसिकतेचा परमावधी केला आहे. ' लावण्या 'चा संबंध ' लवणा 'शी आणि ' समुद्रा 'शी आहे. ' लवण ' जसे ' समुद्रा 'पासून वेगळे होत नाही, तसेच ' लावण्य ' ' रूपा 'पासून अलग करता येत नाही. यापुढच्या दिंडीत बालिकेच्या लहानशा देहयष्टीसाठी ' लघु रंग देवते 'ची प्रतिमा योजिली आहे. ती जितकी नवी व निराळी तितकीच औचित्यपूर्ण आहे;—

गौरकृष्णादिक वर्ण आणि त्यांच्या
छटा पातळ कोवळ्या तमवयांच्या
सर्वे घेउनि तनुवरी अद्‌भुताचा
खेळ चाले लघु रंगदेवतेचा !

क्षणाक्षणाला नवेनवे रंग दाखविणारी ' बालसृष्टी ', ' नाट्यसृष्टी ' इतकीच ' अद्‌भुत ' आहे. अनेक बाबतींत त्यांच्यात विलक्षण साम्य आहे. बी सांगतात की, ती मुलगी निसर्गतःच सुंदर आहे. जे जे काही जवळ देण्यासारखे आहे, ते ते सर्व निसर्गाने तिला दिले आहे. दानाच्या बाबतीत त्याने परिसीमा गाठली आहे. अशा त्या स्वभावसुंदर मुलीला निरनिराळे दागिने घालून आणि नाना प्रकारची वस्त्रे नेसून कृत्रिम साजशृंगार करण्याची काही आवश्यकता नाही. जी जात्याच सुंदर आहे, तिला बाहेरील साजाची बिलकुल गरज नाही. बींचा हा युक्तिवाद ऐकताना ' अभिज्ञान शाकुंतला '. तील कालिदासाच्या वचनाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.* बींची कविता वाचताना मधून मधून अभियुक्त वाङ्मयातील सौंदर्यस्थळांचे अपरिहार्य स्मरण होते, हा त्यांच्या कवितेचा एक मोठा विशेष आहे. ती मुळचीच सुसंस्कृत, परिष्कृत व स्वभाव-विष्कृत आहे !

यापुढील तीन दिंडयांत बींची अध्यात्माची आवड प्रकट झाली आहे. मुलीच्या हटवादी स्वभावाची कारणमीमांसा करताना त्यांच्या प्रतिभेने थेट ' आदिमाये 'पर्यंत धाव घेतली आहे. यासंबंधी त्यांनी जे विवरण केले आहे, त्याच्या पद्धतीत श्रीज्ञानेशांचे अनुसरण आहे. ' आदिपुरुष ' जो नारायण, त्याची जी ' इच्छाशक्ती ', तीच त्याची पत्नी. त्या ' इच्छे 'ला ' काम ' हा क्लिष्ट व इष्ट शब्द इथे पडला आहे. तिलाच ' आदिमाया ', ' महामाया ', ' मूळमाया ', ' माया ' इत्यादी नावे आहेत.† ती सृष्टीतील निरनिराळ्या दृश्यांच्या रूपांनी नित्य नटत असते. तिच्या त्या नटण्यामुरडण्याच्या आवडीमधून ' विश्वा 'चे हे

---

* ' किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् '
शाकुन्तलम् १–१७

† (१) ' माये 'चे वर्णन ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायात ६६ ते ९९ आणि १५४ ते १५६ ओव्यात आले आहे. (२) परमेश्वराच्या ' इच्छे 'ची कल्पना बायबल्‌मध्येही आहे. ' And God said, Let there there be light; aud there was light'—Genesis. 3. (३) ' आदिमाये 'च्या दागदागिन्यांच्या सोसावर केशवस्वामींचे एक गाणे आहे—श्रीहरिभजनामृत भाग १. संपादक संग्राहक ज. र. आजगांवकर.

लेणें जीवमात्रांना प्राप्त झाले आहे. त्या आदिमायेच्या अवताराच्या काळापासूनच आपण सुंदर दिसावे अशी सर्वांची अभिलाषा आहे. ही काही आजकालची नवी नाही. परंतु 'स्त्रिया' या एकापरीने 'माये'चेच रूप असल्यामुळे त्यांना थाटामाटाची हौस विशेष असते. त्यात त्यांना दागदागिन्यांचा सोस अतोनात असतो. तसाच तो 'कन्ये'ला आहे असे बी सांगतात; आणि तिची समजाविशी करताना म्हणतात;— "मुली! तुझा जन्म स्त्रीचा असल्यामुळे तुझ्या ठिकाणीही ती नटण्यामुरडण्याची इच्छा बीजरूपाने वास्तव्य करीत आहे." तिला ते "तू विलासाची मोगरी होशील" असा आशीर्वाद देतात. मोगरीच्या रोपाचे फूल शुभ्र, सुवासिक, टपोरे आणि सुंदर असते. पुढे प्रौढ वयात तुझे दिवस आमोदाप्रमोदात जातील अशी त्या आशिर्वचात सूचना आहे.

पुढील दोन दिंड्यांत मुलीच्या भावी भाग्योदयाचे मनोवेधक चित्र आहे. बी सांगतात, "प्रत्येक दिवशी या मुलीची प्रगती पाहून असे वाटते की, ब्रह्मदेवाने हिचा विवाहसंबंध कुणातरी तपस्व्याशी, भाग्यवंताशी, पुण्यवंताशी, गुणवंताशी, महात्म्याशी किंवा रणवीराशी जुळविला असावा." हे सांगताना बींनी तप:सिद्धीसाठी 'समया'ची, सौभाग्यासाठी 'भोगा'ची, पुण्यासाठी 'स्वर्गा'ची, कीर्तीसाठी 'मुकुटा'ची महात्मतेसाठी 'यश:श्री'ची आणि रणधैर्यासाठी 'कटचारीच्या धारे'ची प्रतिमा योजिली आहे. या योजनेत नवेपणा आणि निराळेपणा आहे. परंतु कालिदास ज्याप्रमाणे उपमेच्या योजनेत देखील व्याकरणदृष्टचा अनुरूपतेसाठी लिंगविचार करतो, त्याप्रमाणे बींनी विचार केलेला नाही.

या पुढच्या दोन दिंड्यांत बापाने मुलीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला आहे, तो तिला मखमलीचे पोलके, मोत्यांची कुडी आणि डोक्यात खोवण्याचे सोन्याचे गुलाबाचे फूल विकत आणून देण्याचे आश्वासन देतो. तिची हौस पूर्ण करण्याची हमी घेतो. मात्र तिला 'प्रलय'. आवरण्याची विनंती करतो. 'प्रलय' म्हणजे 'विश्वाचा अंत' तो आला की जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन सारे जग त्या पाण्यात बुडणार आहे अशी आपली प्राचीन समजूत आहे. मुलगी रडून रडून डोळ्यांतून पाण्याने पाट वाहवीत आहे, त्यावर बींनी हा 'विनोद' केला आहे. हा विनोदाचा प्रकार इंग्रजी आहे. येथे बींची भाषा वर्मी लागावी अशी मर्मभेदक (Sarcastic) परंतु अर्थदृष्टचा सुंदर व सूक्ष्म आहे. तिच्यात अपत्याविषयीची आत्मीयता व वत्सलता कायम आहे. अशा प्रकारचा विनोद मराठी भाषेत विरळा आहे. पुढच्या दिंडीची भाषा अशीच विनोदी, मार्मिक, मर्मभेदक व सहानुभूतिपूर्ण आहे. तिचा संबंध मागच्या तिसऱ्या दिंडीशी आहे. मुलीच्या रडण्याने तिच्या तोंडावर ओघळ येऊन ते प्राकट झाले; आणि तिचे डोळे सुजले. यावर बी कल्पना करतात;—

> ढगें मळकट झांकोनि चंद्रिकेला,
> तिच्या केलें उद्विग्न चांदण्याला;
> हास्यलहरींनी फोडुनी कपाट
> प्रकाशाचे वाहवी शुद्धपाट !

इथे 'काव्या'त व्यक्त झालेली ही हृदयंगम कल्पना कितीही पाने खर्च केली, तरी निराळ्या शब्दात मांडता येणे शक्य नाही !

कवितेच्या अखेरअखेरच्या तीन दिंड्यांत बापाच्या भावनेचे साधारणीकरण झाले आहे. ही कविता आपल्या व्यक्तिगत भावनेतून निर्माण झालेली नाही असे कवीने किती जरी सांगितले, तरी ते पटत नाही. या शेवटच्या दिंड्या वाचताना अखिल जगतातले कुटुंबवत्सल बाप जणू काही बींच्या मुखाने आपली आंतरिक व्यथा वेशीवर टांगत आहेत असे वाटते. त्या व्यथेच्या व्यक्तीकरणात व्यक्तिगत चिडकेपणा, रडकेपणा किंवा समाजाला शिव्याशाप नाहीत हे विशेष ! त्यात मुका सोशिकपणा आहे. ज्यांच्यात प्राण कायमचे गुंतले आहेत अशा अपत्यांचे कोडकौतुक पुरवता आले नाही म्हणजे बापाचे अंत:करण कसे पिळवटून निघते याची कल्पना येण्यास तशाच तऱ्हेचा अनुभव आवश्यक आहे. बी उद्गारतात,—

> आज धनिकाचा पडे फिका साचा
> असा माझा अभिमान गरीबाचा
> प्राप्त होतां परि हे असे प्रसंग
> हृदय होतें हदरोनिया दुभंग !

---

* 'मासिक मनोरंजन.' आक्टो. १९१५.

दुसऱ्या ओळीचा पाठ ' मनोरंजना 'त ' असा आहे मज गर्व गरीबीचा ' असा होता. तो बींनी 'फुलांच्या ओंजळी 'त बदलला आहे. त्यामुळे कवितेची सुंदरता दुणावली आहे. 'अभिमान ' आणि 'गर्व ' यांत अंतर आहे. 'अभिमान ' चांगला. तो हवा. ' गर्व ' वाईट. तो नको. कवी गरीब आहे, पण भिका नाही ! त्याचे हृदय दु:खाने दुभंगते.

इतके सांगूनसमजावूनही मुलीचा हट्ट ज्यावेळी थांबेना, त्यावेळी बाप विषण्ण झाला; पण मुलीची गम्मत करावी या हेतूने उद्गारला; —" आम्हा कमनशिबी बापांना तो देवबाप्पा गुणी मुले का म्हणून देतो हे लांब त्याच्या गावाला मी जातो आणि विचारतो." ते शब्द कानी पडताच मुलगी एकदम आपला हट्ट विसरली; आणि बापाच्या गळ्यात आपल्या रेशमी हातांचा पाश गुंतवून म्हणाली,—" मी तुमच्या बरोबर येते." या ठिकाणी कवितेतील करुण रसाचा कळस झाला आहे. 'मृत्यु ' हे मानवी मनाला पडलेले एक कायमचे 'गूढ ' आहे. बी अध्यात्माचा अभ्यास करणारे. तेव्हा त्यांनी नकळत अगदी सहजगत्या 'गूढ ' शब्द येथे टाकला आहे. मुले गावास जाण्यास फार उत्कंठित असतात. बाप गावाला जात आहे हे कळताच मुलगी त्याच्या गळ्यात हातांचा पाश घालते. तो रेशमासारखा नाजूक असला, तरी तोडण्यास कठीण आहे. बापाने नकळत मृत्यूच्या कल्पनेचा उच्चार केला. निरागस मुलीला ती कल्पना कळणे शक्य नव्हते. ती न कळताच, मी येते असे ती म्हणताच, ती गोष्ट बापाच्या लक्षात आली; आणि त्याचे डोळे पाणावले !

बींच्या या करुण कवितेत दिंडीच्या एकूण चौऱ्याण्णव ओळी आहेत. त्यामुळे रसाचा परिपोष होण्यास भरपूर अवकाश व अवसर प्राप्त झाला आहे. एखादे रम्य फूल ज्याप्रमाणे हळुहळू फुलावे, फुलून फांदीवर झुलावे, आणि झुलताना त्याच्या सौरभाने आसमंत दरवळावे, त्याप्रमाणे, अर्धशतकाहून अधिक काळ ही कविता मराठी साहित्यात दरवळत आहे. बींच्या भाषेत बोलावयाचे म्हणजे या फुलाच्या पाकळ्या 'अम्लान ' आहेत. त्याचा सुगंध कितीही सेवन केला, तरी तृप्ती होत नाही. तो पुन्हा पुन्हा सेवन करावासा वाटतो. करुणरसही आनंददायक असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे बींची 'माझी कन्या ' आहे.

आणिमा सिद्धीचा अभिनव योगी

—दि. ब. पंडित

येत्या ११ तारखेला भारताचा अमृतमंगल दिन आहे. 'भारता'चा अशी मर्यादा एवढ्याचसाठी घालायची की, आजच्या दिवशी विश्वाचे मांगल्य भारतातील भूतलावरती अवतरले, ही गोष्ट अजूनही विश्वाला उमजलेली नाही. यात खेदही मानायचे कारण नाही, कारण विश्वात नवीन युगाचे प्रवर्तन करणारी शक्ती जन्माला येत असते त्यावेळी अशा शक्तीचा उदय होत आहे, हे त्या विश्वालाच उमजत नसते. कित्येकदा तर त्या शक्तीचा अव्हेर करायला संपूर्ण विश्वच 'जणू काय एकोपा करून उभे ठाकत असते. पण, अशा अव्हेरण्याने ती शक्तो अव्हेरली जात नाही. अशा प्रतिकाराने ती प्रतिसारली जात नाही. जर जडस्थिरतेला क्रान्तीवर अशी सहजासहजी मात करता आली असती तर जगाची प्रगती झालीच नसती. ज्यात गती उरत नाही, ज्याला उत्क्रमण ठाऊक नाही, जेथे परिवर्तन शक्य नाही, ते सारे मृत होय. मृतीची व्याख्याच मुळी ही अशी आहे. समाज या मृतावस्थेला येऊन पोचत नाही असेही नाही. अगदी या टप्प्यापर्यंत प्रवास करणारे समाज होऊन गेलेले आहेत. अशा टप्प्याला येऊन पोचलेल्या समाजाला मृतीच्या खायीतून वाचवायचे ईश्वराच्या मनातून असले की, तो कोणाला तरी क्रांतीची प्रेरणा देत असतो. त्याच्या कृतीत, वाणीत, मनात, अमृतकुंभ असतात. या अमृताने संजीवनी लाभून समाज मृतीपासून मागे वळतो. त्याला नवीन जीवनलाभ घडत असतो, त्या व्यक्तीबरोबरच समाजाचाही अमृतमहोत्सव येऊन ठेपतो.

अशा अमृताची अधिकारिणी एक व्यक्ती पाऊणशे वर्षांपूर्वी भारतात जन्माला आली. आपण त्या व्यक्तीला विनोबा म्हणून ओळखतो. आज विनोबा ही केवळ व्यक्ती नाही. तो एक मूर्त विचार आहे. त्यांचे जीवन या विचाराचे विशदीकरण करणारी एक गाथा आहे. एवढेच नव्हे तर या गाथेतील विचारांचे आचरण करून कृतकृत्य होणारी ती एक संस्था आहे. म्हणूनच विनोबा एकाकी असले तरी सुसंघटित दुष्ट अर्थविचारांची आणि तदनुगामी राज्यव्यवहारांची ती एक मोठी व्यथा आहे.

पण, विनोबाजींना परपीडादायी बुद्धीचा स्पर्शही नाही. त्यांचा विचार वाचवावयाचा आहे, मारावयाचा नाही. सुष्टता वाचू लागली की, दुष्टता मरू लागते. यात हिंसा नाही. प्रेमाने शुद्ध विचारांचे प्रसरण होऊ लागले की, अमंगल विचारांची व्याप्ती कमी होत जाते, यात निराकरणात्मक आक्रमण नसते, तर क्रमशः लोप करीत आत्मसात करण्याची प्रक्रिया असते. प्रकाशाने अंधाराचा पराभव होतो असे आपण लौकिक भाषेमध्ये म्हणतो. पण, प्रकाशाचे अंधाराशी वैर नसते. तसे जर असते तर त्याने त्या तमाला उजळून कशाला टाकले असते ? त्याचे अनुरंजन करण्याचा आव आणून त्याने त्याला जास्तच काळवंडून टाकले असते. अशाने अंधःकाराला पुष्ट झाल्याचा आनंद झाला असता हे खरे, पण त्याने तम मात्र माजले असते. विनोबाजींनी तमालाही उजळून टाकण्याचे त्याशी प्रेमळ वैर मांडले. म्हणून तामसी विचाराला विनोबांचा विचार शत्रुवत वाटतो. त्यांच्या दृष्टीने विनोबाविचार एक महान पाखंड आहे. सध्याच्या कोणत्याही आत्यंतिक आर्थिक विचारांच्या दृष्टीने विनोबा साक्षात चार्वाकाचा अवतार आहे. त्यांनी विनोबाजींना कितीही दूषिले तरी, कोणत्याही अर्थविचाराचा पाया जो स्वार्थ त्याच्या आड दडलेला आणि कोणत्याही आर्थिक प्रमेयात कधीही ग्रथित न झालेला परार्थ त्यांनी मानवी मनात सामाजिक दृष्टीने जागृत केला आणि त्या

परार्थाआड दडलेल्या परमतत्त्वाचे दर्शन साऱ्या जगाला घडविले हे सत्य आहे. परमतत्त्वाचा ज्या बुद्धीने शोध घेतलेला आहे, तिच्या इतकी परमपवित्र आस्तिक्यबुद्धी आपण शोधावयाची कोठे?

जीवनाच्या प्रत्येक क्षणाला आस्तिक्यबुद्धीकडून कृतीची प्रेरणा लाभणारा थोर पुरुष शतकानुशतकांनी एखादे वेळीच जन्माला येत असतो. सामान्य जनांना शुद्ध आस्तिक्यबुद्धीच नसते. जी काही अधूनमधून उदित होते, ती प्रेरणादायी रेलच अशी निश्चिती नसते आणि अपवाद म्हणून अशी प्रेरणा लाभलीच तर त्यानुसार कृती करण्याचे सामर्थ्य नसते आणि असलेले सामर्थ्य गोळा करून जर कोणी कृतीला प्रवर्तलाच तर त्याला ऐन वेळेला अनेक व्यामोह घेरून टाकीत असतात. त्यामुळे या जगात सत्कृती मोठी दुर्लभ आहे. तरीही तिचे दर्शन केव्हा ना केव्हा घडतेच आणि सामाजिक मनाला विसावा देऊन सत्त्वाच्या अस्तित्वाची खूण पटवून त्याची श्रद्धा दृढ करते आणि आस्तिक्य बुद्धीला बलिष्ठ करते. विरल सत्कृतीचाही असा प्रभाव असल्याने ज्याचे सारे जीवन मांगल्यमय विचारांपाठी येणाऱ्या सत्कृतीने नटलेले आहे, त्याला जर सामाजिक मनात विभूतिमत्व प्राप्त होऊन तो आपणापेक्षा कितीतरी अधिक ईश्वरासन्निध गेला आहे असे वाटले -आणि 'हा पहा सायुज्याचा यात्रिक' म्हणून त्याच्याकडे अंगुलीनिर्देश केला तर नवल ते काय?

आणि विनोबाजींनी ज्या परमेश्वराची कल्पना केली आहे त्या परमेश्वराशी सायुज्यतेने विलीन होऊन जाण्यासाठी त्यांचा आत्मा आसुसलेला आहे, ही गोष्ट उघड आहे. आज जो सरूपतेचा अधिकारी आहे तो सायुज्यतेचा पांथस्थ आहे, ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे. सरूपतेपाशी त्यांचा आत्मा विरमलेला नाही. पदयात्रेने चौदाही भुवने पायातळी ओलांडून त्यांनी भगवंताचे दर्शन घेतले आहे. 'भुवनाकार भगवंत' हे त्यांचेच शब्द आहेत. त्यांना भगवंत भुवनाकार गवसला याला त्यांची गेल्या अर्धशतकाहून दीर्घ काळाची साधना कारणीभूत होत आहे. या साधनेचा काही काळ त्यांनी एका परीने विजनवासात घालविला आहे, काही परम 'सु'जन सहवासात आणि या 'सु'च्या सान्निध्याने त्यांना ज्यावेळी 'स्व'ची विश्वव्यापक विशालता मनी गवसली त्यावेळी त्यांनी स्वजन रहिवास सुरू केला आणि हा रहिवास प्रवास ठरून त्यांना भुवनाकार भगवंताचा साक्षात्कार झाला. आता त्यांच्या आयुष्याची ईश्वरदत्त 'तीन वीस आणि दहा वर्षे' होऊन पाच वर्षे लोटली आहेत. हा जास्तीचा लाभलेला काल ईश्वराचीच विशेष कृपा होय. तो त्याच्याच सेवेला वाहिला पाहिजे. होऊन गेलेली सेवा भुवनव्यापी सुजनांची झाली. सेवा तर होतच राहाणार आहे, आता तिचे 'ध्येय' निराळे राहणार आहे. आता भुवनव्यापक स्वजन ध्येय नव्हे तर भुवनाकार भगवंत ध्येय आहे. या भगवंताचे ध्यान करायला स्वजनांशी विमुख होण्याची आवश्यकताच नाही; तो ध्यानप्रकार येथे निषिद्ध आहे. या ध्यानप्रकारात भुवनाकार भगवंताशी अभिमुख व्हावयाचे असते. या ध्यानप्रकारासाठी त्यांनी नवा शब्द योजला आहे. ते भुवनाकार भगवंताचे 'अभिध्यान' करीत आहेत. या अभिध्यानाच्या मुक्कामाला येऊन पोचण्यासाठी त्यांनी हयातभर अविरत साधना केलेली आहे. वयाची विशी ओलांडताच स्वगृहत्याग केला आणि आप्तस्वकीय या अर्थी स्वजनत्यागही केला. नवल असे की, तदनंतर त्या साधनेने त्यांनी अवघे विश्व आपुले घर करून टाकले आणि या विशाल भुवनात ते जेथे दृष्टी वळवितील तेथे त्यांना स्वजन गवसू लागला. क्षुद्र स्वजन आणि लहानग्या स्वगृहत्यागाची परिणती अखेरीला विशाल स्वजनप्राप्ती आणि जगदाकार गृहाचा निवास या रूपात खुलू लागली. जेथे जेथे विचरावे, ते आपलेच घर आणि जेथे पहावे तेथे आपलाच स्वकीय, आपलाच सखा, आपलाच सोयरा अशी स्थिती झाल्यावर या भुवनाबाहेर त्यांनी भगवंत शोधायचा कोठे? आणि त्याचे ध्यान मांडायला या भुवनाशी पराङमुखता जोडायची कशी? त्यांची ध्यानधारणा आणि योगसाधना म्हणजे यापुढे केवळ भुवनाकार भगवंताचे अभिध्यान एवढीच कार्य तो. यापरतो दुसरी असूच शकत नाही.

आता त्यांनी भुवनाकार भगवंताचे अभिध्यान करण्याची अभिनव साधना चालविलेली आहे. आजपर्यंत या भगवंताचे दर्शन व्हावे म्हणून ते भुवनाचे यात्रिक होऊन भ्रमणाच्या कर्मात गुंतलेले होते. त्यांचा क्रमही चालू होता, कर्मही चालू होते आणि परिणामत: क्रियाही घडत होती. कर्माचरणाचे परिणामफळ जे उमटते ती क्रिया. जो कर्मत्याग करतो तो निष्क्रीय

बनून जात असतो. विनोबाजींचा संकल्प कर्ममुक्त-होण्याचा आहे, याचा अर्थ त्यांना कर्मत्यागाची अपेक्षा आहे असा मुळीच नाही. त्यांना कर्मांचा संक्षेप करीत करीत कर्मविसर्जन करावयाचे आहे. कर्म आणि क्रिया यांचे व्यस्त प्रमाणाचे नाते आहे. औषधाची मात्रा सूक्ष्म, सूक्ष्मतर करीत नेली की, तिला लाभणारी शारीरिक प्रतिक्रिया जशी तीव्र, तीव्रतर होत जाते; त्याचप्रमाणे कर्मांचा जो जो संक्षेप होत जातो, तसतशी क्रिया अधिक सघन बनत जाते. म्हणूनच आता आपण सूक्ष्मात जावे अशा संकल्पात विनोबाजींचा काळ व्यतीत होतो आहे. विनोबाजी म्हणतात की, स्थूल कर्मयोगाची एक मर्यादा आहे, एकदा ही मर्यादा गाठली की तेथून निवर्तन व्हायला हवे, तेथेच थांबून चालायचे नाही. विकासाची चरमसीमा गाठल्यावर प्रगती खुंटते. जर आवर्तनात्मक घिरट्या नको असतील तर निवर्तन आवश्यक आहे. हे निवर्तनही प्रगत असेल तर ते कर्मत्याग किंवा कर्मलोभाची दिशा पत्करणार नाही तर सूक्ष्म कर्मयोगात परिणत होईल. म्हणूनच महात्माजींच्या सान्निध्यात आल्यापासून त्यांनी जो कर्मयोग आचरला त्या स्थूल कर्मयोगाची मर्यादा येऊन पोचली अशी त्यांची धारणा पन्नास वर्षांच्या कर्माचरणाने होऊन गेली. एवढेच नव्हे तर 'पन्नास वर्षांची स्थूल कर्मरूप सेवा' भगवंताला समर्पण करून त्यातून मी सुटेन असा त्यांचा संकल्प होऊन गेला. त्यांनी हा संकल्प बोलून दाखविला त्यावेळी ते समाजाला सोडून वागणार होते किंवा कर्मत्याग करून निष्क्रियतेचा स्वीकार करणार होते असे मुळीच नव्हते. उलट समाजाला अभिमुख होऊन 'अभिध्यान'योग साधावा ह्यासाठीच त्यांचा सूक्ष्मात प्रवेश करावयाचा प्रयत्न चालू झाला. आपले अस्तित्व, आपले भान, आपला अहम् अणुसमान करीत जायचे, हा त्यांचा उद्योग. त्यांना एकापरीने अणिमा साधावयाची आहे. दैहिक नव्हे तर आत्मिक अणिमासिद्धीचा अधिकार त्यांच्या हाताशी आलेला आहे.

आजपर्यंत आपले चित्त जेवढे शुद्ध, निरहंकार होऊ शकेल तेवढे करावयाचा त्यांनी प्रयत्न केला. आपल्या चित्तांवर अहंकाराची कितीतरी पुटे असतात आणि त्यांनी फुगलेल्या अंतःकरणामुळे कित्येकजण आपणांस विशालचित्त समजत असतात. ही पुटे झड लागली की, चित्त जास्तजास्त निखळ होत शेवटी शुद्ध निरहंकार झाले की, ते होते अणुसमान; पण त्याचवेळी त्यात प्रचंड ऊर्जा प्रगट होण्याची अस्फुट स्थिती निर्माण होते. ऊर्जेचा उत्सर्ग हा परमाणूचा गर्भित धर्म होय. चिच्छक्ती म्हणून जी म्हणतात ती, गलित अहंकार, निर्मळ, अणुसम, सूक्ष्म चित्ताची शक्ती होय. अशा चित्ताच्या प्रेरणेने घडणारी कर्मे स्थूल असू शकणार नाहीत. सूक्ष्मता हाच त्यांचा धर्म होय. हे सूक्ष्म कर्म महाप्रभावी क्रियेचे कारक ठरत असते. पण या सूक्ष्मकर्माचा अधिकार सहजासहजी प्राप्त होत नाही. आपण हतबल होऊन, या अधिकाराची वाटचाल सोडून देत असतो. आपले ध्येय ढळते, ध्यान भंगते, धारणा भ्रष्ट होते. आपला धीर खचतो, धृती पांगुळते. आपल्या चित्ताचे शोधन होत नाही, कारण अहंकाराचे पूर्ण धावन घडत नाही. विनोबाजींनी हे धीराने केले, वीरत्वाने केले, पन्नास वर्षांचा त्यांनी धीर धरला आणि तेवढाच त्यांनी पराक्रम केला. त्यांचा क्रमही पराक्रम आहे. कर्मही पराकर्म राहिलेले आहे आणि जी क्रिया घडली ती पराक्रियाच ठरली आहे.

अशा या तपस्व्याच्या वयाला पाऊणशे वर्षे पूर्ण होऊन हा त्यांचा अमृतमहोत्सव हा आपला अमृतसिद्धियोग होय. चार वर्षांपूर्वी त्यांनी सूक्ष्मात प्रवेश करण्याचा संकल्प बोलून दाखविला. ते सूक्ष्मात प्रवेश करोत, अणूत प्रवेश करोत, परमाणुरूपाने त्यांचा विहार असो की, क्षणाक्षणाने त्यांची कालगणना असो तो त्यांचाच अधिकार आहे. अणुसमान होऊन विश्वात विचरण करावे, आणि दिशांचा पराभव करावा; क्षणरूप होऊन अनंत काळाला त्यांनी पालाण घालावे हा त्यांचा अधिकार आहे. त्यांचे कर्म अगोचर असले तर असो, पण त्यांच्या क्रियेचा साक्षात्कार सार्वत्रिक घडावा, हा त्यांचा अधिकार आहे. एका नव्या अर्थाने ते अणिमा सिद्धीचे अधिकारी योगी आहेत.

भौमर्षि

ग. त्र्यं. माडखोलकर

'भौमर्षि ?'--हो. विनोबांचे वर्णन करावयाला इतका समर्पक शब्द दुसरा सापडणार नाही.

आपल्या प्राचीन वाङ्मयात राजर्षि, देवर्षि, महर्षि, ब्रह्मर्षि इत्यादी ऋषींचे वैशिष्टय दर्शविणारे शब्द वारंवार आढळतात. पण 'भौमर्षि' हा शब्द काही दृष्टीस पडत नाही. मग विनोबांना तो का लावावयाचा ? त्यांना ऋषि म्हणून तर यापूर्वीच अनेक लोकांनी संबोधिलेले आहे. मग आणखी 'भौमर्षि' का म्हणावयाचे ?

कारण त्या शब्दाने त्यांचे अनन्य वैशिष्टय व्यक्त होते. ऋषि हा सर्वसामान्य शब्द आहे. त्याला 'भौम' ही उपाधी लावली, म्हणजे एकदम विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. भौम म्हणजे भूमीचा, भूमिसंबंधी. भूमिहर, भूमिया, भौमिक, भूमिजीवी इत्यादी जातिवाचक आणि वर्गवाचक शब्द शेतकरी, आदिवासी, जमीनदार वगैरे अर्थांनी हिंदी भाषेत रूढ आहेत. स्वतः विनोबा आपल्याला भूमिपुत्र, – भौम समजतात. "माता भूमिः, पुत्रोऽहं पृथिव्याः,",--अशी त्यांची धारणा आहे. अर्थात् 'भौमर्षि' म्हणजे भूमीशी ज्याचे जीवनकार्य निगडित झालेले आहे, भूमीचा ज्याने ध्यास घेतलेला आहे आणि तिच्यासंबंधीच्या प्रश्नात ज्याने आपला जीव ओतलेला आहे, असा ऋषि.

आणि तोही शेतीला 'ब्रह्मकर्म' म्हणणारा ! असा 'भौमर्षि' दहा हजार वर्षांपूर्वी या विदर्भभूमीत होऊन गेला. गणेशोत्सवात घरोघर म्हटल्या जाणाऱ्या "गणानां त्वा गणपतिं हवामहे" या लोकप्रिय मंत्राचा द्रष्टा गृत्समद ऋषि याने, यवतमाळ जिल्ह्यात कळंब या गावी, जमिनीच्या पोटात स्थापन केलेल्या गणपतीची यात्रा अजूनही दर वर्षी भरते. ऋग्वेदाच्या द्वितीय मंडलात त्याची त्रेचाळीस सूक्ते आहेत. त्याचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवूनच जणू विनोबांनी, या विज्ञानयुगात, आपले जीवन घडवलेले दिसते. गृत्समद हा शेतकरी आणि विणकर होता. भारतात कापसाची लागवड त्यानेच प्रथम वऱ्हाडच्या जमिनीत केली; व त्याचे सूत काढून ते विणण्याच्या म्हणजे वस्त्र तयार करण्याच्याही कलेचा शोध लावला. "माऽहं अन्यकृतेन भोज्यम्" - "दुसऱ्याच्या श्रमाने उत्पन्न झालेले मी काहीही भोगणार नाही,"--असा त्याचा बाणा होता. विनोबांचाही हाच बाणा आहे. म्हणूनच त्यांनी शेतीला 'ब्रह्मकर्म' म्हटलेले असावे. आपल्या रत्नागिरी जिल्ह्यातील पदयात्रेत, ता. २४ एप्रिल १९५८ रोजी, हातखंबा येथे भाषण करताना, त्यांनी असे उद्‌गार काढले होते की, "शेती हे साक्षात् ब्रह्मकर्म आहे. अर्थशास्त्री त्याला उत्पादनकार्य असा शब्द योजतात. पण तो गौण शब्द आहे. सर्वोत्तम शब्द ब्रह्मकर्म हाच आहे. ब्रह्मकर्म म्हणजे ब्रह्मदेवाची क्रिया. सृष्टीत जे उत्पादन होते, ते सगळे ब्रह्मकर्म आहे.... आपण एक दाणा पेरला, की हजार दाणे मिळतात. हे जे सृष्टीचे औदार्य आहे, ते अन्यत्र कोठेही नाही. ही कृती मनुष्याची नाही; देवकृती आहे. म्हणूनच त्याला ब्रह्मकर्म म्हणावयाचे." या विनोबांच्या उद्‌गारांत त्यांनी सुरू केलेल्या 'ऋषिशेती'चे बीज आहे. पवनार येथील धाम नदीच्या काठावरला त्यांचा 'परंधाम' हा आश्रम म्हणजे आधुनिक गृत्समदाचा आश्रमच होय. धाम नदीच्या पलिकडे म्हणून जसा तो परंधाम, तसाच परात्पराचा साक्षात्कार घडवणारा म्हणूनही तो परंधाम !

गृत्समदाने, हजारो वर्षांपूर्वी, मानवजातीच्या बाल्यावस्थेत, शेती आणि विणकाम यांची दीक्षा लोकांना दिली. त्या काळात जमीन मुबलक होती.

त्यामुळे, कसेल त्याची जमीन, असाच व्यवहार होता. अर्थात् त्या ऋषींपुढे भूमिहीनांचा प्रश्न नव्हता. पण, या आधुनिक गृत्समदापुढे मात्र भूमिहीनांची समस्या आज दत्त म्हणून उभी ठाकलेली आहे. १९२१ पासून १९५१ पर्यंत विनोबांनी, आपल्या पूर्वायुष्याची तीस वर्षे, ऋषि शेतीचे प्रयोग करण्यात घालवली; व १९५१ पासून १९६४ पर्यंत, आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध, त्यांनी, भूदानाच्या पदयात्रेत, घालवला. अशा रीतीने भूमीशी,--तिच्या संबंधीच्या निरनिराळ्या प्रश्नांशी,-इतका एकरूप झालेला दुसरा कार्यकर्ता महाराष्ट्रात, गेल्या पन्नास वर्षांत तरी, निर्माण झालेला नाही. आपल्या तपःपूत जीवनाचे अर्धशतक ज्याने चिंतनात आणि श्रमनिष्ठेत, भू-सेवेत आणि भू-दानात घालवलेले आहे, त्याचे वर्णन 'भौमर्षि' या शब्दानेच यथार्थ होऊ शकेल. म. गांधी, यांनी १९२२ च्या मार्चमध्ये आपल्यावर झालेल्या राजद्रोहाच्या पहिल्या खटल्यात, स्वतःचा व्यवसाय 'विणकर' हा असल्याचे सांगितलेले होते. तसा विनोबांनी, आपला धंदा 'भूमिहर' म्हणून, आपल्यावरील खटल्यात, सांगितला की नाही, कोण जाणे. पण, तसा तो त्यांनी सांगितला असला, तर ते योग्यच म्हणावे लागेल. या दृष्टीने, त्यांना पांढरपेशे न म्हणता, काळपेशे म्हटले तरी ते देखील शोभून जाईल. नाही तरी, त्यांनी, शेतकऱ्याच्या मळकट धोतराची तरफदारी करताना, असे मार्मिक विधान केलेले आहे की, "त्याचे धोतर जे इतके मळके दिसते, ते ज्या भू-मातेची सेवा तो रात्रंदिवस करीत असतो, तिचा कृपाप्रसाद त्याच्या अंगावर चढल्यामुळे. तो मळ नसतो, ती माती असते शेतातली!"

विनोबांचे, आजच्या विज्ञानयुगातील, हे आर्ष जीवन पाहून लोकांना मोठा आचंबा वाटतो. १९४०च्या जानेवारीतला एक प्रसंग या दृष्टीने देण्यासारखा आहे. पुण्याच्या शेतकी कॉलेजातली बी. एजी.ची पदवी घेतल्यावर अमेरिकेहून कृषिशास्त्राची 'डॉक्टरेट' संपादन करून आलेले माझे पुण्याचे एक मित्र, म. गांधी आणि विनोबा यांचे आश्रम पाहण्यासाठी, मुद्दाम नागपुरास आलेले होते. आम्ही प्रथम सेवाग्रामला गेलो. सकाळी ९ पासून दुपारी ३ पर्यंत तेथील दिनक्रम आम्ही पाहिला. तेथून ४ च्या सुमारास आम्ही पवनारला आलो. मी विनोबांशी माझ्या मित्राची ओळख करून दिली; व आश्रमात चालणारी कामे पाहण्याची इच्छा त्याला असल्याचे सांगितले. आमच्याशी बोलत असताना विनोबांनी आपले हात आम्हाला दाखवले आणि ते म्हणाले, "सध्या मी नुसता पपई आणि दूध यांच्यावर राहाण्याचा प्रयोग करून पाहात आहे. आपल्या जुन्या धार्मिक बायका चातुर्मास्यात एक धान्य खाण्याचं व्रत करतात. तशाच प्रकारचा हा प्रयोग आहे माझा! हा आहार सुरू केल्यापासून माझ्या हाताच्या तळव्यांना कसा गुलाबी रंग आलेला आहे, तो पाहा! आहार माणसाचा रंग, कांती आणि वृत्ती ही तिन्ही बदलतो." तेव्हा, माझ्या मित्राने त्यांना विचारले, "एवढ्याने भूक भागते आपली?" त्यावर त्यांनी हसून उलट त्याला विचारले, "न भागायला काय झालं? असे काय मोठे कष्ट मी करतो की, ज्यामुळे मला जास्त खाण्याची गरज वाटावी? माणसाने गरजेपेक्षा जास्त खाणे म्हणजे इतरांच्या तोंडचा घास काढून घेणे होय!" नंतर आम्ही परंधामच्या आवारात असलेली शेती आणि बागाईत बघावयाला गेलो. विहिरीच्या पाण्यावर ती चालत असे. पण मोट किंवा पंप लावून मात्र नव्हे! आम्हाला या सगळ्या कामांची माहिती देत असलेल्या आश्रमीयाने असे सांगितले की, "इथं सारी कामे आम्हीच करतो. श्रमनिष्ठा हे आमचे एक व्रत आहे. म्हणून, स्वतः विनोबाजी देखील, जमीन खणण्यापासून तो रहाट चालवण्यापर्यंत, सगळी कामे करतात. आम्ही 'ऋषि शेती' म्हणतो याला. इतका उत्कृष्ट भाजीपाला आणि फळफळावळ कुठेही पाहावयाला मिळणार नाही आपल्याला." माझा मित्र यावर काही बोलला नाही. आम्ही आश्रमात परत आल्यावर ताज्या पपईच्या पिवळ्या जर्द रसरशीत फोडी आणि गाईचे दूध आम्हाला देण्यात आले.

आश्रमातून बाहेर पडल्याबरोबर माझ्या डॉक्टर मित्राने सिगारेट शिलगावली. आमची मोटर, धाम नदीवरील पूल ओलांडून, नागपूरच्या रस्त्याला लागल्यावर, मी त्याला विचारले, "काय रे, तुला काय वाटलं विनोबांचे हे प्रयोग पाहून? तू तर काहीच बोलला नाहीस." तेव्हा तो प्रथम घुटमळला, पण लगेच तोंडातली सिगारेट फेकून देऊन मला म्हणाला, "गजानन, मी जर स्पष्ट बोललो, तर तुला आवडणार नाही. तू आणि तुझ्यापेक्षा देखील शांतावहिनी फार चहाते आहात विनोबांचे. तू मोठ्या

भक्तिभावाने सगळं पाहात आणि ऐकत होतास, हे लक्षात आलं माझ्या. तेव्हा तुला कशाला उगाच मी दुखवू माझी मते सांगून ?" त्यावर मी त्याला म्हटले, "तू म्हणतोस ते खरे आहे. पण म्हणून, तुझं मत ऐकून घेण्याची माझी तयारी नाही, असं का समजतोस तू ? सांग सरळ तुला काय वाटलं ते." त्याबरोबर, तो अगदी गंभीर होऊन म्हणाला, "आपल्या जुन्या बायका वर्षातून एकदा ऋषिपंचमीचं व्रत करतात. पण विनोबांनी तर आपल्या सगळ्या आयुष्याचीच मुळी ऋषिपंचमी करून टाकली आहे ! आजच्या जगात शेतीचे आणि राहाणीचे असले प्रयोग कसे परवडतील ? विनोबांच्या पाठीशी गांधीजी आणि जमनालालजी उभे आहेत, म्हणून ठीक आहे. पण आपल्यासारख्यांना हे कसे परवडेल ? एकादे दिवशी येथे येऊन या ऋषि शेतीचं कौतुक करायला हरकत नाही. पण आधुनिक जग आणि ज्ञानविज्ञान यांच्याकडे जाणूनबुजून पाठ फिरवून बसलेल्या विनोबांच्या या दुनियेत आपला कसा निभाव लागेल ? आपल्या दरिद्री भुकेल्या देशाला तर काहीच उपयोग नाही असल्या प्रयोगांचा. तू त्यांचे सगळे बोलणे आणि वागणे कौतुकाने आणि आश्चर्याने पाहात होतास, याचेच खरोखरी आश्चर्य वाटले मला !"

माझ्या डॉक्टर मित्राने मजवर केलेली ही टीका अगदी समर्पक होती. गेली पंचेचाळीस वर्षे मी विनोबांकडे, "आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं", या भावनेने पाहात आलेलो आहे. वस्तुतः म. गांधी यांच्या मानाने त्यांचे आयुष्य अगदीच एकमार्गी आणि म्हणून अळणी आहे. त्या आयुष्यात कोणतेही चमत्कार नाहीत. ता. ७ जून १९१६ रोजी, अहमदावाद येथील कोचरब आश्रमात, गांधीजींची पहिली भेट झाल्यादिवसापासून आजपर्यंत त्यांचे सर्व आयुष्य एकाच चाकोरीतून गेलेले आहे. खुद्द महात्माजींचे जीवनही तसे आर्षच होते. पण ते सारखे काही ना काही तरी चमत्कार करून दाखवीत असत. उलट, विनोबा हे मनानेच केवळ नव्हत, तर शरीराने आणि कृतीनेही कृतयुगातच आहेत. ता. १८ एप्रिल १९५१ रोजी, तेलंगणाच्या दौऱ्यात पोचमपल्ली येथे, यदृच्छेने त्यांच्या हातून सुरू झालेली भूदानाची मोहीम, त्यासाठी तेरा चौदा वर्षे त्यांनी देशभर केलेली पदयात्रा आणि त्या यात्रेत लोकांनी स्वयंस्फूर्तीने त्यांना दिलेले लाखो एकर भूदान हाच काय तो त्यांच्या आयुष्यातला एकमेव चमत्कार ! त्या अद्वितीय चमत्काराने सगळ्या जगाचे लक्ष त्यांनी आपल्याकडे वेधून घतले, ही गोष्टही खरी. तथापि, एरवी त्यांचे जीवन, हे सपाट मैदानातून संथपणाने वहात जाणाऱ्या नदीच्या ओघासारखे, प्रशांत आहे. त्यात धबधबे तर राहोतच, पण पूर किंवा खळखळाट सुद्धा नाही. सगळे कसे अगदी संथ आणि धिमे. तरी देखील, १९२४च्या ऑगस्ट पासून १९७०च्या मार्चपर्यंत, वर्धा, नालवाडी, पवनार, छेडवाल–कोर्डे आणि गोपुरी येथे ज्या ज्या वेळी मी त्यांना भेटलो, त्या त्या वेळी "आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं" अशीच माझ्या मनाची अवस्था होत गेली.

१९२४ च्या ऑगस्टमध्ये, 'महाराष्ट्र' साप्ताहिकाच्या संपादकमंडळावर रुजू होण्यासाठी, मुंबईहून नागपूरला येत असता, मी वाटेत वर्धा येथे माझे स्नेही प्रो. नारायण केशव वेहेरे यांच्याकडे उतरलो होतो. ते त्या वेळी तेथील नॉर्मल स्कूलचे सुपरिटेंडंट होते. दुसऱ्याच दिवशी सकाळी ते मला म्हणाले, "गजाननराव, आज आपण विनोबांकडे जाऊ या." मला ते ऐकून आनंद झाला. १९२३ साली, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या पुणे येथील निवासात राहात असताना, विनोबांनी काढलेल्या 'महाराष्ट्र धर्म' या मासिकाचे अंक मी नेमाने वाचीत असे. त्यात येणाऱ्या त्यांच्या लेखांच्या अग्रोक्तियुक्त (Epigramatic) भाषाशैलीने मला मोहित केलेले होते. त्यामुळे त्यांना भेटावयाला मी उत्सुक होतो. आम्ही सकाळी ९ च्या सुमारास सत्याग्रहाश्रमात गेलो. विनोबा माडीवरील प्रशस्त हॉलमध्ये बसलेले होते. सूत्रयज्ञ चालू होता. आम्ही त्यांच्या समोर जाऊन बसलो; व त्यांना नमस्कार केला. प्रो. वेहेरे यांनी त्यांना माझी माहिती दिली. ते चरखा न थांबवताच उद्गारले, "आपली दोन्ही पुस्तके मी वाचली आहेत. ओगल्यांनी चांगली निवड केली." मी साश्चर्य जिज्ञासेने त्यांच्याकडे पाहात होतो. पुण्यास असताना, १९२१ पासून १९२३ पर्यंत, श्री. शंकरराव देव, आचार्य भागवत प्रभृती अनेक गांधीवादी कार्यकर्ते मी बघितलेले होते. पण विनोबा मला त्यांच्याहून अगदी निराळे वाटले. मुद्रा गंभीर आणि तशी थोडी त्रासिकच. समोरच्या किंवा भोवतालच्या माणसांपेक्षा आणि पुढे असलेल्या चरख्यापेक्षासुद्धा त्यांचे चित्त काही वेगळ्याच विचारात व्यग्र

झालेले असावे, असे वाटले. कारण, डोळे शून्य जरी नव्हत, तरी अंतर्लीन होते. आम्ही स्तब्ध होतो. नंतर त्यांनी मजकडे न्याहाळून पाहात विचारले. "आपले खादीकडे लक्ष नाही?" माझे कपडे स्वदेशी पण गिरण कापडाचे होते. मी अगदी सहजगत्या बोलून गेलो, "मी स्वदेशीचा भक्त आहे. पण खादीची उपयुक्तता काही मला पटत नाही." तत्क्षणी त्यांचा चेहरा किंचित उग्र झाला आणि त्यांनी विचारले, "का वरं? गरिबाला रोज दीड दोन आणे मिळवून देणारी खादी आपल्याला का उपयुक्त वाटू नये?" मी यावर प्रतिप्रश्न केला, "रोज दीड दोन आणे मिळाल्याने कोणाच्या पोटाचा प्रश्न या दिवसात सुटेल?" तेव्हा ते उद्गारले, "नवरा बायकोना जर खादीने चार आणे रोज मिळवून दिले, तर त्यांच्या पोटापाण्याची फिकीर थोडी तरी कमी होईल की नाही? आज आपल्या देशात येवढे झाले तरी पुष्कळ आहे." या त्यांच्या उद्गारांवर मीं काही बोललो नाही.

या पहिल्या भेटीच्या वेळीच नव्हे, तर तेव्हापासून पुढे अनेक वेळा झालेल्या भेटीत मी विनोबांशी कधीच प्रतिवाद केला नाही. १९५८ च्या ऑगस्टच्या शेवटल्या आठवड्यात, त्यांची पदयात्रा पश्चिम खानदेशात चालू असता, श्री. दामोदरदासजी मुंधडा यांच्याकडून निरोप आल्यामुळे, श्री. ए. श्री. पटवर्धन आणि मी त्यांना भेटावयाला मुद्दाम शेजवाळ–कोर्डे येथे गेलो होतो. व्याख्यानानंतर सायंकाळी त्यांनी आम्हाला बोलावले. सुमारे पाऊण तास आम्ही त्यांच्या सहवासात होतो. भूदानाच्या चळवळीला 'तरुण भारत'कडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आणि नंतर ते म्हणाले, "आपण या कामात अधिक लक्ष घालावयाला हवे. साहित्यिक मंडळी यात रस घेत नाहीत, असा माझा समज आहे. बरोबर आहे ना?" "हो. टिळक आणि गांधी यांच्या चळवळींना ज्या मानाने साहित्यिकांचा पाठिंबा मिळाला, त्या मानाने भूदानाला मिळत नाही, हे आपले म्हणणे बरोबर आहे," मी उत्तर दिले. तेव्हा त्यांनी प्रश्न केला, "तो कसा मिळेल?" मी सांगितले, "साहित्यिकांना या चळवळीविषयी आकर्षण नाही. तीत काही विशेष आहे, असे त्यांना वाटत नाही."— "असे कसे म्हणता? माझ्यासारखा साठी उलटलेला माणूस पायी प्रचार करीत हिंडतो, यात काही विशेष नाही का?" त्यांनी मला विचारले, "विशेष आहे. पण तेवढे पुरेसे नाही. मुख्य अडचण ही आहे की, भूदान हा काही साहित्यिकांना आपला विषय वाटत नाही. टिळक आणि गांधी हे स्वातंत्र्यासाठी झगडले. तो विषय त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा होता. म्हणून त्यात त्यांनी इतक्या उत्साहाने जीव घातला. तसे या चळवळीचे नाही", मी खुलासा केला. त्यावर ते हसले आणि म्हणाले, "समजलो. पण, साहित्यिक या चळवळीत रस घेतील, असा प्रयत्न आपण करावा." मी यावर काही बोललो नाही. म्हणून त्यांनी माझ्याकडे पाहिले. तेव्हा मी म्हटले, "मी प्रयत्न करीन. पण ते सोपे नाही. एक गोष्ट जर मी स्पष्ट बोललो, तर आपण राग मानू नये."–"कोणती गोष्ट?" त्यांनी विचारले. मी म्हटले, "सध्या साहित्यिकांचे सगळे लक्ष संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीकडे आहे. तो प्रश्न त्यांना अत्यंत जिव्हाळ्याचा आणि निकडीचा वाटतो. आणि आपण तर त्यासंबंधी काहीच बोलत नाही."
–"म्हणून ते नाराज आहेत माझ्यावर आणि भूदानाच्या कार्यावर?" त्यांनी मधेच प्रश्न केला. "हो. तसे समजायला काही हरकत नाही. आपल्यावर जी टीका वर्तमानपत्रातून येते, ती आपणास कळतच असेल. मी देखील आपल्याविरुद्ध लिहिले आहे," मी साहित्यिकांची बाजू मांडली. त्यावर ते उद्गारले, "ते माहित आहे मला. पण महाराष्ट्र एकीकरणाच्या प्रश्नाविषयी ज्या वेळी कोणी बोलत नव्हते, त्या वेळी मी आमच्या 'महाराष्ट्र धर्म'तून त्यासंबंधी लिहिले होते. आपल्या लक्षात असेल?"––"हो. पण त्याला फार वर्षे झाली. आज हा प्रश्न निकराला आलेला आहे आणि तरी आपण त्याविषयी काहीही बोलत नाही. त्यामुळे आपल्याबद्दल गैरसमज आहे." मी उत्तर दिले. तेव्हा ते म्हणाले, "त्याचा अनुभव कोल्हापूर आणि चाळीसगाव येथे मला आला. प्रत्येक माणसाने प्रत्येक प्रश्नावर बोललेच पाहिजे, असा आग्रह का? मी एकदा महाराष्ट्र एकीकरणाच्या बाबतीत माझे मत स्पष्टपणाने दिलेले आहे. आता मी हे अधिक व्यापक काम हातात घेतले आहे. त्यालाच तर माझी शक्ती पुरी पडत नाही. अशा स्थितीत मी संयुक्त महाराष्ट्रावर बोलावे, असा आग्रह का? आज ज्या पद्धतीने त्याचा प्रचार होत आहे, ती पद्धत देशहिताला पोषक नाही. देश पार_

तंत्रात असताना ज्या पद्धतीने आपण चळवळी केल्या, त्या पद्धतीने आता करणे बरोबर नाही. त्यामुळे, प्रश्न सुटत नाहीत; उलट तेढ आणि कटुता मात्र वाढते." मी यावर काही बोललो नाही. श्री. दामोदरदासजींनी घड्याळाकडे पाहिले. आम्ही उठलो आणि त्यांना अभिवादन केले. त्यांनी विचारले, "आजच जाणार का?" मी म्हटले "हो. साहित्यिकांनी भूदानाकडे लक्ष द्यावे, यासाठी मी जरूर प्रयत्न करीन." तदनुसार, विनोबा जेव्हा आपली पदयात्रा संपवून, १९६४ च्या मार्चमध्ये, नागपूरला परत आले, तेव्हा विदर्भ*साहित्य संघाने ता. २९ रोजी सकाळी साहित्यिकांसाठी त्यांचा खास कार्यक्रम ठेवला होता. त्या वेळी 'साहित्याचे स्वरूप आणि सामर्थ्य' या विषयावर त्यांचे सुंदर भाषण झाले.

असाच अगदी अलिकडला एक ताजा प्रसंगही सांगण्यासारखा आहे. गेल्या मार्चच्या पहिल्या आठवड्यात, दासनवमीच्या दुसऱ्या दिवशी ता. २ रोजी दुपारी १२ च्या सुमारास, मी त्यांना आगाऊ निरोप पाठवून गोपुरीत भेटावयाला गेलो होतो. त्या वेळी श्री. जानकीबाई बजाज, श्री. बावाजी मोघे, श्री. टेंभेकर प्रभृति मंडळी बसलेली होती. ते त्यांच्याकडे पाठ फिरवून खाटेवर निजलेले होते. मी आल्याचे सांगण्यात आल्यावर ते उठून बसले. मी चरणस्पर्श करून येवढेच म्हणालो, "आपण अलिकडे बोलणे सोडून दिलेले आहे, हे मला माहित आहे. मी काहीही बोलणार नाही. फक्त आपल्याला वंदन करावयाला आलो आहे." तेव्हा ते हसून मला म्हणाले, "मी आपलं बडोद्याचं भाषण वाचलं. आपण ज्ञानदेवांनासुद्धा संकुचित ठरवलंय." गेल्या डिसेंबरमध्ये, बडोदे येथील वाङ्मय परिषदेच्या तेहतिसाव्या अधिवेशनाचा अध्यक्ष या नात्याने, मी जे भाषण केले, त्यावर त्यांचा हा अभिप्राय होता. मी मुकाट्याने तो ऐकून घेतला आणि विषय बदलण्याच्या उद्देशाने विचारले, "इतके रखरखीत ऊन बाहेर पडलेले असताना आपण ओवरीत का निजता? आत का निजत नाही?" तेव्हा, त्यांनी हसून मला विचारले, "आपल्या देशाचे हवामान आपल्याला का सोसू नये? ते तर जन्मापासूनच आपल्या अंगवळणी पडलेले असते. मला ओवरीत निजल्याने काहीच त्रास होत नाही. ऊन फार कडक आहे असे वाटले, तर डोळ्यांना झळ सोसत नसल्यामुळे, मी पाठ फिरवून निजतो, येवढेच." त्यानंतर लगेच ते पुन्हा माझ्या भाषणाला अनुलक्षून म्हणाले, "संत आणि कवी यांनी राष्ट्र आणि परिस्थिती यांच्याकडे लक्ष दिले नाही, याबद्दल त्यांना आपण दोष का द्यावा? ते दिक्कालांच्या पलिकडे गेलेले असतात, म्हणून तर संत आणि कवी होतात. आपले दंडक त्यांना का लावावेत? ज्ञानदेव विश्वात्मक नसतील, तर मग विश्वात्मक आहे तरी कोण?" मी काहीच बोललो नाही. त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून मुकाट्याने निरोप घेतला.

मला विनोबांच्या या अभिप्रायाचे नवल वाटले नाही. कारण, ज्ञानेश्वरमहाराजांवर त्यांची किती विलक्षण भक्ती आहे, याची मला जाणीव होती. आपल्या जीवनावर शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, टिळक आणि गांधी यांचा परिणाम झालेला असल्याचे जरी त्यांनी वारंवार बोलून दाखवले असले, तरी सगळ्यात जास्त परिणाम ज्ञानेश्वर आणि गांधी यांचाच त्यांच्यावर झालेला आहे, हे मात्र निश्चित. किंबहुना गांधींपेक्षाही जास्त ज्ञानेश्वरांचा! आपल्याला झालेल्या 'महापुरुषसंश्रया'बद्दल, नेवासे येथे ता. २८ जुलै १९५८ रोजी भाषण करताना, त्यांनी असे उद्‌गार सद्‌गदित होऊन काढले होते की, "जे काही जीवनामध्ये करण्यासारखे मला सुचले, त्या कामी अधिकात अधिक मदत मला, शास्त्रग्रंथ जर सोडून दिले, तर शंकर, ज्ञानदेव आणि गांधी या तिघांकडून मिळाली आहे....तुलनेने काही निष्पन्न होणार नाही. परंतु, ज्ञानदेवांचा माझ्यावर जो उपकार झाला आहे, तो वर्णन करावयाला माझ्याजवळ शब्दच नाहीत. तो चिंतनावर आहे, हृदयावर आहे आणि माझ्या कार्यपद्धतीवर आहे. इतकेच काय, पण मी असेही मानतो की, माझ्या शरीरावरही आहे. इतका त्यांचा सर्व बाजूंनी परिणाम माझ्या जीवनावर आहे......मी मूळचा फार कठोर मनुष्य आहे. माझ्या जीवनाला आणि हृदयाला कोणी गोडी आणली असेल आणि या पाषाणातून जर कोणी पाणी काढले असेल, त्याला पाझर फोडला असेल, तर तो ज्ञानदेव महाराजांनी फोडला. या पाषाणाला शंकराचार्यांनी पाझर फोडला नाही. त्यांनी या पाषाणाला मजबूत केले. या पाषाणाला गांधीजींनी पाझर फोडला नाही. त्यांनी याच्यावर कारागिरी केली. पण याच्यातून पाणी काढण्याचा

पराक्रम मात्र ज्ञानदेवांनीच केला.........मी जी दोन अक्षरे लिहिली, त्याचे सर्व श्रेय केवळ त्यांनाच आहे. भाव त्यांनी मला दिले, भाषा त्यांनी मला दिली आणि जीवनप्रेरणा त्यांनी मला दिली." इतकी ज्या ज्ञानेश्वरमहाराजांवर विनोबांची अनन्य श्रद्धा आहे, त्यांना मी त्यांच्यावर केलेली थोडीसुद्धा टीका रुचू नये, हे अगदी स्वाभाविक होय.

तथापि, ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी ही दोन्ही विनोबांना जी इतकी प्रिय आहेत, त्याचे कारण, मला वाटते, त्यांची गीतेवरील असीम, अलौकिक भक्ती हेच असावे. १९३२ च्या फेब्रुवारीत, धुळयाच्या तुरुंगात असताना, गीतेवर जी प्रवचने त्यांनी केली, त्यांचा प्रारंभ करताना त्यांनी असे उद्‌गार काढले होते की, "गीतेचा व माझा संबंध तर्कापलीकडचा आहे. माझे शरीर आईच्या दुधावर पोसले, त्यापेक्षाही माझे हृदय व बुद्धी यांचे गीतेच्या दुधावर अधिक पोषण झाले आहे......मी प्रायः गीतेच्याच वातावरणात असतो. गीता म्हणजे माझे प्राणतत्त्व...... मी गीतेविषयी इतरांशी कधी बोलतो, तेव्हा गीतेच्या समुद्रावर तरंगत असतो आणि एकटा असतो त्या वेळेस त्या अमृतसमुद्रात खोल बुडी मारून बसतो." ही आपली गीतेविषयीची उत्कट भावना त्यांनी, 'गीताई'तील—

गीताई माउली माझी, तिचा मी बाळ नेणता,
पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी

या अत्यंत हृदयंगम श्लोकातही, व्यक्त केलेली आहे. किंबहुना आपली आई, ज्ञानेश्वरी आणि गीता या त्यांनी एकरूपच मानलेल्या आहेत. आईमुळे आणि आई-साठीच खरोखरी गीता त्यांनी जशीच्या तशी मराठीत आणली. 'गीताई' पहावयाला त्या हयात राहिल्या नाहीत, हें दुर्दैव ! त्या माउलीला संस्कृतचा गंधही नव्हता. पण, तिला असे फार वाटे की, गीता आपण वाचावी आणि ती आपल्याला समजावी. त्या विनोबांना वारंवार विचारीत, "विन्या, मराठीत गीता नाही का रे?" तो आईचा प्रश्न विनोबांच्या हृदयात खोल जाऊन बसला. म्हणून, वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी, 'ज्ञानेश्वरी'च्या गद्य अनुवादावरून, स्वतः 'गीते'ची ओळख करून घेतली; व आपल्या आईलाही तिची ओळख करून दिली. तेव्हापासून, 'ज्ञानेश्वरी' म्हणजेच गीता किंबहुना 'ज्ञानेश्वरी' हाच महाराष्ट्राचा धर्मग्रंथ, अशी त्यांची तिच्याविषयी भावना होऊन गेली. असा हा त्यांची आई, ज्ञानेश्वरी आणि गीता यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा अन्योन्यसंबंध आहे.

विनोबांच्या मातोश्री रुक्मिणीबाई या अतिशय भाविक आणि धर्मशील होत्या. त्या माउलीच्या सदैव चालणाऱ्या व्रतवैकल्यांनी त्यांना आजन्म ब्रह्मचारी आणि व्रतस्थ बनवले. कुलाबा जिल्ह्यात गागोदे येथे, ता. ११ सप्टेंबर १८९५ रोजी, त्यांचा जन्म झाला. त्यांचे बाळपण अंशतः कोकणात आईच्या सान्निध्यात आणि अंशतः घाटावर कृष्णाकाठी वाईसारख्या तीर्थ-क्षेत्री राहाणाऱ्या आजोबांच्या छत्राखाली गेले. पण विनोबांना घडवले मात्र त्यांच्या आईनेच. गागोदे आणि वाई येथे असताना, त्यांनी, आपल्या आईबरोबर, 'चांद्रायणा'सारखी कडक व्रतेदेखील त्या बालवयात केली. रुक्मिणीबाई नावालाच साक्षर होत्या. कारण, ब्राह्मणांच्या बायकांना, कोकणात त्या काळी, वेदाक्षर ऐकण्याचीच काय, पण धुळाक्षर शिकण्याचीही बंदी होती. श्रावणीच्या, गणेशोत्सवाच्या किंवा नवरात्राच्या निमित्ताने घरात वेदघोष सुरू झाला, म्हणजे बायकांना त्या ठिकाणी येण्याची मनाई असे. गृहस्थांच्या घरी इतके नसे. पण, वैदिकांच्या आणि याज्ञिकांच्या घरी मात्र, स्त्रियांच्या कानांवर वेदाक्षर पडू नये, म्हणून कडक बंदोबस्त असावयाचा ! तथापि, वेदाधिकार नसलेल्या आणि विद्येच्या सर्वसामान्य संस्कारांनाही अशा रीतीने मुकलेल्या या ब्राह्मण बायका, आपल्या वेदशास्त्रसंपन्न कर्मठ पतींपेक्षादेखील, अधिक धर्मपरायण असत. कारण शास्त्रज्ञान आणि कर्मकांड यांच्यामुळे येणारा कठोर-पणा आणि दंभ त्यांच्या ठिकाणी अजिबात नसे. त्यामुळे विनोबांना धर्माचरणाचे भूतदयेने ओथंबलेले वळण त्यांच्या आईने बाळपणी लावले. स्त्रियांना सुनमुख पाहण्याची मोठी हौस असते. पण, विनोबांची आई जणु मदालसाच होती. ती त्यांना म्हणावयाची, "विन्या, उत्तम गृहस्थाश्रम केला, तर पितृऋण फिटते. पण, उत्तम ब्रह्मचर्य साधले, तर चाळीस पिढयांचा उद्धार होतो." रुक्मिणीबाईंच्या या शिकवणुकीचा त्यांच्या तिन्ही मुलांवर असा काही परिणाम झाला की, विनोबांनी तर वयाच्या दहाव्या वर्षी ब्रह्मचर्याची शपथ घेतलीच; पण बाळकोबा आणि शिवाजी या त्यांच्या दोघा धाकटया बंधूंनीही, त्यांच्या-

प्रमाणेच ब्रह्मचारी राहून, देशसेवेत सर्व आयुष्य घालवले.

विनोबांचे वडील नरहरराव यांची वृत्ती रुक्मिणीबाईंहून सर्वच बाबतीत अगदी भिन्न होती. ते टेक्सटाईल एक्स्पर्ट होते; व मुंबई, कानपूर वगैरे शहरी, रंगकामाचे जाणकार म्हणून, कापड गिरण्यांत नोकरी केल्यावर, ते शेवटी बडोदे येथे स्थायिक झाले. तेथे ते बहुधा एकटेच राहात असत. आपल्या पत्नीचा देवभोळेपणा आणि उपासतापास यांची ते नेहमी थट्टा करावयाचे. म्हणून, विनोबांनी पुढे असे उद्गार काढलेले आहेत की, "जुन्या बायकांच्या धार्मिक वृत्तीचा उपहास करणे योग्य नाही. त्यांच्या धार्मिकतेचा कुटुंबातील मुलाबाळांच्या जीवनावर फार चांगला परिणाम होतो." त्यांचे स्वतःचे बाळपण जर, आई आणि आजोबा यांच्या ऐवजी, वडिलांच्या सहवासात गेले असते, तर ते विनोबा न होता विनायकराव आणि मंत्रद्रष्टे न होता तंत्रज्ञ झाले असते. किंबहुना, नरहररावांनी, आपला हा हुशार मुलगा वयाच्या अकराव्या वर्षी इंग्रजी शिकण्यासाठी बडोद्यास आल्यावर, त्याला सेकंड लँग्वेज म्हणून संस्कृतच्या ऐवजी फ्रेंच भाषा घेणे जे भाग पाडले, ते केवळ तो संशोधक आणि वैज्ञानिक व्हावा, या आकांक्षेने! रुक्मिणीबाईंना ही गोष्ट आवडली नाही. म्हणून त्या माउलीने आपल्या मुलाला विचारले, "विन्या, संस्कृत ही आपल्या धर्माची भाषा. ती नको का यायला तुला?" तेव्हा त्यांनी त्यांचे असे समाधान केले की, "अग आई, प्रत्येक गोष्ट काय शाळेतच जाऊन शिकायला हवी का? संस्कृत यायला हवं असेल, तर ते मला घरी शिकता येईल. तू काळजी करू नकोस." त्याप्रमाणे ते स्वतःच्या प्रयत्नाने संस्कृत शिकले. मोरोपंतांच्या कवितेने त्यांचा संस्कृत भाषेत प्रवेश करून दिला. पन्हाळा ही त्या पंडित-कवीची जन्मभूमी. १९५८ च्या मेमध्ये भू-दान यात्रेत विनोबा तेथे गेले असता, मोरोपंतांच्या 'रामनाम आर्या' या पुस्तकाचे प्रकाशन करताना, त्यांनी असे उद्गार काढले की, "मोरोपंतांचे गुण अनेक आहेत. परंतु संस्कृत-भाषा-प्रवेश हा मी त्यांचा फार मोठा उपकार मानतो. त्यानंतर मी खोल अध्ययन संस्कृतचे केले... मला मराठी चांगले येत असले, तरी पण माझे गंभीर चिंतन संस्कृतमध्येच होते. वेदांपासून आधुनिक काळापर्यंत सर्व साहित्याचे अध्ययन मी केले. आणि संस्कृतातच मी अधिक रमलो." वयाच्या तेराव्या वर्षी ज्ञानेश्वरीला 'वाट पुसत' जरी त्यांनी गीतेत प्रवेश करून घेतलेला होता, तरी टिळकांचे 'गीतारहस्य' प्रसिद्ध झाल्यावर, ते आपल्याला नीट समजावे, या हेतूने त्यांनी संस्कृत शिकावयाला प्रारंभ केला; व ऐन तारुण्यात वैदिक वाङ्मयाचे आलोडन केले. आईची शिकवण आणि गीतेचा व्यासंग यांच्यामुळे त्यांचे मन कॉलेजच्या शिक्षणात रमेना. शेवटी, ता. २५ मार्च १९१६ रोजी, इंटरमीजिएटच्या परीक्षेसाठी, आपल्या वर्गबंधुंबरोबर, बडोद्याहून मुंबईला जात असता, ते वाटेत सुरत स्टेशनवर उतरले. त्यांच्या मित्रांनी विचारले, "तू पुढे काय करणार आहेस?" तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "अथाऽतो ब्रह्मजिज्ञासा!" आणि ते भुसावळला गाडी बदलून सरळ काशीला गेले. काशीवासाने जशी त्यांची ब्रह्मजिज्ञासा पूर्ण केली, तसाच महात्माजींच्या विभूतिमत्वाचा साक्षात्कारही त्यांना घडवला.

विनोबा गीतेला जरी आपली 'माउली' म्हणत असले, तरी वैदिक वाङ्मयाच्या अध्ययनाचाही त्यांच्यावर गीतेइतकाच गाढ परिणाम झालेला आहे. किंबहुना, ज्ञानेश्वरांप्रमाणे, "नाही श्रुतिपरौती। माउली जगा," अशीच त्यांचीही वेदांविषयी भावना असावी. कारण, कोणत्याही विषयावर बोलताना, ते गीतेपेक्षा वैदिक वचनांचाच आधार पावलोपावली जास्त देतात; व नवीन परिस्थितीच्या आणि संदर्भांच्या अनुषंगाने नवे नवे ध्वन्यर्थही त्यातून काढून दाखवीत असतात. टिळकांनी, 'गीतारहस्या'च्या शेवटी, समाप्तीच्या मराठी श्लोकात, स्वतःचे वर्णन 'श्रुतिरत' या शब्दाने केलेले आहे. पण, टिळक आणि विनोबा हे दोघेही जरी, ज्ञानेश्वरांप्रमाणे, 'श्रुतिरत' आणि 'गीतामय' असले, तरी त्यांची श्रुतीकडे पाहाण्याची काय किंवा गीतेकडे पाहाण्याची काय दृष्टी मात्र ज्ञानेश्वरांहून अगदी भिन्न असल्याचे प्रत्ययाला येते. टिळकांनी आपल्या वैदिक धर्माच्या व्याख्येत 'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हे त्याचे पहिले लक्षण दिलेले आहे. पण, वेदप्रामाण्यादि यांच्या त्यांच्या स्वतःच्या कल्पना मात्र, रूढ सनातनी कल्पनांहून, अगदी वेगळ्या होत्या. वेदांचे अनादित्व आणि अपौरुषेयत्व या सनातनी वैदिकांनी शिरोधार्य मानलेल्या दोन परम श्रद्धेय तत्त्वांचा पद्धतशीर उच्छेद जर कोणत्या एका 'श्रुतिरता'ने केलेला असेल, तर तो

टिळकांनी ! वेदांचा काळ ठरवताना किंवा खाल्डियन वेद आणि अवेस्ता यांच्याशी असलेले त्यांचे कल्पनासाम्य आणि शब्दसाम्य दाखवताना, आपल्या या संशोधनाने, वेदांविषयीच्या परंपरागत श्रद्धेला धक्का बसेल किंवा प्रामाण्यबुद्धीला बाध येईल, याचे त्यांना अजिबात भान नव्हते. 'गीतारहस्यां'त त्यांनी उपनिषदे आणि गीता यांच्या मानाने वैदिक वचनांचा आधार फारसा कुठेच घेतलेला नाही. कारण, "त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन," असा उपदेश अर्जुनाला करणाऱ्या भगवद्वाणीवर जशी त्यांची निष्ठा होती, तशी ती वेदांवर नव्हती, हे उघड आहे. ते श्रुतिरत असले, तरी श्रुतिनिष्ठ नव्हते. त्यांच्या मानाने विनोबा हे, ज्ञानेश्वरांप्रमाणेच, श्रुतिनिष्ठ होते. ज्ञानेश्वरांनी वेदांचे त्रैगुण्यत्व आणि कार्पण्य यांच्यावर टीका केलेली असली, तरी वैदिक परंपरेची चाकोरी कुठेही सोडलेली नाही. उलट, टिळक हे, वेद आणि गीता या दोहोंच्याही बाबतीत, सर्वथैव असांप्रदायिक,– सर्वतंत्रस्वतंत्र होते. पण त्यांच्या या स्वतंत्रप्रज्ञतेबद्दल आश्चर्य वाटत नाही. कारण ते जात्याच रॅडिकल म्हणजे सर्वच बाबतीत मूलगामी, मूलग्राही आणि जरूर तेव्हा मूलाघातीही होते.

मला आश्चर्य वाटते, ते खरोखरी विनोबांचे ! ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी ही दोन्ही, वारकरी पंथाप्रमाणे, त्यांचीही माउली आहेत. श्रुतीही पुन्हा माउलीच. त्याचप्रमाणे म. गांधी हे सुद्धा माउलीच. इतके कीं, आपल्या आईचे जुने धडोते जसे ते निजताना उशाला घेत, तसेच गांधींनी दिलेले वस्त्रही ! त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे ते बोलतात आणि लिहितातही ज्ञानेश्वरांच्या भाषेत. "साच आणि मवाळ । मित आणि रसाळ," अशीच त्यांचीही वाणी आहे. टिळकांची कठोरता आणि प्रखरता त्यांच्या वाणीत आणि लेखणीत सहसा आढळत नाही. ज्या तुकाराममहाराजांवर त्यांची नितांत भक्ती आहे, त्यांनी समाजालाच काय, पण देवालाही दुःशब्दांनी ताडन केल्याबद्दल विनोबांनी त्यांना दोष दिलेला आहे. १९५८ साली, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन जोरात असताना, प्रथम कोल्हापूर येथे मेमध्ये आणि नंतर चाळीसगाव येथे ऑगस्टमध्ये, त्यांच्या पदयात्रेत जेव्हा निदर्शकांनी गडबड केली, तेव्हा त्यांची कानउघाडणी करण्यासाठी जे चार कठोर शब्द ते बोलले असतील, तेवढाच काय तो अपवाद !

तरी देखील टिळकांप्रमाणे विनोबाही सांप्रदायिक नाहीत. खानदेशातील पदयात्रेत, नवपूर येथे, ता. १९ सप्टेंबर १९५८ रोजी केलेल्या भाषणात, अणुयुगाचा महिमा वर्णन करताना, त्यांनी असे स्पष्टच सांगून टाकले की, "कार्ल मार्क्स जर आज असता आणि त्याच्यासमोर अणुशक्तीचे दर्शन असते, तर मला लेशही शंका नाही की, त्या ऋषीचा सबंध ग्रंथ पालटला असता. त्याला जर अणुशक्तीचे दर्शन असते, तर जीवनाचे आणि जीवनातल्या समस्यांचे वेगळे आकलन त्याला झाले असते .....मनु जर आज असता, तर त्याला आपली मनुस्मृती बाजूला सारून, दुसरीच मनुस्मृती लिहावी लागली असती. जुने सबंध शास्त्र चुकलेले आहे, हे त्याच्या लक्षात आले असते. त्या काळी विज्ञानाचे दर्शनच नव्हते. . . . तेव्हा आज मार्क्स टिकू शकत नाही, मनु टिकू शिकत नाही. आणि मला अत्यंत नम्रपणाने हे सांगायचे आहे की, गांधी देखील जसाच्या तसा आज चालायचा नाही. या दहा वर्षांत विश्वसमाजाचा पार कायापालट झाला आहे." आपल्या भोवतालच्या विलक्षण वेगाने बदलत असलेल्या परिस्थितीचे इतके तीव्र अवधान आणि आकलन असलेल्या विनोबांनी, "शेती हे ब्रह्मकर्मच आहे," असे म्हणावे किंवा "अग्नीवर 'अग्निमीळे पुरोहितं' यासारखी सूक्ते ऋग्वेदात आहेत, तशी अणुशक्तीवर नवीन सूक्ते लिहावी लागतील आणि त्यांचा आद्यप्रणेता कदाचित् ज्ञानेश्वरच ठरेल," असे विधान करावे, यात यत्किंचितही नवल नाही. विज्ञान, आत्मज्ञान आणि शब्दज्ञान म्हणजे साहित्य या त्यांनी जगाच्या जीवनाला आकार देणाऱ्या तीन महान् शक्ती मानलेल्या आहेत. पण त्यात विज्ञान पहिले ! पंचा नेसलेल्या, दाढी वाढवलेल्या आणि आणि उन्हापावसात सर्व देशभर इतक्या उतारवयात पायपीट करीत असलेल्या विनोबांच्या त्या बाह्य आर्ष आवरणाखाली इतकी मौलिक आधुनिकता दडलेली आहे, हे त्यांच्या दर्शनार्थ येणाऱ्या जिज्ञासूंच्या स्वप्नातही कधी येत नसेल. माझा डॉक्टर मित्र, त्या 'भौमर्षी'चो पवनारच्या आश्रमातील 'ऋषि शेती' पाहून, जो इतका बिचकला, तो याच कारणामुळे !

म्हणूनच, मला असे म्हणावेसे वाटते की, विनोबांची ज्ञानेश्वर आणि गांधी यांच्यावर कितीही भक्ती असली, तरी ते 'समानधर्मा' मात्र टिळकांचेच

अनुक्रमणिका

आहेत. 'गीतारहस्या'च्या प्रस्तावनेत लोकमान्यांनी असे म्हटले आहे की, "त्रिकालाबाधित ज्ञान सांगणाऱ्या गीतेसारख्या ग्रंथाने कालभेदानुरूप नवे नवे स्फुरण मनुष्याला प्राप्त व्हावे, यात काही नवल नाही. कारण अशा व्यापक ग्रंथांचा हा धर्मच असतो..... अद्यापही हा ग्रंथ (गीतारहस्य) सर्वांशीं पूर्ण झाला, असे म्हणता येत नाही. तथापि, आपल्याला उपलब्ध झालेली माहिती व सुचत आलेले विचार आपण लोकांस कळवावेत, कोणी तरी 'समानधर्मा' सध्या अगर पुढे निघून ते पुरे करील, अशा समजुतीने हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे." टिळकांचे ते अपुरे राहिलेले कार्य काही प्रमाणात पुरे करणारे 'समानधर्मा' विनोबाजी हे आहेत, असे म्हणावयाला मला शंका वाटत नाही. कारण, लोकमान्यांनी गीतेतील जो विचार, पंचावन वर्षांपूर्वी, आधुनिक नीतिशास्त्र आणि लोकशाही यांच्यापर्यंत आणून भिडवलेला होता, तो त्यांनी, अणुयुग आणि साम्यवाद यांच्यापर्यंत आणून, साम्ययोगाचे अभिनव दर्शन लोकांपुढे ठेवले. १९५५ साली, ओरिसातील कोरापुट जिल्ह्यातल्या घनदाट जंगलातून भूदानयात्रा करीत असता, या दर्शनाला बीजभूत असलेली 'साम्यसूत्रे' त्यांना स्फुरली. त्यांचा हा 'साम्ययोग' हे टिळकांच्या 'कर्मयोगशास्त्रा'नंतर, त्यांना गीतेच्या चिंतनाने, "कालभेदानुरूप झालेले नवे स्फुरण" होय लोकमान्यांनी लोकसंग्रहार्थ निष्काम बुद्धीने सर्व कर्मे करण्याचे तत्त्व, आपल्या स्वतःच्या आचरणाने, लोकांच्या मनावर बिंबवले. निष्काम कर्मयोग आणि लोकशाही यांच्या अवलंबनाने मानवी जीवनाचे सर्व प्रश्न सुटतील, अशी त्यांची त्या वेळी धारणा असावी. त्यापलिकडे ते गेले नाहीत. 'गीतारहस्य' मंडाले येथे, १९१० ते १९११च्या कालावधीत, म्हणजे पहिल्या महायुद्धाची नौबत झडण्यापूर्वी, त्यांनी लिहिलेले होते, ही गोष्ट ध्यानात घेतली असता, याबद्दल फारसे नवल वाटण्याचे कारण नाही. 'गीतारहस्य' १९१५च्या जूनमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांनी, १९१७च्या मार्चमध्ये, रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली. अर्थात्, ला–ओ–त्सेपासून प्रोधनपर्यंत अनेक तत्त्वज्ञांनी, गेल्या अडीच हजार वर्षांत, जे अराज्यवादाचे तत्त्वज्ञान विकसित करीत आणलेले होते, ते टिळकांच्या अवलोकनात आलेले असले पाहिजे. शिवाय, खुद्द त्यांच्या डोळ्यांसमोरच मुळी, टॉल्स्टॉय आणि क्रोपोटकिन हे त्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करीत होते. त्याचप्रमाणे, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील विष्णुबुवा ब्रम्हचारी यांच्यासारख्या मनीषीने, 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' लिहून, अराज्यवादाचा जरी नव्हे, तरी कम्युनिझमचा राजनैतिक आदर्श महाराष्ट्रातील लोकांपुढे ठेवलेलाही त्यांनी पाहिला होता. तेव्हा, त्यांच्यासारख्या विचक्षण तत्त्वचिंतकाला साम्यवाद आणि अराज्यवाद या दोन्ही तत्त्वप्रणाली परिचित असल्या पाहिजेत, हे उघड आहे. तथापि 'गीतारहस्या'त मात्र त्यांचा उल्लेख आढळत नाही. विशेषतः, अध्यात्म आणि नीतिशास्त्र यांची तुलनात्मक चर्चा करताना, जे टिळक जर्मन पंडित नीत्शे याच्यापर्यंत येऊन पोचलेले होते, त्यांनी साम्यवाद आणि अराज्यवाद यांचा परामर्श 'गीतारहस्या'त का घेतला नाही, हे समजत नाही. कदाचित् गीतेच्या मर्यादा याला कारण झाल्या असतील.

विनोबांनी, आपल्या 'गीताप्रवचना'त या दोन्ही वादांचा परामर्श घेऊन, गीतेच्या आधाराने, साम्ययोगाचे तत्त्वज्ञान आणि शास्त्र लोकांपुढे ठेवले. १९५३–५४ साली बिहारमधे केलेल्या पदयात्रेत त्यांनी या योगाचे समग्र दर्शन आपल्या व्याख्यानातून विशद करावयाला प्रारंभ केला. साम्यवादाचा पाया आर्थिक आणि राजकीय आहे, तर साम्ययोगाचा आध्यात्मिक आणि नैतिक आहे, हा या दोन तत्त्वप्रणालीतील पहिला महत्त्वाचा मूलभूत फरक होय. अशा रीतीने, या दोन प्रणालींचे अधिष्ठानच मुळी भिन्न असल्यामुळे, त्यांना स्वरूपही अर्थातच भिन्न प्राप्त झाले. सर्वोदयापूर्वी आणि सर्वोदयासाठी सर्वनाश झालाच पाहिजे, अशी साम्यवादाची भूमिका आहे. उलट साम्ययोगात कोणत्याही प्रकारच्या हिंसेला थारा नाही. साम्यवाद आणि साम्ययोग यांच्यातील भेद स्पष्ट करताना विनोबांनी, बाराहार येथे, ता. २६ सप्टेंबर १९५३ रोजी केलेल्या भाषणात, असे सांगितले की, "प्रत्येक मनुष्यात एकच आत्मा समान रूपात वास करीत आहे, असे साम्ययोगाचे म्हणणे आहे. साम्ययोग मानवामानवांत भेद करीत नाही. येवढेच नव्हे, तर मानवातील आत्मा व इतर प्राणिमात्रातील आत्मा यातही मूलभूत भेद मानीत नाही. परंतु, तो येवढेच मान्य करतो की, मानवी आत्म्यात जो विकास संभवनीय आहे, तो दुसऱ्या प्राण्यांच्या आत्म्यात संभवू शकत

नाही. मानवातही शिक्षणाने विकास होत असला, तरी सर्वांचा विकास सारखा होत नाही. सृष्टमात्रांत एकच आत्मा वसत असल्यामुळे शक्य तोवर सर्व प्राण्यांचे रक्षण करणे आवश्यक आहे." या विनोबांच्या विधानावरून साम्ययोगात हिंसा इतकी वर्ज का मानलेली आहे, याची कल्पना येईल. त्याबरोबरच, या योगाची राजनीति आणि समाजनीति स्पष्ट करताना त्यांनी असे उद्‌गार काढलेले आहेत की, "आम्हाला केवळ शोषणरहित समाजच नको, तर शासनरहित समाजरचना पाहिजे आहे. साम्ययोगाच्या कल्पनेनुसार शासन खेड्याखेड्यात वाटले जाईल, खेड्याखेड्याचे स्वतःचे राज्य होईल. मुख्य केंद्रात नाममात्र सत्ता तेवढी राहील याप्रमाणे होता होता शासनमुक्त समाज आकारास येईल. . .साम्ययोग हा नैतिक मूल्यांत परिवर्तन घडवीत आहे, असा आमचा दावा आहे. कारण, त्याचे मूलतत्त्व आध्यात्मिक आहे; व तो जीवनाच्या सर्वच शाखा उपशाखात आमूलाग्र क्रांति घडवून आणतो." या विनोबांच्या उद्‌गारांवरून साम्ययोगाला जो समाज आणि जे राज्य किंवा अराज्य अपेक्षित आहे, त्याचे यथार्थ चित्र डोळ्यांपुढे उभे रहाते. साम्यवादाचेही अंतिम ध्येय अराज्यवाद हेच असल्याचे मार्क्स, बाकुनिन, लेनिन प्रभृती त्याच्या प्रतिपादकांनी म्हटलेले आहे. पण, हे ध्येय साध्य करून घेण्यासाठी त्यांनी हिंसा आवश्यक मानलेली असून, अराज्य स्थापन होईपर्यंत, मध्यंतरीच्या संक्रमणकाळात, श्रमिक पक्षाची हुकूमशाहीदेखील तितकीच अनिवार्य मानलेली आहे. उलट, दान आणि विकेन्द्रीकरण या सात्त्विक साधनांनी स्वराज्याकडून अराज्याकडे जाण्याचा क्रांतीचा अहिंसक मार्ग म्हणजेच साम्ययोग ! विनोबांनी, 'क्रांती' हा हिंसेशी एकरूप झालेला शब्द साम्ययोगाने घडून येणार असलेल्या या परिवर्तनाच्या बाबतीत न वापरता, 'संक्रांति' हा जो मंगल शब्द योजिलेला आहे, तो याच कारणामुळे ! 'समत्वं योग उच्यते' या तत्वानुसार गीतेत जी साम्यावस्था वर्णन केलेली आहे, ती ऋषी, मुनी किंवा यती यांच्या पुरतीच मर्यादित न राहाता, संपूर्ण समाजाच्या जीवनाची उभारणी तिच्या पायावर झाली पाहिजे, अशी साम्ययोगाची आकांक्षा आहे. त्यासाठी, 'त्यक्तेन भुंजीथाः' या ईशोपनिषदातील आदेशानुसार, "समाजाय इदं, न मम, राष्ट्राय इदं, न मम" या भावनेने, समाजाला आपली जमीन आणि संपत्ती अर्पण करण्याची शिकवण आज भूदानाचे कार्यकर्ते लोकांना देत आहेत. विनोबांनी तर या क्रांतिकार्याला मुळी आपले जीवनच अर्पण केलेले आहे. ता. १८ एप्रिल १९५४ रोजी, बोधगया येथे भरलेल्या सर्वोदय संमेलनाच्या सातव्या अधिवेशनात, श्री. जयप्रकाश नारायण यांनी अशी घोषणा केली की, "आपण भूदान मागतो, संपत्तिदान मागतो, समयदान मागतो. पण तेवढ्याने भागणार नाही. जीवनदानच करावयास हवे. ते मी आता करतो." ही त्यांची प्रतिज्ञा ऐकल्यानंतर विनोबांनी त्यांना अशी चिठी दुसऱ्या दिवशी पहाटे पाठवली की, "तुमच्या कालच्या आवाहनानुसार भूदानयज्ञमूलक ग्रामोद्योगप्रधान अहिंसात्मक समाजरचनेसाठी मी माझे जीवन समर्पण करीत आहे." वस्तुतः, विनोबांनी वयाच्या दहाव्या वर्षी ब्रह्मचर्याची शपथ ज्या वेळी घेतली, त्याच वेळी देशसेवेला त्यांनी आपले जीवन समर्पण केलेले होते. तेव्हा त्यांना जीवनदान करण्याची तशी काहीच गरज नव्हती. पण, हे दानोदक श्री. जयप्रकाशजींच्या हातावर सोडताना, जो हा संकल्प त्यांनी उच्चारला, तो त्यांच्या जीवननिष्ठेचा निदर्शक आहे. आणि साम्ययोगाचा तर केवळ बीजमंत्रच ! वयाच्या तेराव्या वर्षापासून त्यांनी केलेल्या गीतेच्या परिशीलनातून त्यांच्या जीवननिष्ठेचे जे दर्शन आविर्भूत झाले, तोच साम्ययोग होय.

अर्थात् साम्ययोगाच्या पायावर कांचनमुक्त आणि शासनमुक्त असा समाज निर्माण करणे, हे विनोबांचे जीवनस्वप्न आहे. १९६० साली इंदूर येथे केलेल्या भाषणात त्यांनी असे जाहीर केले की, "माझ्या चिंतनाची पद्धत समन्वयाची आहे. या दिशेने चिंतनाची सवय होत गेल्यास शेवटी साम्य प्राप्त होईल, अशी मला आशा आहे. 'अभिधेयं परमसाम्यम् ।'—साम्ययोगाची प्राप्ती हे जीवनाचे ध्येय आहे. ... माझे जे तत्त्वज्ञानविषयक साहित्य आहे, त्यात साम्ययोग फलित आहे आणि समन्वय पद्धती आहे." म्हणूनच, मी शेवटी असे म्हणतो की, 'गीतारहस्य' हे जसे टिळकांचे 'स्वतःसिद्ध स्वरूप,' त्यांची वाङ्‌मयमूर्ती आहे, तसेच साम्ययोगाचे तत्त्वज्ञान हे विनोबांचे 'स्वतःसिद्ध स्वरूप,' त्याची वाङ्‌मयमूर्ती आहे.

विनोबांची साम्यसूत्रे आणि त्यावरील त्यांचे भाष्य वाचल्यावर माझे एक कम्युनिस्ट मित्र म्हणाले,

" इतर कोणत्याही गांधीवाद्यापेक्षा विनोबांना परिस्थितीचे आकलन अधिक आहे आणि तात्त्विक दृष्टीनेही ते आम्हाला अधिक जवळ आहेत, ही गोष्ट खरी. पण, कांचनमुक्त आणि शासनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी जी साधने त्यांनी योजिलेली आहेत, त्या साधनांनी साम्ययोग मूर्त रूपाला येण्यासाठी दुसरे कृत युगच सुरू व्हावे लागेल !" मी त्यांना म्हटले, "काही बिघडत नाही. विनोबांना तर त्याची मुळीच फिकीर नाही. जो भक्तोत्तम वैद्यनाथाच्या मंदिरात हरिजनांना घेऊन गेल्याबद्दल मुकाट्याने मार खातो आणि जगन्नाथाच्या दर्शनासाठी फ्रेंच भगिनीला बरोबर घेऊन गेल्याकारणाने प्रवेश न मिळाल्यामुळे मंदिराच्या दारातूनच परत फिरतो, — मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह करण्याची कल्पनासुद्धा ज्याच्या मनाला शिवत नाही, — त्या या आदर्श सत्याग्रहीला आपल्या साध्याच्या शुचितेइतकीच साधनांच्याही शुचितेची कदर आहे, हे आपण लक्षात घ्या. कोणत्याही प्रकारची जबरदस्ती, — सत्याग्रहदेखील, — ते आपल्या साध्याच्या प्राप्तीसाठी करावयाला तयार नाहीत. त्यांना हवा असलेला आदर्श कांचनमुक्त आणि शासनमुक्त समाज ज्या दिवशी स्थापन होईल, त्या दिवशी खरोखरीच या धर्मभूमीत पुनश्च कृतयुग अवतरेल !"

" पण ते कृतयुग पहायला तेही राहाणार नाहीत आणि तुम्हीआम्हीही राहाणार नाही !" माझे मित्र उपहासाने उद्गारले. "नाही राहाणार. पण म्हणून काय झाले ? कृतयुग तर येईल ना !" मी विचारले. "ते सुद्धा एक स्वप्नरंजनच आहे !" ते उपरोधाने म्हणाले. "असू दे !" मी उद्गारलो, "असल्या स्वप्नांनीच या कर्मभूमीतील मानवी जीवन अधिकाधिक उजळत गेलेले आहे. " 'कविर्मनीषी परिभूः स्वयंभूः,' अशा कोटीतले विनोबा आहेत. त्यांच्या द्रष्टेपणामुळेच गीतेचे हे नवे दर्शन आम्हाला लाभले आणि आम्ही धन्य झालो. येवढयावर मी संतुष्ट आहे !"

आचार्य विनोबा भावे

(पान २२६ वरून)

आहे. त्याचा तथ्यांश असा की चारित्र्य, नैतिकता किंवा विनोबा ज्याला लोकनीती म्हणतात तिचा आणि समृद्धीचा अन्योन्यसंबंध आहे. ही संपत्ती सतत उद्योग आणि परिश्रमाच्या बळावर मिळवायची आहे ह्याबद्दल ऋग्वेदातून पुन्हा पुन्हा उल्लेख आलेले आहेत, श्रमावाचून संपत्तीचा धि:क्कार करण्यात आलेला आहे. विश्रांतीची क्षणमात्र अपेक्षा न करता, प्रकाशाचा आणि जीवनाचा सृष्टीला सतत पुरवठा करणाऱ्या सूर्याचा पुरुषार्थ हा खरा पुरुषार्थ असेही सांगितले आहे. विनोबांनी भूदानापासून सुरुवात करून संपत्तिदान, श्रमदान, जीवनदान आणि ग्रामदान ह्या नवनव्या आधारावर ग्रामराज्याच्या ज्या योजनेची उभारणी केली आहे, तिचं मर्म ह्या आध्यात्मिक भूमिकेत पाहायला मिळतं. विनोबांना आम्ही संत–महात्म्यांच्या मालिकेत वसवितो. परंतु २० व्या युगातील अणुयुगाच्या संदर्भात भारताच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीला अनुलक्षून हरितक्रांती निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी जो नवा जीवनवाद प्रस्तुत केला आहे तो युगपुरुषाच्या द्रष्टेपणाची आठवण करून देणारा आहे.

आश्चर्य असं की, आध्यात्माच्या बैठकीतून निर्माण झालेला हा जीवनवाद विज्ञानाचा हात धरून पुढे जाऊ इच्छितो,–इतकंच नव्हे तर अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड नव्या युगात अपरिहार्य होऊन बसली आहे, असं आवर्जून सांगतो आहे. श्री. नारगोलकरांनी आचार्यांना परमाणुयुगातला पहिला संत म्हणून संबोधिलं आहे. ह्या क्षेत्रातलं त्यांचं द्रष्टेपण त्यांना मनूंच्या मालिकेत आधुनिक मनू म्हणून नेऊन बसविणारं आहे.

आचार्यांनी, विज्ञान आणि अध्यात्म याच्या समन्वयाची नव्या युगाला खरी गरज आहे असा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले की, विश्वाला सर्वात अधिक मारक ठरलं आहे ते धर्मकारण आणि राजकारण ! आचार्यांच्या या सार्थ उद्गारांचं विश्लेषण स्वामी रंगनाथानंदांनी आपल्या 'वेदान्त आणि विज्ञान' या भाषणात फार समर्पकपणे केलं आहे.

वेदांच्या अपौरुषत्वाची त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोणातून केलेली मीमांसा मनाला एकदम भिडणारी आहे. अपौरुषत्वाचा अर्थ आहे सापेक्षता नसणं ! पूर्ण निरपेक्षता असणं ! ज्ञाता फक्त साक्षी आहे, निरपेक्ष वृत्तीने ज्ञान टिपतो आहे. वेदान्तात अशा या व्यक्तिनिरपेक्ष (Impersonal) ज्ञानाची मांडणी आहे, आणि म्हणूनच विज्ञानाचा त्याच्याशी घनिष्ठ संबंध आहे. गीतेत क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार केलेला आहे, क्षेत्रात सविकार क्षेत्र अतर्भूत आहे असं सांगून, जडाबरोबर सविकार क्षेत्राचं अध्ययन, वैज्ञानिक दृष्टिकोणाला अभिप्रेत आहे असा निर्देश केला आहे. पण क्षेत्र आणि सविकार क्षेत्राचं अध्यदनही संपूर्ण ज्ञानप्राप्तीच्या आणि सत्यशोधनाच्या उद्दिष्टाची पूर्ती करू शकत नाही. कारण या दोन्ही क्षेत्रांचा धनी जो क्षेत्रज्ञ, जो चेतन आणि ज्ञानयुक्त आहे, त्याची ओळख जोपर्यंत पटत नाही, तोपर्यंत त्याने निर्मिलेल्या सृष्टीचा बोध माणसाला होणं केवळ अशक्य आहे.

आचार्य विज्ञान आणि अध्यात्माचा उल्लेख करतात तेव्हा त्यांना विज्ञान आणि वेदान्ताचा उल्लेख अभिप्रेत असतो. कारण सत्यशोधन हे वेदांताचं उद्दिष्ट आहे. विज्ञानही सत्याचा वेध घेत असतं. अपौरुषेय वेदान्ताला सत्यशोधन करीत असताना विश्वासंबंधीच्या अनुभवांची मोजमाप करावी लागली आहे. विज्ञानही अनुभव आणि निरीक्षणाच्या मार्गाने वाटचाल करीत आहे. परंतु विज्ञानाने केवळ भौतिकांवरच आपल्या ज्ञानाचा पाया रचल्यामुळे, त्याच्या आतापर्यंतच्या वाटचालीत आधुनिक शास्त्रज्ञांना एकांगीपणाचा दोष दिसून येऊ लागला आहे. पाश्चात्त्य शास्त्रज्ञ आता असं म्हणू लागले आहेत की, मनुष्य ज्या भौतिक जगात वावरतो, त्या भौतिक जगाशी त्याच्या अंतर्गत जीवनाचा विशिष्ट क्रिया–प्रतिक्रियांच्या रूपाने संपर्क येतो. त्या अंतर्गत जीवनाच्या क्रिया–प्रतिक्रियांचा अभ्यास आधुनिक शास्त्रज्ञांनी करायला हवा आहे. ह्या नव्या दृष्टिकोणातून, मनोविज्ञानशास्त्राच्या विकासावर भर देण्यात येऊ लागला खरा. पण हे अध्ययनही माणसाच्या बाह्य आचारविचारांपर्यंतच मुख्यत: मर्यादित राहिल्यामुळे, त्यात अपुरेपणा राहीलच. अगदी नव्याने Depth Peychologyची कल्पना निर्माण झाली आहे आणि आंतरिक मनोव्यापारांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. वेदांताने

मात्र आधीच या बाबतीत फार मोठी आघाडी मारली आहे. उपनिषदांचा अध्ययनविषय मुळातच या आंतरिक मनोव्यापारांशी संबंधित आहे. इंद्रियगम्य ज्ञानाच्या ज्या मर्यादा, त्याला त्यांनी भौतिक विज्ञानाच्या विकासाला मर्यादा घातल्या आहेत. वेदान्तात मात्र क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ या दोघांचाही सांकल्याने विचार करून, दोन्ही ज्ञानांना एकाच कक्षेत अंतर्भूत करण्यात आले आहे.

जड आणि चैतन्याच्या ज्ञानाच्या पाठीमागे एकाच स्वयंचलित तत्त्वाचा आधार आहे ही गोष्ट मान्य केल्यास, अध्यात्म आणि विज्ञान या दोन्ही विद्या एकाच पातळीवर संलग्न होऊ शकतात, ही गोष्ट विवेकानंदांनी प्रथम आपल्या विचारातून प्रकट केली. आधुनिक शास्त्रज्ञांनी सुद्धा या बाबतीत, विज्ञानाचा केवळ भौतिकवादी आधार अपुरा असून, अध्यात्म्याच्या दृष्टिकोणातून त्याला पूर्णता द्यायला हवी असा विचार प्रदर्शित केला आहे. डार्विनने उत्क्रांतिवादाचा विचार भौतिक पातळीवरून केला होता. विकास घडतो त्यामागे प्रेरणा नाही, केवळ एक आंधळी प्रक्रिया तेवढी आहे असा मुद्दा त्याने मांडला होता. पण आंधळ्या उत्क्रांतीचा विचार मागे टाकून आधुनिक शास्त्रज्ञ आता evolutionary vision च्या गोष्टी बोलू लागले आहेत. म्हणजे माणसाची प्रेरणा उत्क्रांतीला वळण देणार ही गोष्ट मानावी लागेल. उपनिषदांनी हेच मानलं आहे.

अध्यात्म आणि विज्ञान यांचा जीवनात समन्वय घडून आल्यास व्यक्तिमत्त्वाचा प्रकर्ष होईल आणि अशा ठोस व्यक्तिमत्त्वाने भरलेल्या समाजात, कोटी-कोटींची मानवी शक्ती संघटित होईल, असं विवेकानंद म्हणाले होते. याच लोकशक्तीतून रसरशीत जीवनाभिमुखता आचार्यांना निर्माण करायची आहे.

श्री. नारगोलकरांनी आचार्यांच्या मागे साम्ययोगी असं अभिधान जोडलं आहे. आणि खरोखरच आचार्यांच्या मागे इतकं समर्पक असं दुसरं विशेषण लावता येणार नाही. नुकतंच असं वाचण्यात आलं की काही दिवसांमागे कनु सन्याल यांनी असा दावा मांडला होता की ते विनोबांचं काम करीत आहेत.

कनु सन्यालांना साम्ययोगाची दीक्षा द्यायला आचार्यांची ना असणार नाही. साम्यवादी बुद्धिमान आहेत असा त्यांचा लौकिक आहे. साम्ययोगाप्रत पोचण्याकरता स्थिरप्रज्ञेपर्यंतची चढण चढणं त्यांना कठीण जाऊ नये. बुद्धिभेद घडवून आणणे, आचार्यांच्या साम्ययोगाला संयोगाची आणि मीलनाची ओढ आहे. संघर्षातून विकास घडला तरी आचार्यांना सुसंवाद हवा आहे. संयोग, सुसंवाद, नवनिर्मिती हे सारे एकाच चैतन्यतत्त्वाचे पैलू आहेत असं ते मानताहेत.

Democratic Manifesto म्हणून Ferdinand Peroutka ह्याचं Communist Manifesto ला उत्तर देणारं एक पुस्तक नुकतंच वाचनात आलं. अत्याधुनिक युगात, 'खुल्या व्यापारा'च्या सिद्धांताने जी अत्याधुनिक प्रगती केली आहे, त्यामुळे खाजगी उद्योगांच्या प्रशासकीय ध्येयधोरणात आणि व्यवस्थापन यंत्रणेच्या कौशल्यात इतका आमूलाग्र बदल झाला आहे की श्रीमंत, गरीबांना श्रीमंत करीत वैभवाची वाटचाल चालताना दिसू लागले आहेत" असा अभिप्राय या पुस्तकाने व्यक्त केला आहे. तात्पर्य साम्यवाद्यांच्या मार्क्सवादी आधाराची फळीच लेखकाने काढून घेण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केलेला दिसतो.

अमेरिकादी विकसित समृद्ध राष्ट्रांच्या बाबतीत वरील लेखकाचा दावा खरा असेलही कदाचित्. पण साम्राज्य हळूहळू नष्ट होऊ लागताच, इंग्लंडमध्ये संपत्तीची घसरगुंडी सुरू झाली आणि त्याचबरोबर समाजवाद सिंहासनाधिष्ठित होऊ लागला. भारतासारख्या अविकसित राष्ट्राने अहिंसात्मक क्रांतीच्या द्वारे ग्रामस्वराज्याची सिद्धता करावी यातच खरी योजकता आहे.

पुस्तक परीक्षण

—प्रा. कुसुममाला कोलारकर

रामदास : वाङ्मय आणि कार्य
(आवृत्ति दुसरी)

ले.—प्रा. न. र. फाटक
प्रकाशक——मौज प्रकाशन गृह, मुंबई ४
मूल्य——रु. २५–००; पृष्ठे ४४०.

श्री. न. र. फाटक हे एक विद्वान, व्यासंगी, चिकित्सक, बुद्धिवादी लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांना अभ्यासाने पटलेली मते ते निर्भीडपणे मांडीत असतात.

समर्थ रामदासस्वामींच्या कार्याविषयी आणि वाङ्मयाविषयी या अभ्यासपूर्ण ग्रंथाचा प्रपंच मांडताना त्यांनी आपली भूमिका विशद केली आहे. ते म्हणतात, "समर्थविषयक अभिमान व अभ्यास यात अंतर आहे. गेल्या दोनशे–अडीचशे वर्षांतील भाविकांनी समर्थांचे चरित्र अद्‌भुत दैवी चमत्काराच्या सामग्रीने तयार केले तर गेल्या ५० । ६० वर्षांतील समर्थाभिमानी लेखक उजेडात आलेल्या वाङ्मयातील काही अंशांची ओढताण करून शिवाजी महाराजांचे स्वराज्यसाधन म्हणजे समर्थांचे चरित्र असे भासवीत आहेत. श्री. राजवाड्यांच्या मताचा अनुवाद गतानुगतिकत्वाने होत आहे. याची जाणीव जिज्ञासू जनतेला झाली पाहिजे. समर्थांचे चरित्र आणि वाङ्मय हा ज्ञानाचा विषय आहे. तो ज्ञानाच्या कसोटीवर घासून पुसून जेवढा ग्राह्य ठरेल तेवढाच घेतला पाहिजे." श्री राजवाडे, पांगारकर, भट, देव यांचासारख्या समर्थ वाङ्मयाच्या अभ्यासकांनी जी अनुमाने आणि मते मांडली होती त्यांचा परामर्श ह्या पुस्तकात घेतला गेला आहे. रामदास हे राजकीय संत होते, रामदास हे शिवाजीचे राजकीय गुरू होते, त्यांनी स्वराज्यस्थापनेला प्रत्यक्ष हातभार लावला. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ व इतर संत निवृत्तीपर होते व रामदास मात्र प्रवृत्तीपर होते. इ.इ. महाराष्ट्रात दृढमूल झालेल्या अनेक समजुतींना सत्याचा फारसा आधार नाही हे सिद्ध करण्याचा त्यांच्या विवेचनाचा सारा रोख आहे. त्यांच्या मते रामदासांच्या दासबोधात भक्तीला आवश्यक असलेल्या विचाराखेरीज दुसऱ्या कोणत्याही विचारांचा आदर केलेला नाही. 'देवकारण' हेच रामदासांचे ध्येय होते. समर्थांना इस्लामी राज्याचे उच्चाटन करावे आणि हिंदूंचे राज्य स्थापन करावे या महत्त्वाकांक्षेने घेरले नव्हते तशी शिकवणूक त्यांच्या ग्रंथात कुठेच दिसत नाही. दासबोधात व इतरत्र आलेल्या लोकस्थितिनिदर्शक वर्णनाचे तात्पर्य समर्थांना देवाच्या कार्याची व परमार्थ-शुद्धीची चिन्ता लागली होती असाच होतो. 'राज-कारण' हा शब्द रामदासांनी 'चातुर्य' या अर्थी वापरला आहे. ज्या 'महाराष्ट्र धर्म' या शब्दावर राजवाड्यांनी रामदासांच्या राजकारणाची इमारत उभारली आहे तो शब्द त्यांनी 'क्षात्रधर्म' 'राजधर्म' 'सेवकधर्म' यासारखा प्रासंगिक अर्थाने वापरला आहे.

१९५३ साली जेव्हा या पुस्तकाची प्रथमावृत्ती प्रसिद्ध झाली आणि श्री. न. र. फाटकांनी समर्थचरि-त्राच्या अनेक साधनांचा अभ्यास करून महाराष्ट्रातील समर्थभक्तांच्या आणि सर्वसामान्य लोकांच्या मनातील रामदासाविषयींच्या रूढ कल्पनांना धक्का देणारे हे सत्यान्वेषण बुद्धीने काढलेले निष्कर्ष वाचकांसमोर ठेवले तेव्हा ते जितके खळबळजनक आणि क्रान्तिकारक वाटले तितकेच त्यापैकी काही निष्कर्ष अजूनही वाट-ण्यासारखे आहेत. संतांच्या बाबतीत प्रवृत्तिपरता आणि निवृत्तिपरता हे शब्द वापरणे तितकेसे योग्य नाही. परमार्थ हेच संतांचे प्रेम आणि ध्येय होते. ध्येय असे असावे की दुसरे ध्येय उरू नये. असे ध्येय म्हणजे यशप्राप्ती. रा. द. रानडे म्हणतात त्याप्रमाणे हे पाचही सत्पुरुष बाह्यतः भिन्न दिसले तरी देहातीत असे वस्तुरूप

झाल्याने अंतरी एकच होते. फक्त त्यांना स्वतःचे असे वैशिष्टच होते. सर्वांनी निरुपलेला परमार्थ हा अंती एकच असला तरी विवेचनपद्धतीत स्वभावानुसार फरक पडला. रामदासांनी आपल्या तत्त्वज्ञानात प्रयत्न व कर्मयोगावर विशेष भर दिला इतकेच. त्यात श्रेष्ठ-कनिष्ठ समजू नये हे मत आता मान्य व्हायला हरकत नाही. तसेच रामदासापूर्वीच्या संतांनी स्वराज्याची भूमिका व वातावरण तयार केले, हेही मत ग्राह्य होण्यासारखे आहे. असो.

माझ्यासमोर आहे ही नुकतीच प्रसिद्ध झालेली पुस्तकाची दुसरी आवृत्ती. १९५३ नंतर ज्यांच्या मतांचा परामर्श घ्यावा अशी नवीन माहिती कोणी मांडली नसल्यामुळे आपल्या मतांचा फेरविचार करावा असे लेखकाला वाटत नाही. ह्या पुस्तकात मांडलेल्या मतांवर आतापर्यंत महाराष्ट्रात उलटसुलट वादाचा धुरळा बराच उडाला असल्यामुळे त्याविषयी अधिक चर्चा करण्याची इथे जरूर नाही. या आवृत्तीत नवीन दोन जी प्रकरणे घातली आहेत त्यांचाच इथे विचार करणे आवश्यक आहे. समर्थांचा संप्रदाय आणि संत-कार्याची सफलता ही ती दोन प्रकरणे आहेत.

रामदासांच्या संप्रदायाचे संशोधन करून तशी माहिती श्री. देवांनी आपल्या ग्रंथातून दिली आहे. परंतु समर्थचारित्राच्या दृष्टीने समर्थभक्तांच्या साहित्याचा व समर्थसंप्रदायाच्या मठांचा व त्यांच्या उपासनापद्धतीचा परिचय 'संप्रदाय' या प्रकरणात करून दिलेला आहे तो अनेक दृष्टींनी उपयुक्त आहे. महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिणेकडे तंजावरपर्यंत पसरलेल्या अनेक मठांची व तेथील समर्थभक्तांच्या साहित्याची माहिती त्यात आलेली आहे. तसेच समर्थानन्तर दुसऱ्या पिढीपासूनच संप्रदायाच्या अधोगतीला कशी सुरुवात झाली याचे वर्णन उद्बोधक आहे. स्वार्थासाठी निर्माण झालेला संप्रदायातील अंतःस्थ कलह, त्यांच्यातील ज्ञानाचा आणि चारित्र्याचा अभाव, उपासनेच्या बाह्य अंगावर दिलेला भर इ. अनेक कारणांमुळे संप्रदायाचा ऱ्हास झालेला आढळतो.

'संतकार्याची सफलता' या प्रकरणात रामदासांपूर्वी महाराष्ट्रात जी एक संतमालिका निर्माण झाली त्या संतांच्या कार्याची 'सामाजिक' सफलता याविषयी चर्चा केली आहे. संतकार्याची सफलता या प्रकरणातले प्रतिपादन 'स्थूल बुद्धीला' कदाचित ओढाताणीचे वाटेल म्हणून लेखकाने अमेरिकन मानसशास्त्रज्ञ विल्यम जेम्स याच्या 'Varieties of Religious Experience' या पुस्तकाचा आधार घेऊन साधुत्व आणि त्याची महती पटवून देण्याचा प्रस्तावनेत प्रयत्न केला आहे. विल्यम जेम्सच्या पुस्तकात युरोपातील ख्रिस्ती संतांच्या चरित्रकथा असून तत्कालीन युरोपवर दया, निर्भयता, वैराग्य, भक्ती, इ. सद्गुणांचा संत-चरित्रामुळे कसा प्रभाव पडला होता हे सिद्ध केले आहे. साधुत्वाची लौकिक उपयुक्तता पटवून देताना जेम्स पॉलने लिहिले आहे की, संत हे एक समाजविकासाचे साधन आहे. संत, बिघडलेली माणुसकी सुधारण्याकरिता झटणारे पुरुष असनात. अत्युत्कट सदाचार आणि मानवहिताचा उन्नत विचार हेच त्यांचे वैशिष्टच असते. या भूमिकेशी श्री. न. र. फाटक सहमत आहेत. पण तरीही महाराष्ट्रातील संतचरित्रांतील अद्भुताची चढलेली पुटे बाजूला सारून त्या त्या संतांच्या चारित्र्यकणाच्या गर्भात काही 'सामाजिक हिता'चे कृशस्थूल तत्त्व सापडते का हे बघण्याचा बुद्धिनिष्ठ आणि तर्कनिष्ठ प्रयत्न त्यांनी येथे केला आहे. जनसेवा हीच ईश्वरसेवा हे या युगाचे ब्रीद आहे. पण, ईशसेवा हीच जनसेवा असे संत मानीत आले आहेत असे रा. द. रानडे म्हणतात, त्याची मला या ठिकाणी आठवण होते. ते म्हणत, "संत सूर्याप्रमाणे असतात. सूर्य काही करीत नाही पण, त्याचे साधे अस्तित्व जगाला उपकारक होते." ईशप्रेमाचा प्याला संत पितो आणि त्यामुळे त्याच्या संगतीतील लोक सुधारतात! असंगती अलंकाराचे असे दुसरे उदाहरण सापडणार नाही. परमार्थाने एक प्रकारची वृत्ती (attitude) निर्माण होते आणि ही वृत्ती माणसाला मानवी जीवनाचा मूलगामी विचार करायला शिकविते. हे जर खरे मानले तर "संत आणि समाजहित" या विषयीच्या आपल्या कल्पना स्पष्ट होऊ शकतात.

ज्ञानेश्वरानंतर होऊन गेलेल्या संतांपैकी महिपतीने लिहिलेली जवळ जवळ ३० चरित्रे उपलब्ध आहेत. नामदेव, सावता, रोहिदास चांभार, चोखोबा इ. संतचरित्रातील घटना व आख्यायिका यावरून तत्कालीन समाजावर संतांच्या शिकवणुकीचे कसे परिणाम दिसतात या विषयीचे या प्रकरणातील अनेक निष्कर्ष अर्थातच अमान्य होण्यासारखे नाहीत. संतमालिकेत सर्व जातीचे व सर्व भारतातील लोक होते. त्यांचे

पारमार्थिक जीवन लोकोद्धाराच्या एखाद्या तत्त्वाला उजळणारे आहे. संतांनी खरा धर्म शिकविला, खरा देव ओळखण्यास शिकविले, भेदभाव नष्ट करून ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्वराज्य आणि पर-राज्य यांची विवंचना त्यांच्या उपदेशात दिसली नाही तरी लोकांना देवाधर्माची कर्तव्ये शिकवून त्यांचा ऐहिक उत्कर्ष साधण्याचा प्रयत्न केला आणि स्वराज्य-स्थापनेला काळाची अनुकूलता संतांच्या शिकवणुकीने मूर्तावस्थेला चढविली हे संतकार्याच्या फलश्रुतीचे प्रमुख अंग समजले पाहिजे. यासारखे त्यांनी मांडलेले निष्कर्ष – त्याविषयी मतभेद होण्याची शक्यता नाही.

परंतु काही संतचरित्रातील आख्यायिकांवरून त्यांनी जे सामाजिक निष्कर्ष काढले आहेत त्याच्या-विषयी मतभेद होण्याची शक्यता वाटते. उदा. सावता-माळ्याच्या चरित्रात सावतामाळी देवाला आपल्या पोटात लपवितो अशी जी आख्यायिका आहे त्या गोष्टीचे तात्पर्य श्री. फाटकांनी असे काढले आहे, देव देव्हाऱ्यात किंवा देवळात ठेवण्यात खरी कृतार्थता नसून हृदय हेच खरे देवाचे स्थान आहे. – हे तात्पर्य विवाद्य नाही. परंतु पुढे ते जो एक निष्कर्ष काढतात तो असा :— " मुसलमानांच्या राजवटीत देव देवळे जमीन-दोस्त होत असता देवासाठी मूर्ती व मंदिरे यावर विसंबण्याचा तो काळ नव्हता या जाणीवेतून देवाचे वसतिस्थान ज्याचे त्याचे हृदय हा सिद्धांत ठसविण्याचा हेतु प्रस्तुत कथेमध्ये असला पाहिजे !" आणि पुढे ते म्हणतात, "या निष्कर्षाला तर्काच्या क्षेत्रात मज्जाव होणार नाही !"

'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी
लसूण मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी'

असे म्हणणारा हा सावतामाळी विठ्ठलमय झाला होता.

'सावता म्हणे केला मळा
विठ्ठलपायी गोविला गळा'

अशा वृत्तीच्या या संताच्या चरित्रातली ही आख्या-यिका आहे. पुष्कळदा संतांच्या गूढ आणि रूपकात्मक भाषेत वर्णन केलेल्या अनुभवाचे रूपान्तर सामान्य लोकांच्या जगात अतिशय प्राकृत आणि व्यवहारी पातळीवर केले जाते. कधी ते विकृतही होते. याप्रमाणे सावतामाळ्याच्या चरित्रातील ही प्रस्तुत आख्यायिका खालील अभंगावर आधारलेली असावी असे मला वाटते.

विकासिले नयन स्फुरण आले बाही
दाटले हृदयी करुणाभरिते
जाता मार्गी भक्त सावता तो माळी
आला तयाजवळी पांडुरंग ।
नामा ज्ञानदेव राहिले बाहेरी
मळियाभीतरी गेला देव
माथा ठेवुनी हात केला सावधान
दिले आलिंगन चहु भुजी
चरणी ठेवुनी माथा विनवितो सावता
बैसा पंढरीनाथा करीन पूजा ॥

याशिवाय दुसरी गोष्ट अशी की देवभक्ताच्या अद्वैत-भावाचे वर्णन सर्वच संतांनी केले आहे.

धरिला पंढरीचा चोर
गळां बांधुनिया दोर
हृदय बंदिखाना केला
आंत विठ्ठला कोंडिला ॥

असे जनाबाई म्हणते. किंवा 'पाहो गेलो देवापाशी । देवरूप झालो अंगी' असे एकनाथ म्हणतात. यातलीच भावना सावतामाळ्याच्या आख्यायिकेत आली आहे. 'विश्वात्मक' देवाची पूजा करणाऱ्या ज्ञानेश्वरांची परंपरा 'देही देव पाहे तोचि ब्रह्मज्ञानी' अशी संतांच्या उपदेशाची पार्श्वभूमी आणि—

'आत विठ्ठल बाहेर विठ्ठल
मीचि विठ्ठल मज भासतसे'
किंवा
देव येथे देव तेथे । देवाविण नाही रिते
किंवा
विश्व तूं व्यापक । काय मी निराळा

ही संतांची प्रचीती—या सर्व गोष्टी लक्षात घेता मुसलमानांच्या राजवटीत मूर्ती व मंदिरे यांवर विसं-बण्याचा काळ नव्हता या जाणिवेतून देवाचे खरे वसतिस्थान प्रत्येकाचे हृदय होय. हा सिद्धान्त ठस-विण्याचा हेतू प्रस्तुत कथेत असावा हा सामाजिक निष्कर्ष पटण्यासारखा नाही.

त्याचप्रमाणे संतांच्या चरित्रातील चमत्कारांचा तर्क व बुद्धी यांना पटेल असा नवीन दृष्टिकोनातून अर्थ लावण्याचा श्री. फाटकांनी प्रयत्न केला आहे. दामाजीने दुष्काळात लोकांसाठी धान्याचे सरकारी कोठार लुटविले. तर लुटलेल्या धान्याची पुरेपूर रोकड

साहित्य समीक्षा

[**श्रीनिवास खळे : एक संकलन**; प्रकाशिका — **सौ. शुभा शेरे**, ३२ श्यामसदन, जयप्रकाश नगर, रोड नं. ३, गोरेगाव (पूर्व), मुंबई ६३. किंमत : ८ रुपये, पृष्ठे ११२.]

शब्दसृष्टी अनंत आणि अपार आहे. जुन्या जगात तिचा संबंध फक्त ज्ञानाशी होता. या नव्या युगात तो ज्ञानाबरोबर विज्ञानाशीही जुळला आहे. आज दूरध्वनी, ध्वनिमुद्रिका, आकाशवाणी, बोलपट इत्यादी यंत्रांच्या माध्यमाने शब्दांचे दूरदूरवर प्रक्षेपण होत आहे. जनतेची श्रवणशक्ती दिवसेंदिवस तीक्ष्ण, सावध व चोखंदळ होत आहे. श्रीयुत श्रीनिवास खळे यांचा संबंध नव्या यांत्रिक शब्दसृष्टीशी आहे.

आपल्याकडले जुने रागप्रधान शास्त्रीय संगीत शांत व संथ होते. त्यात रागाच्या विस्ताराला, आलापांना, तानांना आणि हरकतींना भरपूर अवकाश व अवसर होता. त्यात शब्दांच्या अर्थापेक्षा गायकाच्या गळ्याला आणि वादकाच्या सुरावटीला अधिक मान व महत्त्व होते. आजच्या संगीतात शब्दांचे माहात्म्य वाढले आहे. त्यात शब्दांचा अर्थ, त्यात गुंफलेला भाव, त्यात आविष्कृत झालेले काव्य, त्या काव्याचे वातावरण, त्यातला वाग्व्यवहार आणि अर्थांचे संकेत या सर्वांचा सामग्र्याने नीट विचार करून मग संगीत-नियोजकाला त्या शब्दगुंफेला ' चाल ' द्यावी लागते आणि तिला अनुरूप अशी वाद्यांची ' साथ ' करावी लागते; म्हणजे मग ' गीत ' गायकगायिकेच्या गळ्याने अवतीर्ण होते. हे करताना नियोजकाला यंत्राच्या ' गती 'कडे लक्ष द्यावे लागते आणि त्याचा ' तोल ' सांभाळावा लागतो. श्रीयुत खळे यांनी हे जबाबदारीचे व जोखमीचे कार्य अनेक वेळी यशस्वितेने व कुशलतेने करून दाखविले आहे. त्यामुळे ते असंख्य रसिकांच्या, कवींच्या, चित्रपटलेखकांच्या, वादकांच्या व गायकगायिकांच्या आदरास व कौतुकास पात्र झाले आहेत.

प्रस्तुत ' संकलना 'त पु. ल. देशपांडे, लता व हृदयनाथ मंगेशकर, बेडेकर, रतिलाल भावसार, अशोक रानडे आणि मंगेश पाडगावकर इत्यादी त्यांच्या स्नेह्यांनी आणि चाहत्यांनी त्यांचा गुणगौरव केला आहे. भा. ग. शेरे आणि वसुमती खळे यांनी त्यांच्या गृहजीवनाचा वृत्तांत सादर केला आहे; आणि वसंत निनावे यांनी तो आरंभी ' मनोगता 'त कौशल्याने बांधला आहे. ' संकलना 'च्या शेवटी अनिल मोहिले यांनी ' खळ्यांच्या दहा गीत रचना : संहिता आणि स्वरलेखन ' यांसह प्रस्तुत केल्या आहेत. ' संकलना 'ला खळ्यांच्या जीवनाशी संबद्ध असणाऱ्या सात छायाचित्रांची जोड देण्यात आली आहे. या सुंदर व संग्राह्य ' संकलना 'बद्दल सौ. शुभा शेरे यांना जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत.

— प्रा. भ. श्री. पंडित

(मागील पानावरून)

किंमत विठ्ठलाने महाराच्या रूपाने सरकारी खजिन्यात भरून टाकली. याचा अर्थ दामाजीच्या उदार कृत्याची भरपाई ' जनताजनार्दनाने ' करून टाकली असा घेतला पाहिजे असे लेखकाचे म्हणणे. याप्रमाणे संतचरित्रातील अनेक चमत्कारांचा अर्थ नव्या दृष्टिकोनातून लावता येईल काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. मला पुष्कळदा असे वाटते की, संतांचा निर्गुण-साक्षात्कार किंवा अद्वैतानुभव हा बुद्धीपलीकडचा आणि स्वसंवेद्य आहे म्हणून तो खरा मानला जातो आणि त्यांचा सगुणसाक्षात्कार मात्र चमत्कारात गणला जातो. कधी कधी त्या सगुण साक्षात्कारातूनच अनेक अद्‌भुत आणि आश्चर्यकारक आख्यायिका निर्माण होतात. एकूण संतचरित्राला जर आपण केवळ बुद्धी आणि तर्क यांचीच कसोटी लावली तर कधी कधी संतचरित्राचे मर्म हातातून निसटून जाण्याचा संभव आहे !

मेघदूताचा मराठी पद्यानुवाद
(मुक्तामाला)

[ले.—श्री. शेषराव गोविंद जोशी; प्रकाशक—पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर; पृष्ठे ३१; किंमत २ रु.]

कविकुलगुरू कालिदासाचे मेघदूत हे अवीट गोडीचे महाकाव्य आहे. या अभिजात संस्कृत काव्याचा रसास्वाद मराठी वाचकांना चाखता यावा या हेतूने संस्कृत वाङ्मयाचे व्यासंगी अभ्यासक व काव्यरसिक श्री. शेषराव गोविंद जोशी यांनी मेघदूताचे मराठीत भाषांतर केले आहे. मेघदूताची अनेक भाषांतरे मराठीत उपलब्ध आहेत. परंतु श्री. जोशी यांच्या अनुवादाचे वैशिष्टच हे की त्यांनी भाषांतरात मूळ संस्कृत शब्दाला केवळ मराठी प्रतिशब्द योजला नाही किंवा मूळ वृत्ताचा अट्टाहासही धरला नाही. संस्कृत श्लोकातील आशय, त्यातील रचनासौंदर्याची व कल्पनासौंदर्याची अत्यंत हळुवारपणे जपणूक करीत समर्पक शब्दयोजना करून सहजतेने मराठीत आणला आहे. मराठीतील काव्यसंकेताला अनुरूप अशी शब्दयोजना करून मूळ श्लोकाची भावाभिव्यक्ती समर्थपणे केलेली आहे, यात संशय नाही. भाषांतरकर्त्याचा पिंड कवीचा असल्याने मूळ काव्यातील सौंदर्यस्थळांची त्यांच्या हातून सहजतेनेच जोपासना झाली आहे, हे खालील श्लोकांवरून दिसून येईल--

शोभे तीर कटीपरीं वसन तें वारी जहालें दुरी
लज्जा दर्भकरीं गमे कशितरी झांकी नदीसुंदरी ।।
झाला तो जघनप्रदेश उघडा मूर्ती तुझी ती वरी ।
सोंख्यातें दुरि सारुनी रसिक तो जाईल कैसा दुरी ।।

किंवा

पर्जन्या सुचवी फुलें विकसलीं शोभे कदंबावरी ।
अर्धोन्मीलित केसरीं हरितशीं ती पीत अम्बंबरीं ।।
आल्या त्या कदलीदलांसि कलिका मृद्‌गंध सेवी करी ।
लोभे भृंगतती, कुरंगहि अती मातंगही त्यापरी ।।

अशी अनेक उदाहरणे प्रस्तुत संग्रहातून काढता येतील. "जातं वंशे भुवनविदिते पुष्करावर्तकानाम् ।" या श्लोकाचे भाषांतरात मूळ श्लोकाची सहजता, उदात्तता आणि त्यातील स्वभावोक्ती, त्यातील असलेल्या अर्थांतरन्यासासकट किती सुंदर उतरली आहे हे "झाला जन्मकुलात दिव्यहि तुझा शोभे गुणी अग्रणी" या श्लोकावरून येईल. "आनंदाश्रुविना न अश्रु दिसती त्या भाग्यभूमीवरी । पीडा कामशराविणे न दुसरी सम्मीलने जी हरी" यासारखी सहज आणि ओघवान शब्दरचना अनेक श्लोकांत उतरली आहे.—

श्री. जोशी यांची रचना प्रासादिक आणि सहज आहे. मुक्तामालेतील प्रत्येक श्लोक सहज आहे आणि रसिक मनाला मूळ संस्कृत श्लोकातील सौंदर्याचा प्रत्यय घडवून देणारा आहे. पुरस्कारार्थ लिहिलेल्या चार शब्दांत श्री. भ. श्री. पंडित यांनी यथार्थतेने म्हटले आहे, "ही माला गुंफताना श्री. जोशी यांचे एक निश्चित धोरण दिसते. तिच्यात ओवावयाचा मोती पाणीदार असावा, या दृष्टीने त्यांनी त्यांची निवड केलेली आहे. त्या मोतीदाण्याची उंची, त्याचा हुर्मुजी रंग, त्याचे तेज याकडे त्यांनी विशेष लक्ष पुरविले आहे......"

प्रासयुक्त नादमधुर रचना, वृत्तवैचित्र्य यांमुळे प्रस्तुत भाषांतर सरस आहे; इतकेच नव्हे तर मराठी आणि संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासकाला ते अत्यंत उपयुक्त ठरणारे असल्याने संग्राह्य आहे.

ऑडिट सारख्या रूक्ष व्यवसायात असून सुद्धा श्री. जोशी यांनी आपले वाङ्मयप्रेम आणि प्रतिभा जागृत ठेवली हीच अभिनंदनीय गोष्ट आहे. केवळ मेघदूताचे नव्हे तर त्यांनी ऋतुसंहाराचे श्लोकबद्ध भाषांतर केलेले आहे. त्याशिवाय 'मुक्तारामायण' आणि 'मातृमुक्ताहम्' या त्यांच्या श्लोकबद्ध रचना आहेत. काही संस्कृत स्तोत्रांचेही त्यांनी सरस भाषांतर केलेले आहे. त्यांचे हे अप्रकाशित वाङ्मयही अभ्यासकांना व काव्यप्रेमी रसिकांना उद्‌बोधक ठरणारे असल्याने शीघ्रातिशीघ्र रसिकांसमोर यावे असे वाटते.

—वासुदेव चोरघडे

वि. सा. संघ

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय

एक आवाहन

वि. सा. संघाचे 'श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय' अद्ययावत असावे.

संशोधकांना आणि अभ्यासकांना त्याचा नित्य उपयोग व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

संघाचे संदर्भ ग्रंथालय आता ग्रंथालयाच्या प्रशस्त जागेत गेले असून त्या ठिकाणी अधिक सोयी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

संशोधकांसाठी मौलिक असे ५००० ग्रंथ संदर्भ ग्रंथालयात असून जुनी दुर्मिळ मासिकेही अभ्यासकांना उपलब्ध आहेत.

एम. ए. चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना संदर्भ सेवा–देण्याची उत्कृष्ट सोय केली असून दरवर्षी १०० विद्यार्थी या योजनेचा फायदा घेत आहेत.

तरी संघाच्या सर्व सभासदांना नम्र विनंती की—

त्यांनी आपल्या जवळचे मराठी ग्रंथ, जुनी हस्तलिखिते, नियतकालिके व जुन्या दुर्मिळ वृत्तपत्रांचे अंक संघाच्या संदर्भ ग्रंथालयास भेट म्हणून द्यावे. अभ्यासक सदैव त्यांचे ऋणी राहतील.

संघाच्या सर्व सभासदांना ग्रंथालयास भेट देण्याचे व आमचे कार्य पाहण्याचे आग्रहाचे आमंत्रण.

चंद्रकांत कुळकर्णी
आमंत्रक, श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय,
वि. सा. संघ

अनुक्रमणिका

संघवार्ता

मा. नी गलगलीकर
सरचिटणीस

श्री. माधव डोंगरे यांचे व्हायोलिन वादन

सांस्कृतिक समिती अंतर्गत असलेल्या 'स्वरमंडळा'तर्फे शुक्रवार दि. ३१ जुलै ७० रोजी रात्री ९ वा. गडकरी सभागृहात मुंबईचे श्री. माधव डोंगरे यांचे व्हायोलिन वादन झाले. तबल्याची साथ श्री. प्रभाकर पिल्ले यांनी केली.

लो. टिळक यांचा ५० वा स्मृतिदिन

संस्थेतर्फे शनिवार दि. १ ऑगस्ट १९७० रोजी सायंकाळी ६-३० वाजता लोकमान्य टिळक यांचा ५० वा स्मृतिदिन 'युगवाणी'चे संपादक श्री. शं. बा. शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात साजरा झाला. यावेळी प्रा. प्र. ज. जागीरदार यांचे 'लोकमान्य टिळकांचा राजकीय दृष्टिकोन' या विषयावर व्याख्यान झाले.

कै. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा १९७०-७१ :-निकाल

विदर्भ साहित्य संघ व वक्तृत्वोत्तेजक सभा, पुणे यांच्या वतीने या वर्षी दि. ७, ८ व ९ ऑगस्ट १९७० रोजी सायंकाळी ६ वाजता धनवटे रंगमंदिरात कै. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा आयोजित करण्यात आली.

'खरे पाहता, लोकमान्य टिळक हे क्रांतिकारकच होते', असा वादस्पर्धेचा विषय यावेळी ठेवण्यात आला होता.

या वादस्पर्धेत एकूण १६ महाविद्यालयांच्या एकूण ३२ स्पर्धकांनी भाग घेतला.

या स्पर्धेत शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर या महाविद्यालयाला **फिरती रौप्य-ढाल** मिळाली.

वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक श्री. मधुकर अनंत जोशी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर यांना व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर या महाविद्यालयातील श्री. सुरेश अंबादास चेडे यांना मिळाले.

६० टक्के व त्याहून जास्त गुण मिळाल्याबद्दल श्री. मधुकर जोशी व श्री. सुरेश चेडे यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

पारितोषिक व प्रमाणपत्र-वितरणसमारंभ, प्रमुख पाहुणे डॉ. मधुसूदन चान्सरकर यांच्या हस्ते पार पडला.

या स्पर्धेचे वेळी तीनही दिवस परीक्षक म्हणून श्रीमती प्रमिलाताई दाणी, श्री. कमलाकरराव घटवाई व श्री. वामनराव आठल्ये यांनी सहकार्य दिले; याबद्दल त्यांचा व पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन चान्सरकर यांचा वि. सा. संघ अत्यंत आभारी आहे.

डॉ. इरावती कर्वे यांना श्रद्धांजली

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकर्त्यांची बुधवार, दि. १२ ऑगस्ट १९७० रोजी सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध समाजसेविका डॉ. इरावती कर्वे यांच्या निधनानिमित्त शोकसभा झाली. या सभेत वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. बाबुराव चिमोटे यांच्या अध्यक्षतेखाली खालील शोकप्रस्ताव सर्व संमत झाला.

ठराव

महाराष्ट्रातील विख्यात संशोधक, ग्रंथकार आणि विचारवंत डॉ. इरावती कर्वे यांच्या निधनामुळे संशोधन–क्षेत्राची अपरमित हानी झाली आहे. त्यांचे व्यक्तित्व अत्यंत गुणग्राही आणि व्यवच्छेदक स्वरूपाचे होते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

शेवटी २ मिनिटे सर्वांनी उभे राहून मूक श्रद्धांजली अर्पण केली.

‘स्वरमंडळा’चा वार्षिकोत्सव

सांस्कृतिक समिती अंतर्गत असलेल्या ‘स्वरमंडळा’चा वार्षिकोत्सव सोमवार दि. २४ ऑगस्ट ७० रोजी सायंकाळी ७ वाजता गडकरी सभागृहात साजरा करण्यात आला.

या वेळी रायपूर येथील कु. मीरा राव यांचे गायन झाले. तबल्याची संगत श्री. प्रल्हाद भजनी, व पेटीची साथ श्री. मनोहरराव देशपांडे यांनी केली. तसेच तंबोऱ्यावर कु. नेने या होत्या.

‘मराठी प्रवीण’ परीक्षेचे वर्ग

विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा समितीतर्फे अ–मराठी भाषिकांसाठी घेण्यात येणाऱ्या मराठी निम्नस्तर परीक्षेशी समकक्ष असलेल्या ‘मराठी प्रवीण’ परीक्षेचे वर्ग सोमवार, दि. १० ऑगस्ट १९७० पासून सुरू करण्यात आले. वर्गाचे उद्घाटन सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी केले. यावेळी परीक्षा–समितीचे संचालक श्री. ग. स. देशपांडे, श्री. र. गो. सहस्रबुद्धे व श्री. प्रभाकरराव पुराणिक आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री. र. गो. सहस्रबुद्धे, श्री. प्रभाकर चाफेकर आणि श्री. हरिहर येगावकर हे शिक्षक म्हणून सहकार्य देत आहेत.

कवी ‘बी’ स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे रविवार दि. ३० ऑगस्ट १९७० रोजी सायंकाळी ६–३० वाजता गडकरी सभागृहात सुप्रसिद्ध कवी कै. नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ कवी ‘बी’ यांचा स्मृतिदिन, श्री. आ. रा. देशपांडे ऊर्फ कवी ‘अनिल’ यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

अनुक्रमणिका

सुरुवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष प्रा. डॉ. मा. गो. देशमुख यांनी संस्थेला देणगीदाखल दिलेल्या कवी 'बी' यांच्या छायाचित्राचे अनावरण, श्री. आ. रा. देशपांडे यांनी केले.

कु. लोणकर यांनी कवी 'बीं'च्या दोन कविता या प्रसंगी गाऊन दाखविल्या. नागपुरातील संगीत शिक्षक श्री. भय्याजी वझलवार यांनी पेटीची साथ केली.

प्रमुख वक्ते प्राचार्य या. मु. पाठक यांनी आपल्या भाषणात कवी 'बीं'च्या काव्याची महती विषद केली.

श्री. आ. रा. देशपांडे यांचे समारोपाचे भाषण झाल्यावर सांस्कृतिक समितीचे आमंत्रक श्री. वासुदेवराव घोरघडे यांनी सर्वांचे आभार मानले.

श्री. मनोहरभाई पटेल यांच्या निधनाबद्दल दुखवटा

ता. १७ ऑगस्ट १९७० रोजी श्री. मनोहरभाई पटेल यांचे मुंबई येथे अचानक देहावसान झाल्याची दुःखद बातमी कळल्याबरोबर विदर्भ साहित्य संघाचे कार्यालय बंद ठेवण्यात आले व सायंकाळी कार्यकर्त्यांची सभा होऊन पुढील ठराव करण्यात आला —

"गोंदियाचे दानशूर उद्योगपती आणि विदर्भ साहित्य संघाचे एक आधारस्तंभ श्री. मनोहरभाई पटेल यांच्या निधनाबद्दल विदर्भ साहित्य संघाला अत्यंत दुःख होत आहे. विदर्भ आणि महाराष्ट्र राज्य यांची जी सेवा त्यांनी गेली ३० वर्षे केली, आपल्या दातृत्वाचा जो लाभ त्यांनी अनेक सांस्कृतिक संस्थांना दिला आणि विदर्भ साहित्य संघाच्या गेल्या २० वर्षांतील विकासाला जो हातभार त्यांनी लावला, त्याबद्दल विदर्भ आणि महाराष्ट्र दोन्ही त्यांच्या स्मृतीला सदैव कृतज्ञ राहतील. त्यांच्या निधनाने विदर्भ साहित्य संघ आणि गोंदिया येथील शाखा यांची तर अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखशोकात विदर्भ साहित्य संघ सहभागी आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला सद्गती देवो."

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती

केंद्राधिकारी व परीक्षार्थींना सूचना

प्रस्तुत पत्रकाद्वारे आपणास विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा आणि वाङ्मयाच्या परीक्षांविषयी पुढील माहिती कळविण्यात येत आहे.

उद्देशः—मराठी भाषा आणि वाङ्मय या विषयाची गोडी वाढविण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील अ-मराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रचार करण्याकरिता अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र शासनाने पत्र क्र. १५६९–३३६७३ म. दि. २४ जुलै १९६९ च्या अन्वये अ-मराठी भाषिकांसाठी घेण्यात येणाऱ्या **मराठी प्रवीण** व **मराठी प्राज्ञ** ह्या नवीन परीक्षांना अनुक्रमे मराठी निम्नस्तर व मराठी उच्चस्तर परीक्षांच्या समकक्ष प रीक्षा म्हणून मान्यता दिली आहे.

फेब्रुवारी १९७० पासून परीक्षा समितीने अभ्यासक्रमात आवश्यक बदल केला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ आणि नागपूर विद्यापीठ यांच्या विद्यमाने होणाऱ्या सर्व परी ांशी मराठी विषयापुरता वि. सा. संघ परीक्षा समितीने नेमलेला अभ्यासक्रम शक्यतो समरूप व समकक्ष ठेवला आहे.

२. **सूचना आणि विनंती.**

आपण केंद्र उघडण्याची इच्छा दर्शविल्यास आपणाकडे अभ्यासक्रम पाठविण्यात यईल. तसेच अ-मराठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी आपण आपल्या दृष्टीने करावी, अशी अपेक्षा आहे.

३. आगामी ऑक्टोबर १९७० सत्राच्या **परीक्षा, शनिवार दिनांक, ३ आणि रविवार दिनांक ४ ऑक्टोबर १९७० ला घेण्यात येतील.**

४. नवीन केंद्र सुरू करण्यासाठी कमीत कमी २५ विद्यार्थी परीक्षेस बसविले तरच केंद्र मान्यता देईल असा समितीचा परिपाठ आहे. परीक्षार्थी आवेदनपत्र मूल्य २५ पैसे प्रमाणे केंद्रातच अवांतर खर्चासाठी राखून ठेवावे. केवळ परीक्षार्थ्यांचेच निर्धारित शुल्क केंद्रीय कार्यालयाकडे पाठवावे.

आपण आपल्या केंद्रातून **दिनांक १५ सप्टेंबर ७० पर्यंत परीक्षार्थी आवेदनपत्रे सशुल्क भरून घेऊन केंद्रीय कार्यालयाकडे दिनांक २० सप्टेंबर ७० चे आत पाठविण्याची दखल घ्यावी.** तदनंतर आलेली आवेदनपत्रे स्वीकृत करण्यात येणार नाहीत.

प्रत्येक सत्रात जास्तीत जास्त विद्यार्थी परीक्षेस बसवून आम्हास सहकार्य देऊन उपकृत करावे, ही विनंती.

आपला

ग. स. देशपांडे

संचालक

परीक्षा समिती, वि. सा. संघ.

दिनांक ३०–८–७०

विदर्भ साहित्य संघ

घटना दुरुस्तीसंबंधी निवेदन

विदर्भ साहित्य संघाच्या दि. २८ जुलै १९६८ च्या वार्षिक साधारण सभेत घटनादुरुस्ती समिती नेमण्याचा ठराव सर्वानुमते करण्यात आला; व त्या समितीवर सदस्य नेमण्याचा सर्वाधिकार अध्यक्षांना देण्यात आला.

तदनुसार संघाध्यक्ष या नात्याने मी न्या. मू. श्री. डी. वी. पाध्ये यांना घटनादुरुस्ती समितीचे अध्यक्षस्थान स्वीकारावे, अशी विनंती केली. तसेच आमंत्रक म्हणून सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांची नियुक्ती करून श्री. आ. रा. देशपांडे, रावसाहेब श्री. खं. के. रांगोळे, श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, आणि श्री. चंद्रशेखर माडखोलकर यांना सदस्य नेमले.

या समितीने घटनेत कोणकोणते बदल करणे अपरिहार्य आहे, याचे संशोधन करून घटनेचे प्रारूप दि. ११ जुलै १९७० रोजी संघाच्या स्वाधीन केले. या सर्व मंडळींनी जे अमोल सहकार्य दिले, त्याबद्दल मी संघातर्फे सर्वांचे आभार मानतो.

हे प्रारूप सर्व सभासदांच्या आगाऊ अवलोकनात यावे, म्हणून या अंकात मुद्दाम प्रसिद्ध करण्यात येत आहे.

घटना समितीने सुचविलेल्या घटनादुरुस्तीच्या ठरावावर विचार करण्यासाठी रविवार दि. १८ ऑक्टोबर १९७० रोजी दुपारी ४ वाजता विशेष साधारण सभा बोलविण्यात येत आहे. विशेष-साधारण सभेची सूचना याच अंकात अन्यत्र दिली आहे.

दि. १२–९–७०
नागपूर

ग. त्र्यं. माडखोलकर
अध्यक्ष, वि. सा. संघ.

घटना दुरुस्तीचे प्रारूप

१ नाव––विदर्भ साहित्य संघ.

२ कार्यक्षेत्र––विदर्भ साहित्य संघाचे कार्यक्षेत्र सर्वसाधारणपणे विदर्भ हे राहील.

३ उद्देश

कलम ३ च्या सध्याच्या उपकलम (अ) बद्दल पुढील उपकलम घालावे––

(अ) मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व कला यांच्या अभिवृद्धचर्थ प्रयत्न करणे;

(आ) जनतेची साहित्यविषयक सदभिरुची व साहित्याचे रसग्रहण करण्याची शक्ती, यांचा विकास घडवून आणण्यास सहाय्यभूत होणे.

४ साधने––वरील उद्देश साध्य होण्याकरिता पुढे निर्देशिलेल्या व इतर अवश्य आणि योग्य वाटतील त्या साधनांचा उपयोग करणे :–

(अ) दरवर्षी विदर्भ साहित्य संघाचे संमेलन भरविणे व शाखा-संमेलने भरविण्यास प्रोत्साहन देणे.

(आ) विदर्भात ठिकठिकाणी संघाच्या शाखा स्थापन करणे आणि स्वतं रीतीने कार्य करणाऱ्या साहित्यसंस्था आणि निर्माणक्षम कलांना प्रोत्साहन देणाऱ्या संस्था यांना संलग्न करून घणे.

(इ) मराठी आणि अन्य भाषांच्या साहित्य-संस्थांशी आणि साहित्यविषयक व कलाविषयक चळवळीशी अवश्य व शक्य असेल तेथे सहकार्य करणे.

(ई) साहित्य, व्याकरण, कोश, इतिहास, विज्ञान, समाजशास्त्र, कला इत्यादी विषयांवरील ग्रंथ लिहवून घेणे, प्रसिद्ध करणे, ग्रंथांचा पुरस्कार करणे व अशा प्रकारच्या कार्यास द्रव्यद्वारा अथवा अन्य रीतीने साहाय्य करणे.

(उ) ज्ञानाची सर्व साधने मराठी भाषिकांना सुलभ करून देण्याकरिता चर्चा, उत्सव, प्रदर्शन, नाट्य-प्रयोग आदी प्रसंग घडवून आणणे; नियतकालिक चालविणे, ग्रंथालय स्थापन करणे, संशोधनास मदत व उत्तेजन देणे, मराठी व अन्य भाषा शिकविण्याचे वर्ग चालविणे व परीक्षा घेणे, पाठ्यपुस्तके लिहून घेणे व प्रसिद्ध करणे; प्राचीन ग्रंथ, चित्रे, हस्तलिखिते, ताम्रपट, नाणी, मूर्ती इत्यादींचा संग्रह करणे.

(ऊ) मराठी भाषेसाठी शास्त्रीय विषयांची परिभाषा व पारिभाषिक कोश तयार करणे आणि अशा प्रयत्नांत सहकार्य करणे.

(ए) प्राचीन व अर्वाचीन मराठी व अन्य भाषांतील नामवंत लेखक, ग्रंथकार व कलावंत यांची चरित्रे, त्यांचे साहित्य आणि कला यांची माहिती मराठी वाचकांस उपलब्ध करून देणे.

(ऐ) प्रादेशिक लोकभाषांचे संशोधन करून त्यांच्याविषयीच्या ग्रंथांच्या प्रसिद्धीस साहाय्य करणे.

(ओ) मराठी भाषा आणि साहित्य यांच्या विकासाच्या आणि प्रसाराच्या मार्गातील अडचणी दूर करण्यासाठी अवश्य ती उपाययोजना करणे, तसेच मराठी भाषा बोलणाऱ्या बहुजन समाजात अशा प्रश्नां-विषयी जागृती करणे.

(औ) संघासाठी कार्यालय, सभागृह इत्यादी इमारती उभारणे.

(अं) सामान्यतः संघाचे उद्देश साध्य होण्या-साठी अवश्य वाटतील त्या सर्व गोष्टी करणे.

५ **वर्षगणना**--संघाचे वर्ष दिनांक १ एप्रिल ते दिनांक ३१ मार्चपर्यंत गणले जाईल;

कलम ५ या कलमाचे शेवटी पुढील शब्द घालावे.

"व या घटनेत जेथे जेथे वर्षाबद्दल उल्लेख येईल तेथे तेथे, उल्लेखित विषय किंवा संदर्भ यात विरोध उत्पन्न होत नसेल तर, वर्ष शब्दाचा अर्थ या कलमानुरोधानेच करावा."

६ **कार्यालय**--संघाचे केंद्रीय कार्यालय नागपूर येथे राहील.

७ **सभासदांचे वर्ग**--संघाच्या सभासदांचे वर्ग पुढील प्रकारचे राहतील :--

(अ) **उपकर्ते**-संघास पाच हजार एक किंवा अधिक रकम देणारे.

(आ) **आश्रयदाते**-संघास एक हजार एक पासून पाच हजार एक पर्यंत रकम देणारे.

(इ) **साहाय्यक**-संघास पाचशे एक पासून एक हजारपर्यंत रकम देणारे.

(ई) **हितचिंतक**-संघास दोनशेएकावन्न पासून पाचशे पर्यंत रकम देणारे.

(उ) **आजीव सभासद**-संघाला शंभर पासून दोनशे पन्नास पर्यंत रकम देणारे.

(ऊ) **साधारण सभासद** :— संघास वार्षिक पाच रुपये वर्गणी देणारे.

(ए) **प्रतिनिधी सभासद** :— नियमाप्रमाणे संलग्न संस्थांनी नेमलेले प्रतिनिधी.

(ऐ) **सन्मान्य सभासद** :— मराठी भाषेची विशेष सेवा अथवा विद्वत्ता या गुणांसाठी कोणाही व्यक्तीस संघाचे सन्मान्य सभासद करून घेण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

वर्ग ऐ नंतर खालील मजकूर घालावा :

१. वरील (अ) ते (उ) वर्गाच्या सभासदत्वाची रकम एकमुस्त अथवा कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या अवधीत दिली गेली पाहिजे. अशी रकम नगदी अथवा कार्यकारी मंडळाने मान्य केलेल्या इतर रूपात देता येईल. इतर रूपात देण्यात येणाऱ्या मालाची किंमत कार्यकारी मंडळ ठरवील तीच राहील व त्या संबंधात कोणासही उजर करता येणार

नाही. ज्या सभासदाला आपली रकम विशेष कार्यासाठी द्यावयाची असेल त्याला तसे नमूद करता येईल.

२. (आ) ते (उ) या वर्गातील कोणत्याही सभासदास वरच्या वर्गाचे सभासदत्व घेण्याची इच्छा झाल्यास ह्याला, आधी दिलेली रकम व वरील वर्गाकरिता द्यावी लागणारी किमान रकम यातील फरकाइतकी रकम, कार्यकारी मंडळाला देऊन वरच्या वर्गाचे सभासदत्व मिळविता येईल.

कलम ८

(१) : कलम ८ (१) बद्दल पुढील कलम घालण्यात यावे :—

१. वयाची २१ वर्षे पूर्ण झालेली कोणीही मराठीप्रेमी व्यक्ती, (यात संस्था समाविष्ट नाही) तिला संघाचे उद्देश, घटना व चालू नियम मान्य असल्यास, सभासदत्वास पात्र राहील;

परंतु (१) या कलमातील उपबंधाने एखाद्या संस्थेने कलम ७ च्या (अ) ते (उ) या वर्गातील सभासदत्व दि. १८ ऑक्टोबर १९७० च्या पूर्वीच मिळविले असेल तर त्या सभासदत्वास बाधा होणार नाही; मात्र त्या संस्थेने दर वर्षी १५ एप्रिलपर्यंत संस्थेचे प्रतिनिधित्व करण्याकरिता आपला प्रतिनिधी सभासद संघाच्या कार्यालयात नोंदविला पाहिजे. अशी नोंद ज्या वर्षी होणार नाही त्या वर्षी त्या संस्थेला नवी नोंद होईपावेतो प्रतिनिधित्व मिळविता येणार नाही.

२. कलम ७ च्या (ऊ) वर्गाचे सभासदत्व जर एखाद्या संस्थेने दि. १८ ऑक्टोबर १९७० च्या पूर्वी प्राप्त करून घेतले असेल व ही संशोधने ज्या दिवशी पारित होतील त्या दिवशी ते प्रभावी असेल तर लगत पुढील ३१ मार्च रोजी ते सभासदत्व समाप्त होईल.

(२) सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने कार्यकारी मंडळाने निर्दिष्ट केलेल्या पत्रावर स्वतः सही करून आवेदनपत्र भरून दिले पाहिजे. त्या आवेदनपत्रावर संघाच्या मतदानाला पात्र अशा सभासदाची प्रस्तावक म्हणून व दुसऱ्या तशाच सभासदाची अनुमोदक म्हणून सही असली पाहिजे. आवेदनासह नियमानुसार त्या विशिष्ट सभासदत्वाची वर्गणी पाठविली पाहिजे. आवेदनपत्र आणि वर्गणी संघाचे केंद्रीय कार्यालयात दिली पाहिजे व त्याची पोच कार्यालयाने दिली पाहिजे.

(३) सभासदत्वासाठी आलेली सर्व आवेदनपत्रे सरचिटणिसाने, कार्यकारी मंडळाच्या, त्यानंतर होणाऱ्या पुढल्या सभेत प्रस्तुत केली पाहिजेत. आवेदनपत्राला कार्यकारी मंडळाची मंजूरी दिली गेल्यानंतर आवेदनपत्र ज्या तारखेस दिले गेले असेल त्या तारखेपासून व पुढील नियमांप्रमाणे सभासदत्व रद्द होईपावेतो ती व्यक्ती सभासद मानली जाईल.

सध्याच्या कलम ८ (३) च्या शेवटी पुढील वाक्य जोडण्यात यावे :—

परंतु (अ) ते (उ) वर्गाच्या कोणत्याही सभासदाला त्याच्याकडून यावयाची रकम पूर्ण भरली जाईपावेतो त्या त्या वर्गाचे सभासदत्व प्राप्त होणार नाही.

(४) सभासदास आपल्या सहीनिशी पत्र लिहून सभासदत्वाचा राजिनामा देता येईल. राजिनाम्याचे पत्र ज्या दिवशी केंद्रीय कार्यालयात पोचेल त्या दिवसापासून त्या सभासदाचे सभासदत्व रद्द समजण्यात येईल.

कलम ८, क्र. ५—सध्याच्या परिच्छेदाऐवजी पुढील परिच्छेद घालणे — ' कोणत्याही वर्षाची पूर्ण वर्गणी त्या वर्षीच्या ३० एप्रिलपर्यंत न दिली गेल्यास त्या सभासदाचे सभासदत्व स्थगित समजले जाईल व त्याच वर्षीच्या ३१ जुलैपर्यंत ती वर्गणी न आल्यास त्या सभासदाचे सभासदत्व आपोआप रद्द समजले जाईल. अशा सभासदत्व रद्द झालेल्यास घटना कलम ८ (२) प्रमाणे पुन्हा नवीन सभासद होता येईल.

९ सभासदांचे अधिकार व कर्तव्ये :—

(अ) संघाच्या [७] (अ) ते (ए) वर्गाच्या कोणाही सभासदास संघाच्या साधारण सभांस हजर राहण्याचा, चर्चेत भाग घेण्याचा, ठराव मांडण्याचा व मत देण्याचा अधिकार राहील. तसेच हिशेब व कागदपत्र, कार्यकारी मंडळाने केलेल्या नियमांनुसार, पाहण्याचा अधिकार व सभासदत्वाचे इतर सर्व प्रकारचे अंगभूत अधिकार राहतील.

(आ) वर्ग [७] (ऐ)–सन्मान्य सभासद–यांस संघाच्या सर्वसाधारण सभांना व संमेलनांना उपस्थित राहण्याचा आणि चर्चेत भाग घेण्याचा अधिकार राहील.

(इ) सभासद होऊन बारा महिने न झालेल्या नव्या सभासदास मताधिकार राहणार नाही.

(ई) स्थगित सभासदास वर्गणी भरेपर्यंत सदस्यत्वाचे कोणतेही अधिकार राहाणार नाहीत.

१०. साधारण सभा

कलम १० उपकलम (अ) ऐवजी पुढील उपकलम घालण्यात यावे: —

(अ) संघाची वार्षिक साधारण सभा जुलै ३१ च्या आत भरवावी. या सभेत करावयाच्या कामकाजात पुढील कामांचा समावेश असला पाहिजे:-

१. मागील वार्षिक साधारण सभेचा व इतर साधारण सभा झाल्या असल्यास त्यांचा अहवाल;
२. गतवर्षाचे कार्यवृत्त;
३. हिशेब–तपासनीसाकडून तपासून घेतलेले हिशेब;
४. पुढील वर्षाचे अंदाजपत्रक; व
५. अधिकृत (चार्टर्ड) हिशेब तपासनीसाची नेमणूक.

(आ) संमेलनाचे वेळी आणि जरूर लागेल तेव्हा अध्यक्षाने किंवा कार्यकारी मंडळाने संघाची साधारण सभा भरवावी.

(ई) साधारण सभेची गणपूर्ती ५० किंवा एकूण मतदार सभासदसंख्येच्या एक अष्टमांश यांपैकी जी कमी असेल ती राहील.

गणपूर्तीच्या अभावी तहकूब झालेली सर्वसाधारण सभा, त्या सभेच्या सूचनापत्रिकेत तशी पूर्वसूचना दिली असल्यास, पहिल्या सभेच्या जागीच त्या सभेच्या वेळेनंतर अर्ध्या तासाने भरविता येईल. स्थगित सभेस गणपूर्तीचा निर्बंध राहणार नाही. मात्र या सभेत कार्यक्रम–पत्रिकेत असलेल्या विषयांबाहेरचे प्रश्न विचारात घेता येणार नाहीत.

सध्याच्या उपकलम (ई) बद्दल पुढील उपकलम घालण्यात यावे—

(ई) "संघाच्या कोणत्याही साधारण सभेची सूचना सभेच्या दिवसापूर्वी कमीत कमी पंधरा दिवस अगोदर दिली गेली पाहिजे. युगवाणीत किंवा विदर्भाच्या कोणत्याही दोन वर्तमानपत्रांत साधारण सभेची सूचना सभेच्या दिवसापूर्वी कमीत कमी पंधरा दिवस अगोदर प्रसिद्ध केली गेली असता साधारण सभेची सूचना सभासदांना दिली गेली असे मानले जाईल व वैयक्तिक सूचना दिली गेली नाही म्हणून सभा अवैध होणार नाही."

(उ) संघाच्या साधारण सभेत मांडावयाचे ठराव अगर सूचना यांची लेखी पूर्वसूचना सभासदाने सभेपूर्वी चार दिवस अगोदर कार्यालयाकडे दिली पाहिजे.

सध्याच्या उपकलम (उ) च्या शेवटी पुढील वाक्य जोडण्यात यावे—

"परंतु या कलमाच्या उपकलम (अ) मध्ये उल्लेखिलेल्या बाबींतून उद्‌भवणारा ठराव अगर उद्‌भवणारी सूचना यांना अशी पूर्वसूचना लागणार नाही. ठराव किंवा सूचना उल्लेखिलेल्या बाबीतून उद्‌भवते अथवा नाही यावर सभेच्या अध्यक्षाचा निर्णय निर्णायक व अंतिम राहील."

(ऊ) **मागणी सभा**--मताधिकार असलेल्या सभासदसंख्येचा एक अष्टमांश किंवा पन्नास यांपैकी कमी असेल त्या संख्येइतक्या सभासदांनी लेखी मागणी केल्यास, मागणीपत्र पोचल्यापासून दोन महिन्यांच्या आत संघाची विशेष साधारण सभा अध्यक्ष किंवा सरचिटणीस याने बोलाविली पाहिजे. अशा सभेत मागणीपत्रात नमूद केलेल्या विषयाखेरीज अन्य विषयाचा विचार करता येणार नाही.

अशी सभा न बोलाविली गेल्यास मागणी करणारांस विदर्भातील दोन प्रमुख मराठी वृत्तपत्रात जाहीर करून ही सभा बोलाविता येईल.

या विशेष सभेस गणपूर्ती नसल्यास ती सभा रद्द होईल.

(ए) जेथे विशिष्ट बहुमताचा उल्लेख केलेला नाही तेथे सर्व निर्णय साध्या बहुमताने घेण्यात येतील.

११ कार्यकारी मंडळ

(अ) मतदार सभासदांनी निवडलेला एक अध्यक्ष व १६ सभासद आणि निवडून आलेल्या अध्यक्षाने उमेदवार होण्याची पात्रता असलेल्या सभासदांतून नियुक्त केलेले दोन सभासद अशा एकूण १९ सभासदांचे कार्यकारी मंडळ राहील.

(आ) हे कार्यकारी मंडळ आपल्यातून अध्यक्षाखेरीज खालील पदाधिकारी निवडील--

१. उपाध्यक्ष	२
२. सरचिटणीस	१
३. चिटणीस	३
४. कोषाध्यक्ष	१
५. संपादक 'युगवाणी'	१
६. संचालक परीक्षा-समिती	१
एकूण	९

१२. निवडणुकीबाबत संशोधनाचे प्रारूप

नियम १२ करिता पुढील नियम घालण्यात यावे :--

१२ (अ) संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकी दर तीन वर्षांनी या कलमांतील नियमानुसार बॅलट पद्धतीने दिनांक १५ मार्च पूर्वी पूर्ण करण्यात येतील.

(आ) अध्यक्षाची निवडणूक व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची निवडणूक या वैधतेच्या दृष्टीने दोन वेगवेगळ्या निवडणुकी मानल्या जातील; परंतु या कारणास्तव दोन्ही निवडणुकींना सामान्य असणारी सर्व कार्यवाही एकत्र करण्याला बाधा राहणार नाही व कोणच्याही निवडणुकीला अशा एकत्र केलेल्या कार्यवाहीमुळे अवैधता प्राप्त होणार नाही.

(इ) कलम ५ च्या वर्षगणनेनुसार निवडणुकीच्या वर्षी दिनांक १५ आक्टोबरपर्यंत ज्या सभासदांच्या सभासदत्वाला अठरा महिने पूर्ण झाले असतील अशाच सभासदांना मतदानाचा व अध्यक्षपदाकरिता व कार्यकारी मंडळाच्या सदस्यत्वाकरिता उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार राहील.

(ई) निवडणुकीच्या वर्षी मताधिकार प्राप्त असलेल्या सभासदांची संपूर्ण सूची केंद्रीय कार्यालयात दिनांक २ डिसेंबरपर्यंत सरचिटणीस प्रसिद्ध करतील; व त्याच दिवशी प्रत्येक शाखेच्या मतदारांच्या सूचीचा भाग त्या त्या शाखेच्या सरचिटणीसाकडे शाखा कार्यालयात प्रसिद्धीकरिता पाठवितील.

(उ) ज्या कोणा सभासदाला सूचीतील कोणत्याही नावाबद्दल अथवा कोणाचे नाव गळले अशी तक्रार असेल तर त्याने ती दिनांक १५ डिसेंबर पावेतो अध्यक्षाकडे लेखी पोचेल अशी व्यवस्था केली पाहिजे. दिनांक १५ डिसेंबरनंतर जरी एखादी लेखी तक्रार उशीर होण्याच्या कारणासकट आली व अध्यक्षांना ते कारण पटले तर अशा उशीरा आलेल्या तक्रारीचाही विचार करण्याचा अध्यक्षांना अधिकार राहील.

(ऊ) अध्यक्षाकडे या कलमाच्या उपकलम (उ) प्रमाणे पोहोचलेल्या सर्व तक्रारींचा विचार करून अध्यक्ष निर्णय देतील व त्या

निर्णयाप्रमाणे सरचिटणीस मतदारांच्या सूचीत संशोधन करतील.

(ए) संशोधित मतदारांची सूची सरचिटणीस ३ जानेवारीला केंद्रीय कार्यालयात व युगवाणीच्या जानेवारी महिन्याच्या अंकात प्रसिद्ध करतील; अशी प्रसिद्ध झालेली सूची निर्णायक व अंतिम राहील. या सूचीतून गळलेल्या कोणाही सभासदाला मतदानाचा अधिकार राहणार नाही व या सूचीत समाविष्ट असलेल्या कोणाही मतदाराच्या मतदानाच्या हक्काबाबत या निवडणुकीच्या वैधतेवर आक्षेप घेण्याचा कोणासही अधिकार राहणार नाही. परंतु टंक करण्याच्या चुकीमुळे किंवा मुद्रणदोषामुळे सूचीत दोष आढळला तर तो अध्यक्षांच्या आदेशाने दुरुस्त करण्यात अवैधता येणार नाही. दर्शविलेला दोष टंक वा मुद्रणदोष आहे अथवा नाही यावर अध्यक्षांचा आदेश निर्णायक राहील.

(ऐ) अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकीसंबंधीची, मतदार सभासदांची सूची प्रसिद्ध करण्याचे कार्य वगळून, बाकी सर्व व्यवस्था व देखरेख करणे आणि आवश्यक आदेश देणे आदी कामे करण्याकरिता चालू निवडणुकीकरिता न उभा राहणारा व चालू कार्यकारी मंडळाचा सदस्य नसलेल्या अशा एका सभासदाची नियुक्ती कार्यकारी मंडळाने ३० नोव्हेंबरपर्यंत केली पाहिजे. हा अधिकारी निर्वाचनाधिकारी या नावाने संबोधिला जाईल. दोन्ही निवडणुकांची सर्व कार्यवाही या अधिकाऱ्याच्या आदेशाप्रमाणे होईल. मृत्यु, आजारीपणा, राजीनामा, किंवा अपरिहार्य अनुपस्थिती अशा कोणत्याही कारणाकरिता जर नियुक्त निर्वाचनाधिकाऱ्यांच्या जागी दुसरी नियुक्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास अध्यक्षाला या नियमाप्रमाणे योग्य अशा दुसऱ्या कोणत्याही सभासदाची निर्वाचनाधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार राहील.

(ओ) निर्वाचनाधिकाऱ्यास आपल्या मदतीकरिता त्याच्या मते आवश्यक तेवढे सभासद नेमण्याचा अधिकार राहील. परंतु त्यापैकी कोणीही निवडणुकीत उमेदवार किंवा चालू कार्यकारी मंडळाचा सदस्य नसला पाहिजे. अशा नेमलेल्या सभासदाला उपनिर्वाचनाधिकारी ' या नावाने संबोधिले जाईल. उपनिर्वाचनाधिकाऱ्याला निर्वाचनाधिकाऱ्याने लेखी आदेशाने दिलेली कामे करण्याचा अधिकार राहील, व अशा केल्या गेलेल्या कामांबाबत ती निर्वाचनाधिकाऱ्याने केली नाहीत हा आक्षेप अवैध राहील.

(औ) निवडणुकीबाबतच्या तक्रारींचा विचार करून निकाल देण्यासाठी साधारण सभेत एक लवाद निवडला पाहिजे. असा लवाद हा त्या निवडणुकीत उभा राहणारा उमेदवार किंवा चालू कार्यकारी मंडळाचा सभासद नसला पाहिजे. जर नियुक्त झालेला लवाद त्याच्यावर सोपविलेली कार्यवाही करण्यास मृत्यु, राजीनामा, आजारीपणा, अनुपस्थिती अशा कोणत्याही अथवा दुसऱ्या कोणत्याही अन्य कारणांमुळे असमर्थ झाला, तर चालू अध्यक्षाला लेखी आदेशाने त्याच्या जागी या उपकलमाप्रमाणे योग्य अशा कोणत्याही दुसऱ्या सभासदाला लवाद म्हणून नेमण्याचा अधिकार राहील; मात्र नेमताना तो—

१. या कलमाचे उपकलम (ङ) प्रमाणे होणारी तक्रार ऐकण्याकरिता किंवा

२. अधिसूचनेतील क्रमांक ८ ते १२ शी संबंधित असलेली तक्रार ऐकण्याकरिता किंवा

३. दोन्ही प्रकारच्या तक्रारी ऐकण्याकरिता नेमला जात आहे हे अध्यक्षांनी स्पष्ट केले पाहिजे. अध्यक्षांचा आदेश केंद्रीय कार्यालयाच्या सूचनाफलकावर लावून प्रसिद्ध केला पाहिजे.

(अं) निर्वाचनाधिकाऱ्याने खाली दर्शविल्याप्रमाणे दोन्ही निवडणुकांच्या कार्यक्रमाच्या निरनिराळ्या तारखा व आवश्यक तेथे जागा व वेळ ठरवून त्यांना युगवाणीच्या जानेवारी महिन्याच्या अंकात एका अधिसूचनेद्वारा प्रसिद्धी दिली पाहिजे. ज्या कार्याच्या तारखा इ. ठरवावयाच्या त्या पुढीलप्रमाणे.

	अंतिम तारीख	अंतिम वेळ	जागा
१. नामनिर्देशन पत्रांच्या छाननीकरिता			
२. छाननीनंतर स्वीकृत झालेल्या नामनिर्देशन पत्रांच्या यादीच्या प्रसिद्धीकरिता			
३. नामनिर्देशन पत्राच्या स्वीकृती किंवा अस्वीकृतीबाबत लवादाकडे तक्रार अर्ज करण्याकरिता			
४. लवादासमोर पहिल्या सुनावणीकरिता नेमलेली तारीख			
५. तक्रारीच्या अंतिम निकालाकरिता			
६. नामनिर्देशन परत घेण्याकरिता			
७. उमेदवारी परत न घेतल्या गेलेल्या व ज्यांची उमेदवारी वैध आहे अशा उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याकरिता			
८. मतपत्रिका केंद्रीय कार्यालयातून पाठविण्याकरिता			
९. मतपत्रिका केंद्रीय कार्यालयात येऊन पोचण्याकरिता			
१०. मतपत्रिकांची मोजणी करण्याकरिता			
११. निवडणुकीच्या निकाल प्रसिद्धीकरिता			
१२. या कलमाच्या उपकलम उ प्रमाणे तक्रारअर्ज आल्यास पहिल्या सुनावणीची तारीख			

(अः) मतदारांच्या सूचीत नाव असलेल्या कोणत्याही मतदारास त्याच सूचीत नाव असलेल्या परंतु कलम ७ प्रमाणे सभासदत्व प्रभावी राहिलेल्या संस्थेचा अथवा संलग्न संस्थेचा प्रतिनिधी सभासद नसलेल्या दुसऱ्या कोणत्याही मतदारास परिशिष्टात दिलेल्या नमुन्याप्रमाणे नामनिर्देशन पत्र भरून उमेदवार म्हणून उभे करता येईल. नामनिर्देशन पत्र परिशिष्टातील नमुन्याप्रमाणे असले पाहिजे, सूचकाचे नाव व उमेदवाराचे नाव सूचीत दिल्याप्रमाणे असले पाहिजे, व सूचकाची व उमेदवाराची स्वाक्षरी नामनिर्देशन पत्रात योग्य जागी असली पाहिजे, नाननिर्देशन पत्र सूचकाने किंवा उमेदवाराने अधिसूचनेत दिलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत केंद्रीय कार्यालयात निर्वाचनाधिकाऱ्याकडे पोचते केले पाहिजे. नामनिर्देशन पत्र जर पोष्टाने पोचते करणे असेल तर ते रजिस्टर्ड पोस्ट ॲकनॉलेजमेंट ड्यू पद्धतीनेच पोहोचते केले पाहिजे.

अशा तऱ्हेने पोचते झालेले नामनिर्देशन पत्र जर त्याकरिता नेमलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत निर्वाचनाधिकाऱ्यास मिळाले असेल तरच ते छाननीत घेतले जाईल.

(क) नामनिर्देशन पत्र व्यक्तीच्या हस्ते निर्वाचनाधिकाऱ्यास पोचते केले गेले असेल तर निर्वाचनाधिकाऱ्याने पत्र पोचते करणाऱ्या व्यक्तीस पत्र पोचण्याची तारीख व वेळ दर्शविणारी पावती दिली पाहिजे. जर नामनिर्देशन पत्र पोष्टाने पोचते केले गेले असेल तर ॲक्नॉलेजमेंट ड्यूवर पोचण्याची तारीख व वेळ टाकली पाहिजे.

(ख) नामनिर्देनपत्रांची छाननी करण्याकरिता अधिसूचनेत उल्लेखिलेल्या तारखेस उल्लेखिलेल्या जागी व वेळी निर्वाचनाधिकाऱ्याने अंतिम तारीख व वेळेपर्यंत आलेल्या सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी करून त्यांपैकी जे नामनिर्देशन पत्र त्याच्या मते स्वीकृतीला अयोग्य असेल त्यावर 'अस्वीकृत' अशा शेरा व अस्वीकृतीची कारणे लिहिली पाहिजेत. स्वीकृत नामनिर्देशन पत्रावर 'स्वीकृत' शेरा लिहिला पाहिजे.

(ग) छाननीच्या वेळी प्रस्तावित उमेदवार व त्याचा सूचक किंवा लेखी पत्राने नेमलेला प्रतिनिधी यांना हजर राहण्याचा व कोणत्याही नामनिर्देशन पत्राबावत आक्षेप घेण्याचा किंवा एखाद्या नामनिर्देशन पत्रावर घेतलेल्या आक्षेपाला उत्तर देण्याचा अधिकार राहील.

(घ) दोन्ही निवडणुकींकरिता आलेल्या सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी आटोपल्यानंतर निर्वाचनाधिकाऱ्याने स्वीकृत आणि अस्वीकृत केलेल्या नामनिर्देशन पत्रांची यादी केंद्रीय कार्यालयात छाननी आटोपल्यादिवशी प्रसिद्ध केली पाहिजे.

(ङ) कोणाही मतदाराची कोणत्याही नामनिर्देशन पत्राच्या स्वीकृती किंवा अस्वीकृतीबद्दल तक्रार असेल तर त्याने उपनियम (घ) प्रमाणे यादी प्रसिद्ध झाल्याबरोबर उपनियम (ओ) प्रमाणे नियुक्त झालेल्या लवादाकडे तक्रारीचे मुद्दे, त्याबावतीतील पुराव्याच्या उल्लेखासकट लेखी तक्रार सर्वही कागदपत्रांच्या दोन अतिरिक्त प्रतीसकट प्रस्तुत केली पाहिजे. अशी तक्रार अधिसूचनेत या कार्याकरिता नियुक्त केलेल्या अंतिम तारीख व वेळेपर्यंत जर केली गेली नाही तर कोणत्याही नामनिर्देशन पत्राच्या स्वीकृती किंवा अस्वीकृतीच्या वैधावैधतेसंबंधी तक्रार त्यानंतर केव्हाही वैध राहणार नाही; व स्वीकृत नामनिर्देशन पत्रांच्या उमेदवारातून होणारी अध्यक्षाची किंवा कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची निवड नामनिर्देशन पत्राच्या दोषास्तव अवैध ठरणार नाही. आलेल्या तक्रार-अर्जाची एक प्रत लवादाने निर्वाचनाधिकाऱ्यास दिली पाहिजे व दुसरी केंद्रीय कार्यालयाच्या सूचनाफलकावर लावली पाहिजे. अशी प्रत लावली गेली म्हणजे सर्वही संबंधित व्यक्तींना त्याची सूचना दिली गेली असे मानले जाईल.

(च) उपनियम (ङ) प्रमाणे तक्रार अर्ज प्रस्तुत केला गेल्याबरोबर तक्रार-अर्ज प्रस्तुत करणाऱ्यास अर्जाची पोच व अधिसूचनेत उल्लेखिलेल्या पहिल्या सुनावणीच्या तारखेस हजर राहण्याची सूचना लवादाने दिली पाहिजे; व अशा आलेल्या सर्व अर्जांचा लवादाने तक्रार करणाऱ्या मतदाराचे, निर्वाचनाधिकाऱ्याचे व उपस्थित असणाऱ्या सर्व संबंधित उमेदवारांचे म्हणणे ऐकून घेऊन अधिसूचनेत नेमलेल्या संबंधित तारखेपर्यंत निकाल लाविला पाहिजे. लवादाने लाविलेला निकाल दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील व तो निकाल अंतिम आणि निर्णायक राहील.

(छ) कोणाही उमेदवारास आपली उमेदवारी अधिसूचनेत उल्लेखिलेल्या संबंधित तारीख व वेळेपर्यंत परिशिष्टात दिलेल्या नमुन्याप्रमाणे आवेदन पत्र देऊन केव्हाही परत घेता येईल. हे आवेदन पत्र उमेदवाराने किंवा त्याच्या सूचकाने निर्वाचनाधिकाऱ्यासमोर प्रस्तुत केले पाहिजे. तसे न झाल्यास उमेदवारी परत घेतली गेली असे मानले जाणार नाही. एकदा उमेदवारी परत घेतली म्हणजे मग पुन्हा त्या मतदाराला त्या निवडणुकीत उमेदवार राहता येणार नाही.

(ज) उमेदवारी परत घेण्याकरिता नेमलेल्या अंतिम तारीख व वेळेनंतर निर्वाचनाधिकाऱ्याने ज्या उमेदवाराने आपली उमेदवारी परत घेतली अशा प्रत्येक उमेदवाराचे नाव वगळून व त्याचप्रमाणे जर लवादाने दिलेल्या कोणत्याही निकालामुळे उमेदवारांच्या यादीत फरक पडत असेल तर तो भरून निवडणुकीत भाग घेणाऱ्या उमेदवारांची पक्की यादी संबंधित तारखेस प्रसिद्ध केली पाहिजे. अशी यादी प्रसिद्ध करताना, ती वर्णक्रमानुसार प्रथम आडनाव असल्यास व नंतर उमेदवाराचे व वडिलाचे नाव अशी असावी.

(झ) अधिसूचनेतील क्रमांक १० करिता नेमलेल्या अंतिम तारखेच्या निदान पंधरा दिवसापूर्वी निर्वाचनाधिकाऱ्याने प्रत्येक मतदाराकडे मतपत्रिका, मत देण्याच्या प्रक्रियेचे निर्देश, मतपत्रिका परत करण्याकरिता पाकीट इ. सर्व कागद एका पाकिटात पाठविले पाहिजेत. ही पाकिटे पोस्टात टाकल्याची सर्टिफिकेट त्याने दप्तरी जतन केली पाहिजे. कोणाही मतदाराला मतपत्रिका पाठविल्याबद्दल पोस्टातून मिळालेल्या सार्टिफिकिटात जी तारीख नोंदली गेली असेल त्या तारखेस मतपत्रिका पाठविली गेली असे मानले जाईल व त्यासंबंधाने इतर कोणताही आक्षेप मानला जाणार नाही. एखाद्या उमेदवाराला नियमप्रमाणे मतपत्रिका पाठविली गेली परंतु पोचली नाही तर त्याबद्दल निर्वाचनाधिकारी जबाबदार राहणार नाही व मतपत्रिका पोचली नाही या कारणास्तव निवडणुकीवर कोणचाही आक्षेप घेण्याचा कोणास अधिकार राहणार नाही. जर एखाद्या मतदाराने आपणास मतपत्रिका मिळाली नाही असे निर्वाचनाधिकाऱ्याच्या नजरेस आणून अधिसूचना क्रमांक १० मधील अंतिम तारखेपूर्वी मतपत्रिकेची लेखी मागणी केली तर निर्वाचनाधिकाऱ्याने त्याला मतपत्रिका दिली पाहिजे. तसेच एखाद्या मतदाराची मतपत्रिका कोणत्याही कारणास्तव खराब झाली आणि त्याने त्याला पाठविलेली मतपत्रिका जर निर्वाचनाधिकाऱ्यास योग्य वेळेपर्यंत परत करून दुसऱ्या मतपत्रिकेची लेखी मागणी केली तर निर्वाचनाधिकाऱ्याने दुसरी मतपत्रिका पुरवली पाहिजे.

(ञ) मतमोजणी ज्या ठिकाणी होणार त्या जागी निर्वाचनाधिकारी, त्याने दिलेल्या आदेशाप्रमाणे आवश्यक उपनिर्वाचनाधिकारी व मोजणीकरिता निर्वाचनाधिकाऱ्यास आवश्यक वाटतील तेवढे गणक यापैकी कोणीही उमेदवार किंवा कार्यकारी मंडळाचा सभासद नसला पाहिजे व प्रत्येक उमेदवार किंवा हजर राहू न शकणाऱ्या उमेदवाराचा लेखाने नेमलेला एक प्रतिनिधी इतक्याच मंडळींना तेथे उपस्थित राहण्याचा अधिकार राहील.

(ट) मतमोजणी संपविल्यानंतर एखाद्या उमेदवाराने मतपत्रिकांच्या विशिष्ट भागाची अथवा संपूर्ण मतांची फेरमोजणी करण्याची लेखी आवेदनपत्राने कारणे देवून मागणी केली तर निर्वाचनाधिकाऱ्याने आवेदनपत्रात दिलेल्या कारणाने निवडणुकीच्या निकालात

कितपत फरक पडेल या व तत्सम गोष्टींचा विचार करून फेरमोजणीबाबत आपला निर्णय लेखी जाहीर केला पाहिजे. फेरमोजणी मंजूर केली असल्यास तत्काळ फेरमोजणी केली पाहिजे.

(ठ) मोजणी व फेरमोजणी झाली असल्यास निवडून आलेल्या उमेदवारांची नावे निर्वाचनाधिकाऱ्याने केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर लावून जाहीर केली पाहिजेत. अध्यक्षपदासाठी किंवा कार्यकारिणीतील अखेरच्या जागेसाठी सारखी मते मिळालेल्या उमेदवारातून निवड करावयाची झाल्यास ती निवड निर्वाचनाधिकाऱ्याने चिठ्ठ्या टाकून केली पाहिजे.

(ड) निवडणुकीसंबंधात कोणाही मतदाराची अशी तक्रार असेल की मतपत्रिका मतदारांकडे पाठविणे, मतदान प्रक्रिया, मतमोजणी किंवा मतमोजणीचा निकाल जाहीर करणे यापैकी कोणत्याही किंवा सर्व बाबीत काही आक्षेपार्ह प्रकार घडला आहे व त्या प्रकारामुळे निवडणुकीच्या निकालात बदल होण्याइतका फरक पडला आहे किंवा फरक पडण्याचा संभव होता तर त्याने निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसाचे आत तक्रारीचे मुद्दे त्याच्या आधारासकट निवडणूक लवादाकडे लेखी तक्रार केली पाहिजे. तक्रार करणाऱ्या मतदाराने तक्रारीबरोबर सर्वही कागदपत्रांच्या दोन अतिरिक्त प्रतींसह तक्रार दाखल केली पाहिजे. तक्रारीचा विषय अधिसूचना क्रमांक ८ ते १२ मधील कार्यवाहीशीच संबंधित असला पाहिजे. तक्रार–अर्जाबरोबर आलेल्या दोन प्रतींपैकी एक प्रत लवादाने निर्वाचनाधिकाऱ्यास दिली पाहिजे व एक प्रत केंद्रीय कार्यालयाच्या सूचना–फलकावर लाविली पाहिजे. अशी प्रत लावल्यानंतर तक्रारीची सूचना सर्वही संबंधित व्यक्तींना मिळाली असे मानले जाईल. निवडणूक लवादाने अशा तक्रारीसंबंधी तक्रार करणाऱ्यांचे म्हणणे, निर्वाचनाधिकाऱ्यांचे उत्तर, उमेदवाराचे म्हणणे व लवादास इतर आवश्यक वाटणारी चौकशी करून आपला निर्णय तक्रार आल्यापासून पंधरा दिवसांचे आत जाहीर केला पाहिजे. लवादाने अपरिहार्य कारणास्तव मागणी केल्यास पंधरा दिवसाच्या मुदतीपेक्षा अधिक मुदत देण्याचा अधिकार चालू अध्यक्षास राहील. लवादाचा निर्णय अंतिम राहील. लवादाने दिलेल्या निर्णयाचा सारांश केंद्रीय कार्यालयाच्या सूचना फलकावर सूचना लावून लवादाने प्रसिद्ध केला पाहिजे व आपल्या निर्णयाची सही केलेली प्रत चालू अध्यक्षाकडे पाठविली पाहिजे. लवादाने जर कार्यकारी मंडळातील कोणाही सभासदाची निवड अवैध ठरविली असेल तर लवादाचा निर्णय, उपर्युक्त रीतीने केंद्रीय कार्यालयाच्या सूचनाफलकावर सूचना प्रसिद्ध झाल्याबरोबर अंमलात येईल व कार्यालय त्याची नोंद घेऊन संबंधित सभासदाला तसे कळवील. जर लवादाने निवडून आलेल्या अध्यक्षाची निवड अवैध ठरविली असेल तर लवादाचा निर्णय चालू अध्यक्षाला निर्णयाची प्रत मिळाल्यानंतर दोन दिवसांनी अंमलात येईल.

(ढ) लवादाच्या निकालामुळे एक अथवा अधिक जागांची फेरनिवडणूक अवश्य झाल्यास या कलमाचे यथोचित अवलंबन करून फेर निवडणूक करण्याची व्यवस्था केली पाहिजे. फेरनिवडणुकीची सूचना चालू अध्यक्षांनी एका वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली पाहिजे. व ती सूचना व या कलमाचे यथोचित अवलंबन करताना होणारा फेरफार एका आदेशाद्वारे प्रसृत करून तो आदेश केंद्रीय

कार्यालयाच्या सूचनाफलकावर लावून प्रसिद्ध केला पाहिजे. लवादाने जर दिनांक १ एप्रिलच्या पूर्वी निवडून आलेल्या अध्यक्षाची निवड अवैध ठरविली तर जुना अध्यक्ष पुन्हा नवीन अध्यक्षाची निवड होईपावेतो नवा अध्यक्ष म्हणून कार्य चालवील. जर उपर्युक्त निवड दिनांक १ एप्रिलनंतर अवैध ठरविली गेली तर कार्यकारी मंडळ ज्या उपाध्यक्षाला नियुक्त करील तो उपाध्यक्ष अध्यक्षाचे कार्य चालवील. निवडणुकीबाबत आलेल्या तक्रार–अर्जावरून लवादाच्या निर्णयामुळे जर निवडून आलेला अध्यक्ष व अकरा किंवा अधिक सभासदांची निवड अवैध ठरविली गेली तर जुना अध्यक्ष नवीन निवडणुकी होईपावेतो काम चालविण्यासाठी संघाच्या, स्वतःला योग्य वाटेल अशा, सभासदास दैनंदिन कार्य चालविण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्त करील. हा प्रशासक नवीन निवडणूक होऊन निवडून आलेले सभासद कार्यभार घेईपावेतो अधिकारारूढ राहील. प्रशासकाच्या अधिकारकालात त्याला या घटनेप्रमाणे अध्यक्षाला व कार्यकारी मंडळाला दिले गेलेले सर्वही अधिकार वापरता येतील. निवडणुकीच्या कलमात करावयाचे यथोचित फेरफार व निर्वाचनाधिकाऱ्याची नियुक्ती, लवादाची नियुक्ती इत्यादी सर्व कामे प्रशासक करील. फेरनिवडणुकीचा निकाल जाहीर होऊन आठ दिवसांच्या आत फेरनिवडणुकीत निवडून आलेल्या अध्यक्षाच्या निवडीबाबत जर तक्रार अर्ज लवादाकडे आला नसेल तर नवव्या दिवशी प्रशासकाचा कार्यकाल आपोआप संपेल व नवीन अध्यक्ष कार्य पाहू लागेल. जर फेरनिवडणुकीत निवडून आलेल्या अध्यक्षाच्या निवडीबाबत तक्रार अर्ज आला असेल तर त्या तक्रारअर्जावर लवादाचा निर्णय ज्या दिवशी प्रसिद्ध होईल त्या दिवशी फेरनिवडणूक वैध ठरविली गेली असल्यास प्रशासकाचा कार्यकाल संपेल. प्रशासकाच्या कार्यकालात ज्यांची निवड अवैध ठरविली गेली नाही असे निवडले गेलेले सभासद प्रशासकाचे सल्लागार मानले जातील.

(ण) अधिसूचनेत उल्लेखिलेल्या तारखांत, वेळेत किंवा जागेत निर्वाचनाधिकाऱ्याच्या मते अपरिहार्य कारणास्तव बदल करणे आवश्यक झाल्यास निर्वाचनाधिकाऱ्यास तसा बदल करण्याचा अधिकार राहील. अशा केलेल्या बदलाची सूचना निर्वाचनाधिकाऱ्याने केंद्रीय कार्यालयात सूचनाद्वारे प्रकाशित केली पाहिजे व त्या सूचनेची प्रसिद्धी नागपुरातून प्रकाशित होणाऱ्या एका मराठी दैनिकात केली पाहिजे.

(त) मतपत्रिका, त्यांच्या बरोबर पाठविण्याचे मजकूर, मतदाराची प्रक्रिया मतदारांनी मतपत्रिका पाठविण्याची प्रक्रिया, स्थानीय मतदारांनी कार्यालयात आणून दिलेल्या मतपत्रिका आल्याची तारीख, त्या ठेवण्याची व्यवस्था, पोस्टाने येणाऱ्या मतपत्रिकांची स्वीकृती, त्या पोचण्याची तारीख, वेळ, आलेल्या सर्व मतपत्रिका सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था, मतमोजणीच्या वेळी पाळण्याचे नियम व प्रक्रिया या सर्व बाबी आणि ज्या बाबींचा उल्लेख या घटनेत केला गेलेला नाही अशा कोणच्याही बाबींच्या बाबतीत निर्वाचनाधिकाऱ्यास आदेश देण्याचा अधिकार राहील व त्या आदेशांचे यथायोग्य पालन केले गेले असल्यास त्यांच्या पालनावर कोणच्याही प्रकारचा आक्षेप घेण्याचा कोणासही अधिकार राहणार नाही.

(थ) उपकलम (त) खेरीजकरून बाकी कोणच्याही उपनियमाने निर्वाचनाधिकाऱ्याने करावयाचे काम निर्वाचनाधिकाऱ्याच्या लेखी आदेशाप्रमाणे जर संबंधित उपनिर्वाचनाधिकाऱ्यानेच केले तर ते निर्वाचनाधिकाऱ्यानेच केले असे मानले जाईल व ह्यासंबंधी कोणाचाही आक्षेप वैध मानला जाणार नाही.

(द) निवडणुकीसंबंधीची उपकलमे व त्या आधी दिले गेलेले आदेश यांच्या पालनात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली परंतु त्या अनियमिततेमुळे निवडणुकीच्या निकालात कोणताही फरक पडला नाही, किंवा पडण्याचा संभव नव्हता अशी जर प्रत्यक्ष स्थिती असेल तर झालेल्या अनियमिततेमुळे केल्या गेलेल्या कोणत्याही कार्यवाहीला अवैधत्व प्राप्त होणार नाही व त्यावर आक्षेप घेण्याचा किंवा इतर कोणत्याही प्रकारची भरपाई मिळविण्याचा अधिकार कोणालाही प्राप्त होणार नाही.

१३ सभासदांची नियुक्ती

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर तीस मार्चपावेतो नवीन अध्यक्ष नव्या कार्यकारी मंडळावर दोन सभासद नियुक्त करील.

वाक्याचे शेवटी पुढील शब्द घालण्यात यावेत:--परंतु काही कारणाने या नियुक्तीस विलंब झाला तर शक्य तितक्या लवकर नियुक्ती केली पाहिजे. या दोन सभासदांची जागा मृत्यू, राजीनामा अथवा अन्य कोणत्याही कारणाने रिकामी झाल्यास ती भरण्याचा अधिकार अध्यक्षासच राहील व ती भरण्याबाबत कलम १४ (इ) चा उपबंध लागू राहणार नाही. मात्र अध्यक्षाच्या निवडीवर जर आक्षेप घेतला गेला असेल व ती अवैध ठरेल तर त्याने केलेली नियुक्ती अवैधता प्रभावी झाल्यादिवसापासून रद्द मानली जाईल व नवीन अध्यक्ष पुन्हा नियुक्ती करील.

कलम १४

सध्याच्या कलम १४ बद्दल पुढील कलम घालावे.

(अ) मावळते अध्यक्ष व मावळते कार्यकारी मंडळ यांची अधिकारमुदत दिनांक ३१ मार्चच्या शेवटी संपेल व नवीन अध्यक्ष व कार्यकारी मंडळ दिनांक १ एप्रिलला पदाधिष्ठित होतील.

(आ) मावळत्या अध्यक्ष व कार्यकारी मंडळास औपचारिकरीत्या पदाधिकार हस्तांतरित करण्यास संयुक्त बैठक बोलवावयाची असल्यास ती ३१ मार्चपर्यंत बोलाविली पाहिजे. तशी बैठक बोलावून हस्तांतर केले गेले अथवा घटनेनुसार हस्तांतर झाले तरी हस्तांतरापूर्वी जुने अध्यक्ष व जुन्या कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी यांनी आपआपल्या कार्याबाबत टिपणे तयार करून कार्यालय अधीक्षकास ती पुढील पदाधिकाऱ्यांना देण्याकरिता दिली पाहिजेत. या टिपणांत कोणकोणत्या गोष्टींचा उल्लेख असावा अथवा यासंबंधीचे नियम का. का. मं.ने करावे.

(इ) काहीही आकस्मिक कारण न उद्भवल्यास नवीन कार्यकारी मंडळाची पहिली बैठक दिनांक २ एप्रिलला भरेल व त्यात कलम ११ प्रमाणे पदाधिकारी निवडले जातील. दिनांक २ एप्रिलच्या सभेची सूचना नवीन कार्यकारी मंडळ व अध्यक्ष यांना पाठविण्याची जबाबदारी कार्यालय अधीक्षकाची राहील. काही आकस्मिक कारणामुळे नवीन सभा २ एप्रिलला होऊ शकत नसेल तर नवीन अध्यक्ष जी तारीख नेमील त्या तारखेस होईल.

(ई) कलम १२ च्या उपकलम (ढ) मध्ये केलेला उपबंध लागू नसेल तर या सभेत हजर राहण्याचा अधिकार असलेल्या व्यक्तीच्या निवडणुकीच्या विरुद्ध लवादासमोर अर्ज अनिर्णित आहे ही गोष्ट त्या व्यक्तीच्या उपस्थितीस, मताधिकारास अगर सभेच्या निर्णयास बाधक होणार नाही. लवादाच्या निर्णयामुळे ह्या सभेच्या वेळी ज्याची निवडणूक रद्द झाली असेल त्यांना ह्या सभेच्या कारवाईत भाग घेता येणार नाही. परंतु इतर सभासदांना, पुन्हा

निवडणूक होऊन ती जागा भरली जाण्याची वाट न पाहता, ह्या कलमानुसार पदाधिकारी निवडण्याचा व घटनेप्रमाणे इतर सर्व कार्य करण्याचा पूर्ण अधिकार राहील.

(उ) एक उपाध्यक्ष, सरचिटणीस, एक चिटणीस व कोषाध्यक्ष हे नागपूरचेच राहणारे असले पाहिजेत.

(ऊ) लवादाच्या निर्णयाव्यतिरिक्त कोणत्याही अन्य कारणाने अध्यक्षाची अगर कार्यकारी मंडळातील कोणतीही जागा रिकामी झाल्यास ती भरण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

१५ कार्यकारी मंडळाची कर्तव्ये व अधिकार

कार्यकारी मंडळ हेच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट अन्वये नेमावे लागणारे जनरल कौन्सिल समजले जाईल.

संघाची सर्व कामे कार्यकारी मंडळ करील व अध्यक्ष हा संघाचा कार्यप्रमुख राहील. अध्यक्षाच्या अनुपस्थितीत अध्यक्षाचे सर्व अधिकार अध्यक्षाने नामनिर्दिष्ट केलेल्या नागपूरच्या उपाध्यक्षास राहतील. कार्यकारी मंडळ मुख्यतः पुढील कामे करील--

(अ) संघाच्या नियमाप्रमाणे संमेलन भरविण्याची व्यवस्था करणे.

(आ) संघाचे नियतकालिक चालविणे.

(इ) मराठी भाषेचे अध्ययन, अध्यापन व परीक्षा यांची व्यवस्था करणे.

(ई) वार्षिक अहवाल, हिशेब व अंदाजपत्रक ही तयार करून सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवणे. हे हिशेब संघाच्या साधारण सभेने नियुक्त केलेल्या अधिकृत (चार्टर्ड) हिशेबतपासनिसाने तपासून दिलेले असले पाहिजेत.

(उ) संमेलनाने व साधारण सभेने केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे, आणि साधारण सभा नेमून देईल ती कामे पार पाडणे.

(ऊ) संघाच्या कार्याकरिता द्रव्यनिधी जमविणे; उपकर्ते, आश्रयदाते, सभासद इत्यादी मिळविणे आणि नियमांनुसार संघनिधीची व्यवस्था करणे.

(ए) संघाच्या नियमाप्रमाणे साधारण सभा भरविणे.

(ऐ) संघामार्फत होणाऱ्या प्रकाशनांची व्यवस्था करणे.

(ओ) "संघाचे उद्देश व घटना यास अनुसरून संघाच्या कार्यासंबंधी सूचना करणे, मार्गदर्शन करणे व जरूर तो अन्य उपक्रम करणे; विशिष्ट कामासाठी उपसमिती व शिष्टमंडळ नेमणे व त्यांना उचित निर्देश देणे."

(औ) शाखासभा स्थापणे व संलग्न संस्था नोंदविणे.

(अं) उपसमिती, शाखासभा इत्यादींच्या कामकाजाचे उपनियम ठरविणे.

(अः) संघाचे दप्तर सांभाळणे, संघाच्या आणि संघाकडे सोपविलेल्या मालमत्तेचे रक्षण करणे.

१६ द्रव्यनिधी व मालमत्ता

(अ) विदर्भ साहित्य संघाचा द्रव्यनिधी व मालमत्ता पुढीलप्रमाणे राहील :—

कायम निधी :— संघाच्या उत्पन्नातून व शिलकीतून कार्यकारी मंडळ कायमनिधी म्हणून ठेवील ती रकम.

हा निधी किमान दोन हजार रुपये राहील व तो विश्वस्ताच्या स्वाधीन राहील; आणि त्यात कार्यकारी मंडळाने वेळोवेळी भर घालावी. या निधीचे व्याज चालू निधीत जमा केले जाईल. या कायम निधीतून रकम खर्च करावयाची झाल्यास त्याला साधारण सभेची मंजुरी लागेल.

चालू निधी —

(१) कायम निधीत व विशेष निधीत समाविष्ट न होणाऱ्या सर्व वर्गण्या व देणग्या,

(२) संघाचे ग्रंथप्रकाशन व ग्रंथविक्री यांचे येणारे उत्पन्न,

(३) परीक्षांचे शुल्क,

(४) बँकांतील रकमांवर येणारे व्याज, आणि

(५) इतर सर्व उत्पन्न,

यांचा चालू निधीत समावेश होईल.

चालू निधीचा जमाखर्च ठेवण्यासंबंधीचे उपनियम हिशेबतपासनिसाच्या सूचनेनुसार कार्यकारी मंडळ बनवील.

विशेष निधी —

संघाला विशेष कार्यासाठी मिळालेल्या देणग्या व जमविण्यात आलेला निधी हा विशेष निधी होय; व तो त्याच विशेष कार्यासाठी खर्च करण्यात येईल. ही रकम अपरिहार्य कारणासाठी अन्य कामी खर्च करावयाची झाल्यास ती परत त्या खाती जमा करण्याचे बंधन कार्यकारी मंडळावर राहील.

(आ) संघाच्या विश्वस्ताकडे सोपविण्यात येणाऱ्या मालमत्तेव्यतिरिक्त सर्व मालमत्ता संघाचे मुख्य अधिकारी म्हणून संघाच्या अध्यक्षाच्या नावाने राहील; मात्र बँकेतील सर्व व्यवहार कोषाध्यक्षाच्या नावे खाते उघडून करण्यात येईल. अध्यक्षाच्या मागणीप्रमाणे अंदाजपत्रकास व कार्यकारी मंडळाच्या ठरावास धरून या निधीतून कोषाध्यक्ष रकमा देईल.

१७ विश्वस्तांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्ये

विश्वस्तांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्ये ही विश्वस्तपत्रात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

१८ संमेलन

(अ) विदर्भ साहित्य संघाचे संमेलन दरवर्षी होता होईतो डिसेंबर महिन्यात भरविण्याची जबाबदारी सर्वस्वी कार्यकारी मंडळावर आहे. कोणत्याही शाखासभेस अथवा संलग्नसंस्थेस कार्यकारी मंडळाच्या संमतीने हे संमेलन भरविता येईल.

(आ) संघाच्या सभासदांनाच संमेलनात ठराव आणण्याचा, भाषण करण्याचा व मत देण्याचा अधिकार राहील.

(इ) संमेलनापुढे मांडावयाच्या ठरावांची सूचना संमेलन भरावयाच्या तारखेपूर्वी १४ दिवस अगोदर सरचिटणिसाकडे पाठविली पाहिजे.

(ई) संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी कार्यकारी मंडळ तीन नावे सुचवील व ह्या तीन नावातून संमेलनाचे स्वागतमंडळ संमेलनाच्या अध्यक्षाची निवड करील. संमेलनाच्या अध्यक्षाचे अधिकार संमेलनापुरतेच मर्यादित राहतील.

(उ) विषय-नियामक-समिती पुढीलप्रमाणे राहील —

१. संघाध्यक्ष, स्वागताध्यक्ष व उपस्थित असलेले माजी संघाध्यक्ष,

२. चालू कार्यकारी मंडळाचे सर्व सभासद,

३. "संमेलनाच्या उद्घाटनाचे वेळी उपस्थित असलेल्या सर्व सभासदांतून संमेलनाध्यक्षाने नियुक्त केलेले पन्नास सभासद,"

४. स्वागताध्यक्षाने स्वागत-समितीतून नियुक्त केलेले दहा सभासद आणि

५. संमेलनाध्यक्ष.

(४) उपकलम (ऊ) च्या प्रारंभी पुढील वाक्य जोडण्यात यावे :—

"खुल्या अधिवेशनाचा अध्यक्ष संमेलनाध्यक्ष राहील."

(ऊ) विषय-नियामक समितीत असंमत झालेले ठराव किंवा उपसूचना खुल्या अधिवेशनात मांडावयाच्या असल्यास, अशा ठरावावर अथवा उपसूचनेवर मते देणाऱ्या एक चतुर्थांश सभासदांच्या सह्यानिशी, तशी लेखी सूचना त्या बैठकीनंतर होणाऱ्या संमेलनाच्या जाहीर बैठकीच्या सुरवातीपूर्वी दिली पाहिजे व असा ठराव अथवा उपसूचना आणण्याची सूचना आपण देणार असल्याचे त्या सभासदाने विषयनियामक-समितीत त्याचवेळी अध्यक्षास लेखी कळविले पाहिजे.

(ए) संमेलनाच्या सर्व खर्चाची जबाबदारी निमंत्रण देणारी संस्था व त्या संस्थेने निर्माण केलेले स्वागतमंडळ यांच्यावर राहील. संमेलनाच्या अध्यक्षांचा प्रवासखर्च स्वागतमंडळ करील व भाषणाचा मुद्रणखर्च संघ करील.

(ऐ) संमेलनाची सर्व कार्यवाही निमंत्रण देणारी संस्था संघाच्या कार्यकारी मंडळाच्या सल्ल्याप्रमाणे करील.

(ओ) संमेलनासंबंधी इतर सर्व उपनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

अनुक्रमणिका

१९ शाखा सभा

(१) सध्याच्या उपकलम (अ) ऐवजी पुढील उपकलम घालावे :—

" विदर्भाच्या निरनिराळ्या भागात विदर्भ साहित्य संघाच्या शाखा स्थापण्याचा प्रयत्न कार्यकारी मंडळाने करावा. शाखा सभा स्थापन करताना संघाच्या कार्यकारी मंडळाने शाखेचे कार्यक्षेत्र नेमून दिले पाहिजे. शाखा सभा स्थापन करताना निदान २० सभासद नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असले पाहिजेत. किमान २५ सदस्य दरवर्षी असलेच पाहिजेत, ज्यावर्षी ही संख्या २५ पेक्षा कमी होईल त्या वर्षी शाखा स्थगित समजली जाईल व त्यापुढील वर्षीही ती संख्या २५ पेक्षा कमी राहिल्यास ती शाखा रद्द समजण्यात येईल. "

(आ) त्या त्या भागातील विदर्भ साहित्य संघाचे सभासद त्या त्या शाखासभेचे सभासद राहतील. त्यातील साधारण सभासदांच्या वर्गणीपैकी पंचमांश रकम विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाकडून शाखेचे कार्य चालविण्यासाठी देण्यात येईल.

(इ) शाखासभेने आपले कार्य कार्यकारी मंडळाच्या देखरेखीखाली करावे. कार्यकारी मंडळाने काही विशिष्ट कामे तिजकडे सोपविल्यास तीही करावी. तसेच शाखासंमेलने शक्यतोवर दर वर्षी भरविण्याचा प्रयत्न करावा.

(ई) शाखासभेच्या सर्व स्थावर आणि जंगम मालमत्तेवर विदर्भ साहित्य संघाची मालकी राहील.

(उ) शाखासभेचे पदाधिकारी मंडळ यांची निवड त्या शाखेचे सभासद करतील. शाखासभा ज्या विभागाची असेल त्या विभागात राहणारा विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाचा सभासद शाखासभेच्या कार्यकारी मंडळाचा पदसिद्ध सभासद राहील.

(ऊ) शाखासभेच्या कारभाराची चौकशी करण्याचा अधिकार संघाच्या अध्यक्षास राहील. शाखासभेच्या निवडणुकी अगर इतर कोणतेही प्रश्न याबाबत वाद उपस्थित झाल्यास त्याचा निर्णय संघाचा अध्यक्ष करील व तो अखेरचा राहील.

(ए) चौकशीच्या कामी अध्यक्ष मागेल ती शाखासभेच्या कारभाराची सर्व माहिती शाखासभेच्या कार्यकारी मंडळाने दिली पाहिजे. शाखासभेने आपले हिशेब व दप्तर व्यवस्थित ठेवले पाहिजे. शाखासभेचा कारभार असमाधानकारक होत असल्याचे आढळून आल्यास शाखासभेचे म्हणणे ऐकून तिची मान्यता रद्द करण्याचा अधिकार संघाच्या कार्यकारी मंडळास राहील.

(ऐ) या कलमास अविरोधी असे उपनियम करण्याचा अधिकार संघाच्या कार्यकारी मंडळास राहील.

२० संलग्न संस्था

(१) सध्याच्या उपकलम (अ) ऐवजी पुढील उपकलम घालावे.

(अ) विदर्भ साहित्य संघाचे —

१. उद्देश मान्य असणाऱ्या;
२. संघाच्या कार्याबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्या किंवा समान उद्देश असणाऱ्या; व
३. संघाच्या उद्दिष्टांशी व कार्याशी अविरोधी कार्य करणाऱ्या; संस्था संलग्न करून घेण्याचा अधिकार संघाच्या कार्यकारी मंडळास राहील. अशा संलग्न संस्थेस संघ–कार्याच्या अभ्युदयाकरिता कार्य करण्याचा निर्देश दिला तर संलग्न संस्थेच्या आर्थिक परिस्थित्यनुरूप संलग्न संस्था ते कार्य करण्यास बाध्य राहील;

(आ) संलग्न संस्थांना नोंदणी आकार दहा रुपये व वार्षिक वर्गणी दहा रुपये द्यावी लागेल.

(इ) संलग्न संस्थेची अंतर्गत व्यवस्था व आर्थिक परिस्थिती यांची कोणतीही जबाबदारी विदर्भ-साहित्य संघावर राहणार नाही.

(२) सध्याच्या उपकलम (ई) बद्दल पुढील उपकलम घालावे;

" संलग्न संस्थेने आपल्यातर्फे नोंदलेला एक प्रतिनिधी, त्याच्या नावास संघाच्या कार्य-

कारी मंडळाची हरकत नसल्यास, संघाचा सभासद राहील. संलग्न संस्थेने या नोंदीचे नवीनीकरण दरवर्षी १५ एप्रिल पावेतो न केले तर तत्पूर्वी नोंदलेल्या प्रतिनिधी सभासदास पुन्हा नवीन नोंद होईपावेतो सभासदत्वाचा कोणचाही अधिकार राहणार नाही. नोंद अंमलात असताना सुद्धा संलग्न संस्थेच्या प्रतिनिधी सभासदास उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार राहणार नाही, परंतु त्याचे नाव मतदार सूचीत असल्यास त्याला मताधिकार राहील.

(उ) संलग्न संस्थेने आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल संघाच्या कार्यकारी मंडळाक` पाठविला पाहिजे.

२१ इतर नियम

(अ) विदर्भ साहित्य संघाची साधारण सभा, कार्यकारी मंडळाची सभा, संमेलन, विशिष्ट सभा, व उपसमिती यांच्या कामकाजाची नोंद व्यवस्थितपणे पुस्तकात केली जाऊन ती त्या त्या सभांच्या पुढील बैठकीत मंजूर झाली पाहिजे.

(आ) विदर्भ साहित्य संघाचे दप्तर, पत्रव्यवहार निरनिराळ्या सभांच्या वृत्तांतांची पत्रके वगैरे सर्व सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी सरचिटणिसावर व नागपूरच्या चिटणिसावर राहील.

(इ) संघाच्या प्रत्येक सभासदास संघाचे नियतकालिक 'युगवाणी' विनामूल्य पाठविण्यात येईल. संघाच्या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या सर्व सूचना अधिकृत समजण्यात येतील. सभासदांकडे त्या पुन्हा स्वतंत्र रीतीने पाठविल्या जाणार नाहीत.

(ई) योग्य कारण न कळविता कोणतीही समिती वा कोणतीही उपसमिती यांच्या तीन सभांस लागोपाठ अनुपस्थित राहणाऱ्या सभासदाचे त्या त्या ठिकाणचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(उ) संघाच्या ध्येयधोरणाला पोषक व घटनेस अविरोधी असे उपनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संघाच्या सभासदांना या उपनियमांची व घटनेची एक प्रत विनामूल्य देण्याची व्यवस्था कार्यकारी मंडळाने करावी.

(ऊ) नवीन कार्यकारी मंडळाची निवड होईपर्यंत जुने कार्यकारी मंडळच कार्य करील.

(ए) घटनेत उल्लेखित नसलेले शेषाधिकार अध्यक्षास निहित राहतील.

(ऐ) संघाच्या वतीने कायदेशीर कामे करण्याकरिता आणि कायद्याचा सल्ला देण्यासाठी योग्य सल्लागार नेमण्याचा अधिकार संघाच्या अध्यक्षास राहील. तसेच न्यायालयीन कार्यासाठी संघाचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार अध्यक्ष, सरचिटणीस किंवा नागपूरचा चिटणीस ह्यांना राहील.

(ओ) [१] जर कार्यकारी मंडळाच्या मते संघाच्या कोणत्याही सभासदाचे वर्तन संघाचे ध्येय, उद्देश अथवा हित यांना बाधक होणारे असेल तर कार्यकारी मंडळास बहुमताने त्या सभासदाचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार राहील. परंतु अशा प्रकारचा ठराव करण्यापूर्वी कार्यकारी मंडळाच्या वतीने त्या सभासदाच्या वर्तनातील आक्षेपार्ह भाग काय आहे हे त्यास कळवून त्याचे उत्तर मागविले गेले पाहिजे व ज्या सभेत संबंधित सभासदाचे स्पष्टीकरण विचारण्यात येईल त्या सभेसमोर तोंडी निवेदन करण्याची संधी त्या सभासदाला दिली पाहिजे.

[२] अशा रीतीने संघाचे सभासदत्व रद्द केल्या गेलेल्या व्यक्तीस कार्यकारी मंडळाचा ठराव पोचण्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत अपीलाचे रूपाने तो प्रश्न साधारण सभेपुढे मांडण्याकरिता सरचिटणिसांकडे आवेदनपत्र देता येईल.

[३] अशा प्रकारे अपील न केल्यास सभासदत्व रद्द झालेल्या व्यक्तीबाबत कार्यकारी मंडळाने केलेला निर्णय अखेरचा व निर्णायक समजण्यात येईल; परंतु जर अपील केले गेले तर सर्वसाधारण सभेकडून होणारे निर्णय अखेरचे व निर्णायक समजण्यात येतील.

कलम २१ : (१) उपकलम (आ) (१) मध्ये—

१. 'कोणत्याही सभासदाचे वर्तन';

२. 'बहुमताने त्या सभासदाचेच सभासदत्व';

३. ' त्या सभासदाच्या वर्तनातील आक्षेपार्ह भाग; व

४. ' संबंधित सभासदाचे स्पष्टीकरण ';

या शब्द समुच्चयाऐवजी अनुक्रमे पुढील शब्दसमुच्चय घालावे.

१. ' कोणत्याही सभासदाचे अथवा संलग्न संस्थेचे अथवा त्या संस्थेच्या प्रतिनिधी सभासदाचे वर्तन ';

२. ' बहुमताने त्या सभासदाचे अथवा संलग्न संस्थेचे अथवा संलग्न संस्थेच्या प्रतिनिधी सभासदाचे सभासदत्व ';

३. ' त्या सभासदाच्या अथवा संलग्न संस्थेच्या अथवा त्या संलग्न संस्थेच्या प्रतिनिधी सभासदाच्या वर्तनातील आक्षेपार्ह भाग '; व

४. ' संबंधित सभासदाचे अथवा संलग्न संस्थेचे अथवा संलग्न संस्थेच्या प्रतिनिधी सभासदाचे स्पष्टीकरण ';

(२) उपकलम (ओ) २ मध्ये ' व्यक्तीस ' या शब्दाऐवजी ' व्यक्तीस अथवा संस्थेस ' हे शब्द घालावे;

(३) उपकलम (ओ) (३) मध्ये ' व्यक्तीबाबत ' या शब्दाबद्दल व्यक्ती अथवा संलग्न संस्थेबाबत ' हे शब्द घालावे.

२२ घटनेत बदल —

या कलमाऐवजी पुढील घालावे :—

विदर्भ साहित्य संघाच्या घटनेत फेरबदल करणे झाल्यास एक महिन्याची पूर्व सूचना देऊन त्यासाठी बोलाविलेल्या संघाच्या विशेष साधारण सभेत ते करण्यात येतील. या सभेची गणपूर्ती ५० किंवा एकूण मतदार सभासद संस्थेच्या एक अष्टमांश यापैकी जी कमी असेल ती राहील. या विशेष सभेच्या सुरुवातीच्या नियुक्त वेळेला गणपूर्ती नसेल तर सभा रद्द समजली जाईल व पुन्हा पूर्व सूचना देऊन सभा बोलवावी लागेल. सभेच्या सुरुवातीस गणपूर्ती असेल तर सभा चालू असताना गणपूर्ती असलीच पाहिजे हा दंडक लागू राहणार नाही. या सभेला हजर असणाऱ्या सभासद संस्थेच्या तीन चतुर्थांश सभासदांच्या मतानेच फेरबदल पारित केले जावे लागतील.

२३ ही घटना दि. १८ ऑक्टोबर १९७० पासून अंमलात येईल व तेव्हापासून पूर्वीची घटना तिच्या सर्व दुरुस्त्यांसह समजण्यात येईल.

कामकाजाचे नियम

(१) संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून निदान एकदा तरी भरेल. विशेष प्रसंगी तातडीची सभा बोलावण्याचा अधिकार अध्यक्ष व सरचिटणीस यांना राहील. सभेची निदान तीन दिवसांची पूर्वसूचना देण्यात येईल.

(२) कार्यकारी मंडळाची गणपूर्ती ६ ही राहील. गणसंख्या न जमल्यास सभेच्या त्याच दिवशी व त्याच जागी, आगाऊ पूर्वसूचना दिली असल्यास, पूर्वनियोजित सभेच्या वेळेनंतर अर्ध्या तासाने स्थगित सभा भरविता येईल. मात्र अशा सभेत कार्यक्रमपत्रिकेव्यतिरिक्त कोणतेही कामकाज करता येणार नाही.

(३) कार्यकारी मंडळाची सभा बोलविण्यास सवड नसेल तर सभासदांचा लेखी अभिप्राय मागवून अध्यक्षाला तातडीची कामे करता येतील. कार्यकारी मंडळाच्या चार सभासदांनी या कामास आपली लेखी असंमती कळविल्यास त्या कामासाठी सभा बोलविली पाहिजे.

(४) संघाच्या दैनंदिन खर्चासाठी म्हणून, आवश्यक असल्यास, सरचिटणिसाजवळ रु. १०० (शंभर) पर्यंत रकम ठेवता येईल. यापेक्षा अधिक रकम ताबडतोब बँकेत जमा करावी.

(५) संघाचे सर्व प्रकारचे रोकड उत्पन्न रोजच्या रोकड-वहीत नोंदले पाहिजे; व वसुलीच्या पावत्या दिल्या पाहिजेत.

(६) संघाचे सर्व जमाखर्च नियमानुसार ठेवण्याची जबाबदारी नागपूरचा चिटणीस व अध्यक्ष यांजवर राहील.

(७) प्रत्येक खर्चाचे प्रमाणपत्र (व्हाऊचर) घेतले पाहिजे, किंवा नागपूरच्या चिटणीसाने त्या खर्चाचा दाखला दिला पाहिजे.

(८) सरचिटणिसाला १० रु. पर्यंत खर्च करण्याचा अधिकार राहील. त्यावरील खर्चास अध्यक्षांची लेखी संमती घेतली पाहिजे.

(९) जमाखर्चासाठी रोकडवही, खातेपुस्तक, जमेच्या पावत्या व खर्चाची प्रमाणपत्रे अगर चिटणिसाचे दाखले हे ठेवण्यात आले पाहिजे.

(१०) बँकेची पासबुके व चेकबुके सरचिटणिसाच्या ताब्यात राहतील. बँकेतून खर्चासाठी रकम काढावयाची झाल्यास अध्यक्षांची अथवा कलम १५ (अ) प्रमाणे नामनिर्दिष्ट उपाध्यक्षाची लेखी परवानगी घेऊन, त्यांच्या आदेशाप्रमाणे सरचिटणिसाने चेक लिहून कोषाध्यक्षाकडे

कलम १६ (आ) प्रमाणे परीक्षणार्थ व सहीसाठी पाठवावा व कोषाध्यक्षाला सर्वही बाबी घटनेनुसार आहेत असे आढळल्यास चेकवर त्याने स्वाक्षऱ्या कराव्या.

(११) संघाचे कार्यालय, कागदपत्र, हिशेब वगैरे संघाच्या कोणत्याही सभासदास पाहावयाचे असल्यास, त्याने तशा अर्थाची कमीत कमी तीन दिवसांची पूर्वसूचना दिली पाहिजे. म्हणजे कार्यालयाच्या सोयीप्रमाणे कार्यालयाच्या कामाच्या वेळात ते पाहावयास मिळतील.

(१२) अध्यक्षांच्या अनुपस्थितीत कलम १५ (अ) प्रमाणे नामनिर्दिष्ट उपाध्यक्ष अध्यक्षांची कामे करील. एखाद्या सभेस दोघेही अनुपस्थित असल्यास हजर असलेले सभासद त्या सभेपुरता अध्यक्ष आपल्यातून निवडतील.

(१३) कार्यकारी मंडळाच्या सभासदांना, जेथे सभा असेल त्या ठिकाणचे जर ते रहिवासी नसतील तर, जाण्यायेण्याचे तिसऱ्या वर्गाचे रेल्वे भाडे (अगर मोटारचे साधारण भाडे) देण्यात येईल. मात्र संमेलनाच्या वेळी भरणाऱ्या सभांना असा प्रवासभत्ता मिळणार नाही.

(१४) संघाचे नियतकालिक चालविण्यासाठी एका संपादक–मंडळाची नेमणूक कार्यकारी मंडळ करील, आणि अशा संपादक–मंडळाच्या सल्याने व सहकार्याने संपादक ते नियतकालिक चालवील.

(१५) संघातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या संचालनकार्यासाठी कार्यकारी मंडळ एक परीक्षा समिती नेमील, आणि या परीक्षा समितीच्या सल्याने व सहकार्याने परीक्षासंचालक कार्य करील.

(१६) कार्यकारी मंडळाने एक स्थायी अर्थ-समिती नेमावी व तिने संघाचे जमाखर्च व हिशेब ठेवणे या बाबतीत साहाय्य करावे.

(१७) संघाच्या सर्व मालमत्तेचे एक नोंदणी पुस्तक (स्टाक–रजिस्टर) सरचिटणीस ठेवील.

(१८) संघाचे वेतनिक सेवक नेमण्याचा, त्यांचे वेतन ठरविण्याचा आणि त्यांच्या संबंधात उपनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(१९) (अ) अंदाजपत्रकात मंजूर झालेल्या मर्यादांपर्यंत रकम त्या त्या कार्यासाठी खर्च करण्याचा अधिकार अध्यक्षास राहील.

(आ) दि. १ एप्रिलपासून तो पुढील वर्षाचे अंदाजपत्रक साधारण सभेत मंजूर होईपर्यंत नित्य व नैमित्तिक खर्च करण्याचा अधिकार अध्यक्षास राहील.

(इ) अंदाजपत्रकात तरतूद नसलेल्या विशेष निकडीच्या कामासाठी पाचशे रुपयेपर्यंत खर्चास मंजूरी देण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

(ई) विशेष निधी जमा करण्याचा व त्यातून खर्च करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास अथवा त्याने नेमलेल्या विशेष समितीस राहील.

(२०) "साधारण सभेला आवश्यकतेनुसार हे नियम साध्या बहुमताने बदलण्याचा अधिकार राहील. कामकाजाकरिता पूरक नियम करण्याची आवश्यकता भासल्यास कार्यकारी मंडळास तसे पूरक नियम करण्याचा व स्वत: केलेल्या पूरक नियमात वेळोवेळी संशोधन करण्याचा अधिकार राहील.

श्री. मनोहरभाई पटेल



महाराष्ट्रातील दानशूर उद्योगपति आणि गोंदियाचे अग्रगण्य कार्यकर्ते श्री. मनोहरभाई पटेल यांना ता. १७ ऑगस्ट १९७० रोजी देवाज्ञा झाली, हे कळविण्यास दुःख वाटते. त्यांच्या स्मृतीला विदर्भ साहित्य संघ कृतज्ञतेने अभिवादन करीत आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

विशेष साधारण सभेची सूचना

रविवार, दिनांक २८ जुलै १९६८ रोजी भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेने दिलेल्या आदेशानुसार, घटनासमितीने सुचविलेल्या घटना दुरुस्तीच्या ठरावावर विचार करण्यासाठी घटना नियम १० आणि २२ अनुसार, रविवार दिनांक १८ ऑक्टोबर १९७० रोजी दुपारी ४ वाजता केंद्रीय कार्यालयात **विशेष साधारण सभा** भरेल.

तरी ह्या सभेला सर्व सभासदांनी अवश्य उपस्थित राहण्याची कृपा करावी, ही विनंती.

विशेष सूचना—गणपूर्तीच्या अभावी ही सभा स्थगित झाल्यास, तीच सभा, त्याच जागी, त्याच दिवशी दुपारी ४–३० वाजता भरेल.

दि. ३१ ऑगस्ट १९७०
केंद्रीय कार्यालय
विदर्भ साहित्य सघ
उत्तर अंबाझरी मार्ग,
नागपूर १ (म. राज्य)

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ.

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१
मुद्रणस्थळ : नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर–१

अनुक्रमणिका